# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०१/२०२०** **दिनांक १४.०१.२०२०**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दिनांक ३१/१२/२०१९ रोजी सायं.०४.३० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३७११/२०१९, दि.२३.१२.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. तसेच जा.नं.एसएसएस/ वशी-०४/३८१२/२०१९, दि.२९.१२.२०१९ नुसार सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात येत असून पुढील सभेची तारीख, वेळ व ठिकाण अलाहिदा कळविण्यात येईल. सभेची विषयसुची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील, असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानंतर रद्द करण्यात आलेली मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१४.०१.२०२० रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आलेली आहे. या सभेची विषयसुची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील, असे जा.नं.एसएसएस/ वशी-०४/४०४२/२०२०,दि.१३.०१.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार मंगळवार दि.१४.०१.२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.दी.म.मुगळीकर (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०४.१२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०१** **दिनांक ०४.१२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**तसेच दि.०४.१२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.१,२,३,४ व ६ हे शासनाने नियुक्त केलेल्या व्यवस्थापन समितीने तसेच स्थानिक उपसमितीने घेतलेल्या सभांचे इतिवृत्त कायम करणे संबंधीचे असल्याने "सदरचे इतिवृत्त तदर्थ (Ad-hoc) समितीने आहे तसे कायम करावे अथवा सदर इतिवृत्ताचा सखोल अभ्यास करुन कायम करावे. याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे." असा निर्णय घेण्यात आला होता, त्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दि.१८.१२.२०१९ रोजीचे शपथपत्राव्दारे दि.०४.१२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.१,२,३,४ व ६ कायम करणेकामी मार्गदर्शन होणेबाबत विनंती करण्यात आली होती. याबाबत मा.न्यायालयाने दि.०८.०१.२०२० रोजी आदेश केलेला आहे. आजचे मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये सदर आदेशाचे अवलोकन करण्यात येऊन दि.०४.१२.२०१९ रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेतील विषय नं.१ व ६ मधील व्यवस्थापन समिती सभेचे तसेच विषय नं.२,३ व ४ मधील स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही- सर्व विभाग)**

---

**विषय नं.०२ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**अ) मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधिश, मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या मा.तदर्थ समितीचे अध्यक्ष, सदस्य, मा.राहाता व कोपरगाव न्यायालयाचे न्यायाधिश, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व मा.अधिकारी वर्ग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमः- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मध्ये मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय :-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ चे सभेतील निर्णय क्रं.६९२.

संस्थानमार्फत सन २०१९ ची संस्थान प्रकाशित दैनंदिनी व वेगवेगळया आकाराच्या दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत.

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणुन इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थानमार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. दरवर्षी मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय, मा. विश्वस्त, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी, यांना संस्थानच्यावतीने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामुल्य भेट म्हणून देण्यास व त्याची रक्कम प्रकाशने विभागखाते (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३.१२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९२- संस्थानचे प्रकाशने विभागाने २०१९ चे ऑफिस कॅलेंडर (दिनदर्शिका) छपाई करुन घेतले आहे. यापूर्वी संस्थानचे विविध विभागात व कार्यालयामध्ये खाजगी संस्थांची कॅलेंडर्स लावली जात होती. मात्र आता संस्थाननेच कॅलेंडर प्रकाशित केलेले असल्याने संस्थानच्या सर्व विभागात/कार्यालयात संस्थानची ऑफिस कॅलेंडर लावण्यात यावी. कोणत्याही खाजगी संस्थेची कॅलेंडर्स लावण्यात येऊ नये असे ठरले. याकामी विभागांचे मागणीनुसार ऑफिस कॅलेंडर देणेस व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१.११.२०१८ सभेतील निर्णय क्र. ६९२ नुसार सर्व विश्वस्त व अधिकारी यांना मान्यवरांना देण्यासाठी दिनदर्शिका व दैनंदिनी देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्याचप्रमाणे सर्व विश्वस्त व अधिकारी यांना मान्यवरांना देण्यासाठी पुढील प्रमाणे ऑफिस कॅलेंडर्स (दिनदर्शिका) देण्यास व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

प्रास्तविक:- उपरोक्त दोन्ही निर्णयानुसार सन २०१९ च्या श्री साईदैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका खाली नमूद केलेप्रमाणे विनामुल्य भेट म्हणून देण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०१९ रु. ९०/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका २०१९ रु. १५/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका (६ पाने) २०१९ (रु.३०/-) नग संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१. | मा. अध्यक्ष महोदय, मा. व्यवस्थापन समिती | १५० | १५० | ७५ |
| ०२. | मा. उपाध्यक्ष महोदय, मा. व्यवस्थापन समिती | १५० | १५० | ७५ |
| ०३. | मा. अध्यक्ष, छाननी समिती (श्री.के.यू.चांदीवाल साहेब) | १५० | १५० | ७५ |
| ०४. | मा. सदस्य, मा. व्यवस्थापन समिती (प्रत्येकी १५० नग प्रमाणे ८ मा. समिती सदस्य) | १२०० | १२०० | ६०० |
| ०५. | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | १५० | १५० | ७५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६. | मा. उपजिल्हाधिकारी<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ | ४० |
| ०७. | मा. उपजिल्हाधिकारी<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ | ४० |
| ०८. | मा. पोलिस उपअधिक्षक,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ | ४० |
| ०९. | मा. उपकार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ | ४० |
| १०. | सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा. कार्यकारी अभियंता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (प्रत्येकी ३५नग प्रमाणे x०५ व्यक्ती) | १७५ | १७५ | १०० |
| ११. | विधी व न्याय विभाग | ५० | ५० | २५ |
| १२. | सर्व विभाग (कार्यालयीन कामकाजासाठी) | - | - | ४६५ |
| | एकुण नग | २३२५ | २३२५ | १६५० |
| | **एकुण खर्च** | **२,०९,२५०/-** | **३४,८७५/-** | **४९,५००/-** |

(एकुण अक्षरी रुपये- दोन लाख त्र्याण्णव हजार सहाशे पंचवीस मात्र)

विभागाचा अभिप्राय- यावर्षी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे श्री साई दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका विनामुल्य भेट देता येतील, व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते खर्ची टाकता येईल असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०२० रु. ९०/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका २०२० रु. १७/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका (६ पाने) २०२०(रु.२५/-) नग संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१. | मा.न्यायाधीश उच्च न्यायालय | ६० | ६० | ६० |
| ०२. | मा. अध्यक्ष, तदर्थ समिती | १५० | १५० | ७५ |
| ०३. | मा. सदस्य, तदर्थ समिती (प्रत्येकी १५० नग प्रमाणे २ मा.समिती सदस्य) | ३०० | ३०० | १५० |
| ०४. | मा. न्यायाधीश राहाता न्यायालय | ४ | ४ | - |
| ०५ | मा. न्यायाधीश कोपरगांव न्यायालय | ११ | ११ | - |
| ०६. | मा. अध्यक्ष, मा. व्यवस्थापन समिती | १५० | १५० | ७५ |
| ०७. | मा. अध्यक्ष, छाननी समिती<br>(श्री.के.यू.चांदीवाल साहेब) | १५० | १५० | ७५ |
| ०८. | मा. सदस्य, मा. व्यवस्थापन समिती<br>(प्रत्येकी ७५ नग प्रमाणे ५ मा. समिती सदस्य) | ३७५ | ३७५ | २०० |
| ०९. | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | १५० | १५० | ७५ |
| १०. | मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ | ४० |
| ११. | मा. मुख्य लेखाधिकारी,सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा. कार्यकारी अभियंता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (प्रत्येकी ३५ नग प्रमाणे x०६ व्यक्ती) | २१० | २१० | १२० |
| १२. | संस्थान पॅनलवरील वकील | १५ | - | - |
| १३. | सर्व विभाग (कार्यालयीन कामकाजासाठी) | - | - | ५०० |
| १४. | सर्व विभागांचे प्रमुख/ प्र.अधीक्षक | ४० | - | - |
| १५. | तिरुपती देवस्थान (मागणी आल्यास) | ५० | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | विधी व न्याय विभाग (मंत्रालय मुंबई) | ५० | ५० | २५ |
| | एकुण नग | १७९० | १६८५ | १३९५ |
| | **एकुण खर्च** | **१,६१,१००/-** | **२८,६४५/-** | **३४,८७५/-** |

(एकुणअक्षरी रुपये- दोन लाख चोवीस हजार सहाशे वीस मात्र)

प्रस्ताव- तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केल्याप्रमाणे श्री साईदैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका सन २०२० विनामूल्य भेट देणेकामी व भेट दिलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे मूल्य रु. २,२४,६२०/- (अक्षरी रु. दोन लाख चोवीस हजार सहाशे वीस मात्र) प्रकाशने विभाग खाती *(Publication Exp.)* खर्ची टाकणेस चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस सादर.

**निर्णय क्र.०२(अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधिश, मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या मा.तदर्थ समितीचे मा.सदस्य, मा.राहाता व कोपरगाव न्यायालयाचे न्यायाधिश, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, छाननी समिती अध्यक्ष, संस्थानचे मा.अधिकारी वर्ग, संस्थानचे पॅनलवरील वकील, विधी व न्याय विभाग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करण्यात येऊन आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**ब) करनिर्धारण,फेर करनिर्धारण,अपिल्स संबधीत आयकर विभागाच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे रिट अर्ज दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर विभागाने मागील आर्थिक वर्षांची करनिर्धारणे करुन देय कर नसलेबाबत आदेश केलेले आहेत. तथापि, मागील वर्षापासून आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे करनिर्धारण करत असतांना संस्थान धार्मिक अथवा धर्मादाय असलेबाबत व इतर अनुषंगीक पुर्ततांबाबत मतांतर करुन संस्थानला कर भरण्याबाबत आदेश पारीत केला. त्या आदेशाविरुद्ध विहीत पद्धतीने मान्यता घेऊन मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्यात आला होता. तसेच मागील करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणेबाबत आदेश केला. त्याविरुद्ध सुद्धा मा.उच्च न्यायालयात, मा.सर्वोच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करण्यात आले. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाने बाबत अपिल दाखल करण्यास व तोपर्यंत देय आयकरास स्थगिती आदेश दिला आहे. अशाचप्रकारे करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे करनिर्धारण व करनिर्धारण वर्ष २०१४-१५ चे फेर करनिर्धारण करण्याबाबत आयकर विभागाने कारवाई सुरु केली आहे. दि.३१.१२.२०१९ अखेर करनिर्धारण आदेश करण्याचे नियोजन आहे.

आयकर विभागाने दि.०८.१२.२०१९ ITBA/AST/F/17/2019-20/ 1021909033(1) अन्वये २०१४-१५ चे फेर करनिर्धारण करणेबाबत नोटिस दिली आहे. तसेच सदर नोटिस कर सल्लागार श्री आर.आर. मुनी, मुंबई यांना थेट पाठविण्यात आली आहे. कर सल्लागार श्री.आर.आर. मुनी, मुंबई यांनी दि.०९.१२.२०१९ रोजी ई-मेलद्वारे सदर बाबत रिट अर्ज दाखल करणेबाबत योग्य ते निर्देश देणेबाबत कळविले आहे. आयकर विभागाने मतांतर केल्याने मागील वर्षाप्रमाणे करनिर्धारण वर्ष २०१४-१५ चे फेर करनिर्धारणाविरुद्ध व करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे करनिर्धारणाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे रिट अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. रिट अर्ज दाखल करण्याकरिता मागील वेळी काम केलेले चार्टर्ड अकौंटंटस्, लेखापरिक्षण संस्था, ॲडव्होकेटस्, ज्येष्ठ विधिज्ञ व इतर नामांकीत चार्टर्ड अकौंटंटस्, लेखापरिक्षण संस्था, ॲडव्होकेटस्, ज्येष्ठ विधिज्ञ यांना कामाचे स्वरुप कळवून त्यांचेकडून सदर कामकाजाकरिता त्यांना अपेक्षित असलेली फी नमुद करुन त्यांची दरपत्रके घेऊन प्रस्ताव सादर करणेबाबत सुचविले होते. त्यास अनुसरुन दि.१२.१२.२०१९ रोजी कामाचे स्वरुप कळवून मागील वर्षी काम पाहिलेले व इतर नामांकीतांची नांवे प्राप्त झाली, त्यांना सदर कामकाजाबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे कामाच्या स्वरुपानुसार दर प्राप्त झाले आहेत.

| **Sr. No.** | **Name of Chartered Accountant/ Advocate/Senior Counsel** | **Nature of Work** | **Last Years Fees** | **Quoted for AY 2014-15, AY 2017-18** |
|---|---|---|---|---|
| 01 | Senior Advocate S. Ganesh, Delhi | Present on behalf of Sansthan in High Court, Supreme Court | Fees – Nil + Out of pocket expenses at actual. Last years Exp. Rs.2,37,379/- | Fees – Nil Out of pocket expenses at actual |
| 02 | M/s. Junnarkar and Associates, Mumbai | File Writ Petition in High Court | Fees – Nil + Out of pocket expenses at actual<br>Last years Fees - Nil | Fees – Nil Out of pocket expenses at actual |
| 03 | Jayakar&Jayakar Partners, Mumbai | Drafting of Petition, SLP, Submissions to Income Tax Department | Fees – Nil, + Out of pocket expenses at actual. Last year Travel Ticket + Hotel Stay | Fees – Nil + Out of pocket expenses at actual. |
| 04 | CA Deepak Tikekar, Mumbai | Provide Case Laws and Income Tax related informations for Advocate, Writ, Conference with Advocates, file Appeal to CIT(A) | Fees – As per ICAI Rule. Charged Rs.12.27 Lakh. Last year full and final settled Rs.4.50 Lakh + Out of pocket Travel Ticket | Not ready to work this year. But ready to provide informations, conference with Advocates. |
| Sr. No. | Name of Chartered Accountant/ Advocate/Senior Counsel | Nature of Work | Last Years Fees | Quoted for AY 2014-15, AY 2017-18 |
| 05 | CA Rahul Kelkar, Mumbai | AY 2015-16 & AY 2013-14 Assessment, Reassessment, Rectification, Stay of Demand Hearing, Letters to DCIT, Submissions regarding Reopening etc. | Fees – As per ICAI Rule. Charged Rs.5.51 Lakh with GST<br>Last year bill not yet finalised and pending. | Not ready to work this year. |
| 06 | CA R.R. Muni & Co., Mumbai | Assessment, Reassessment, Collection of data, Submissions to Income Tax Department and Appeal of AY 2013-14 | Fees – Nil + Out of pocket expenses at actual. | Fees – Nil + Out of pocket expenses at actual. |
| 07 | CA V.K. Beswal & Co., Mumbai | Quoted for AY 2014-15 & AY 2017-18<br>CIT Appeal, High Court, Supreme Court work. | | Fees – Rs.1/- + Our actual out of pocket expenditure be reimbursed, Travel, Hotel Stay, Counsel Fees etc. |

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | Lakshmikumaran & Sridharan Attorneys, Mumbai | Quoted for AY 2014-15 & AY 2017-18<br>CIT Appeal, High Court, Supreme Court work. | 1. Drafting, Drafting Appeal CIT(A), and Filling of Submission<br>2. Hearing/Appearance before AO Rs.25,000/-<br>3. Drafting & Filling Submission to Appellate Proceeding to CIT(A) & ITAT(A) Rs.40,000/- each.<br>4. High Court & Supreme Court Drafting and Filling Appeal before HC, SC Rs.75,000/- each.<br>5. Writ Petition – Rs.1 Lakh each.<br>6. Legal Research enclosed details Plus GST & Out of Pocket Expenses. |
| 09 | M/s. SSAAM & Co. Chartered Accountants | Assessment, Reassessment | As per ICAI's Recommendation + Actual expenses extra |
| 10 | Senior Counsel Bhupendra Shah, Mumbai | Appeal before CIT(A), ITAT | For each Assessment Year Rs.2.50 Lakh + GST |

मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव्ह पिटीशन ३०४७५/२०१८ अन्वये करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे संदर्भात दि.१८.०१.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

1. The assessing officer shall complete the assessment for Assessement year 2013-14 pursuant to the notice for reassessment which has been issued on 23 March 2018, in acconrdance with law;
2. The issue as to whether the notice under section 148 for reopening the assessment for assessment year 2013-14 is valid is kept open to be urged in appropriate proceedings after the assessment order is passed.
3. Upon the passing of the order of assessment for assessment year 2013-14 and in order to unable the assesse to pursue its remedies before the Commissioner of Income Tax (Appeals) there shall be an interim protection in term of the order Dt.27.03.2018 that was passed by Divisional Bench of the Bombay High Court in writ petition No.939 of 2018
4. Both the appeals for the Assessment Years 2013-14 and 2015-16 Shall heard together by the Commissioner of Income Tax (Appeals)
5. The appellant shall be at liberty to persue its remedies in accordance with Law.

आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. तरी मागिल करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ प्रमाणे चालू वर्षी आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१४-१५ चे फेर करनिर्धारण करणेबाबत दिलेल्या

नोटीस विरुद्ध स्थगिती मिळणेकामी व २०१७-१८ चे करनिर्धारणात धर्मादाय व धार्मिक ट्रस्ट संबंधीत मतांतर केल्याने मागील वर्षांप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई आवश्यकतेप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे रीट अर्ज, Special Leave Petition दाखल करण्यास व त्याकरिता चार्टर्ड अकौंटंटस्, लेखापरिक्षण संस्था, ॲडव्होकेटस्, ज्येष्ठ विधिज्ञ यांची नियुक्ती करुन कामकाज करण्यास व त्याकरिता होणा-या अनुषंगीक खर्चास चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०२(ब)** **यावर सविस्तर चर्चा होऊन, करनिर्धारण, फेर करनिर्धारण, अपिल्स संबधीत आयकर विभागाच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे रिट अर्ज, Special Leave Petition दाखल करण्यास व त्याकरिता चार्टर्ड अकौंटंटस्, लेखापरिक्षण संस्था, ॲडव्होकेटस्, ज्येष्ठ विधिज्ञ यांची नियुक्ती करुन कामकाज करण्यास व त्याकरिता होणा-या अनुषंगीक खर्चास चक्रीय पद्धतीने मान्यता देण्यात आलेली आहे, त्याचे अवलोकन करण्यात येऊन आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.०३** **मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लॉबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लॉबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामासाठी येणारे रु.२८,१३,०००/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. ८०,८५ मध्ये सन २००७ मध्ये श्री साई प्रसादालयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. याच कालावधीत श्री साईप्रसादालयातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे.सदर डांबरीकरणास आता १० वर्षापेक्षाही जास्त कालावधी झालेला असल्याने प्रदीर्घ वापराने श्री साई प्रसादालयातील अंतर्गत रस्ते खराब झालेले आहेत. लाडू प्रसाद निर्मिती विभागाने दि.२८/०९/२०१९ रोजीच्या पत्राने सदरहू रस्त्यास बरेचसे खड्डे पडलेले असून सदरचा रस्ता दुरुस्त करणेबाबत कळविले आहे. तसेच मेकॅनिकल विभागाने दि.३१/१०/२०१९ रोजीच्या श्री साईप्रसादालयाचे उत्तरेस असलेल्या मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लान्टकडे जाणा-या रस्त्यावर खडीकरण व डांबरीकरण केलेले नसल्यामुळे गॅस प्लान्टकडे जाणारे १२ ते १७ टन वजनाचे गॅस वाहतुक टॅंकर नेण्यास अडचण येते. करीता सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेस कळविले आहे.

त्यामुळे श्री साई प्रसादालयातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे तसेच मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लान्टकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. याकामी महाराष्ट्र राज्य सन २०१९-२० चे दरसूची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असून खालील तपशिलात नमूद केले प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| ०१ | मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे.<br>एकून लांबी -३६९.२० मी., सरासरी रुंदी – ७.३५ मी.<br>गृहीत धरण्यात आलेल्या तरतूदी – Tack coat, 75mm thick Modified Penetration Macadam (MPM), 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat. | १३,४८,८७४/- |
| ०२ | मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.<br>एकून लांबी -१५८.५० मी., रुंदी – ३.७५ मी.<br>गृहीत धरण्यात आलेल्या तरतूदी – 150mm thick WBM Grade I, 75mm thick WBM Grade II, 75mm thick Modified Penetration Macadam (MPM), 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat. | ९,५६,७१८/- |

| | | |
|---|---|---|
| | एकूण - | २३,०५,५९२/- |
| | जीएसटी -१८% - | ४,१५,००७/- |
| | कन्टीनजन्सी -०४ % - | ९२,२२४/- |
| | एकूण - | २८,१२,८२३/- |
| | एकूण रक्कम रुपये- | २८,१३,०००/- |

प्रस्तावः-तरी मौजे निमगांव को-हाळे येथिल संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेंटेनंस ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामासाठी येणारे रु.२८,१३,०००/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लॉबीतील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे ऐवजी तात्पुरती डागडुजी करणे शक्य आहे काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थान निधीतून शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत करणे कामाचे ठेकेदार रेवा पॉलीमर्स, धुळे यांचे अंतिम देयक रक्कम रु.६,६२,२२१/- मंजूर करणे व त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.१,६६,२२१/- ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद– अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) चे तरतूदीनुसार भक्तांना सोयी सुविधा पुरविणे हे व्यवस्थापन समितीचे कर्तव्य आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग निर्णय क्रं. सासंवि १०१८/७७४/प्र. क्रं. ८०/का १६/मंत्रालय, मुंबई -४०००३२, दि.०२/०८/२०१८ अन्वये शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत करण्यासाठी रु.१०,७४,३६०/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना–मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १४० अन्वये शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावार पॉलीकार्बोनेट डोमचे छत करणेकामी ठेकेदार रेवा पॉलीमर्स, धुळे यांची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी सदरचे काम दि.०७/१०/२०१९ रोजी पूर्ण केले असून झालेल्या कामाचे पहिले व अंतिम बील सादर केले आहे. इकडील विभागामार्फत सदर बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. सदर कामाचा व अंतिम बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत करणे. |
| २) | ठेकेदाराचे नाव | रेवा पॉलीमर्स आवधन धुळे |
| ३) | मंजूर निविदा रक्कम | ६,९३,०००/- |
| ४) | काम बहाल करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.व दि. | निर्णय क्रं. १४०, दि.२६/०२/२०१९ |
| ५) | ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश क्रं. व दिनांक | जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/१७२४/२०१९, दि.०५/०८/२०१९ |
| ६) | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु. ६,६२,२२१/- |
| ७) | यापुर्वी अदा केलेली रक्कम | रु. ४,९६,०००/- |
| ८) | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु. १,६६,२२१/- |
| ९) | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. ३०,७७९/- (४.४४१४% ) कमी |
| १०) | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | ०२ महिने – दि.११/१०/२०१९ अखेर |
| ११) | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.०७/१०/२०१९ |

ठेकेदार रेवा पॉलीमर्स, धुळे यांनी डोमचे काम मुदतीत पूर्ण केले असून सदर कामाचे रु.६,९२,९६९/- मात्र रकमेचे पहिले व अंतिम बील सादर केले आहे. सदरहू बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार बिलाची एकूण रक्कम रु.६,६२,२२१/- मात्र इतकी होते. म्हणजेच मंजूर निविदा रकमेपेक्षा रु.३०,७७९/- (४.४४ % कमी) इतका कमी खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय- ठेकेदार यांनी सदर काम निविदा शर्तीनुसार पूर्ण केलेले असल्याने ठेकेदार यांचे सदरहू अंतिम बिल मंजूर करणेस हरकत नाही.

प्रस्ताव– तरी ठेकेदार रेवा पॉलीमर्स आवधन धुळे यांचे शिर्डी बसस्थानक इमारतीचे मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत तयार करणे कामाचे पहिले व अंतिम देयक रक्कम रु.६,६२,२२१/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.१,६६,२२१/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेसाठी मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन टु स्काय भागावर पॉलीकार्बोनेट डोमचे छत करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.६,६२,२२१/-मात्र मंजुर करणेत येऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.१,६६,२२१/-मात्र सदर कामाचे ठेकेदार रेवा पॉलीमर्स, धुळे यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणेसाठी येणाऱ्या रक्कम रु.५६,५७,०००/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम–२१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे". अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थानच्या मालकीचे गट नं.१६९ निमगांव को-हाळे येथील जागेत वर्ग-०४ कर्मचा-यांसाठी एकूण आठ इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. एका इमारतीमध्ये १३ सदनीका असून एकूण ०८ इमारतींमध्ये ९६ सदनीका आहेत. या इमारतीचे बांधकाम सन २००७-२००८ मध्ये पूर्ण झालेले आहे. सदरहू इमारतीचे बांधकामास व रंगकामास बारा वर्षाचा कालावधी झाला असून सततच्या वापरामुळे या इमारतींचे आतिल व बाहेरील भागाचा रंग खराब झालेले आहे. तसेच येथे रहिवास असलेले कर्मचारी यांनी देखील रंगकाम करुन मिळणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. याकामी राज्य दरसुची २०१९-२० चे अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | इमारतीचे आतील बाजूने जुना रंग घासुन, प्रायमर व पुट्टी सह भिंतीला व छताला ऑईल बाऊंड डिसटेंपर रंग देणे तसेच भिंतीला तिन फुट ऊंची पर्यंत ऑईल पेन्ट रंगकाम करणे. | रु.१७,१६,८६६/- |
| ०२) | इमारतीचे बाहेरील बाजुने जुना रंग घासुन, प्रायमरसह दोन कोट एक्सटेरीअर अॅक्रेलीक इमल्शन पेन्टने रंगकाम करणे. | रु.२९,१९,७००/- |
| | एकूण : | रु.४६,३६,५६६/- |
| | जी.एस.टी १८% : | रु.८,३४,५८२/- |
| | कंटीनजंसी ४% : | रु.१,८५,४३६/- |
| | एकूण : | रु.५६,५६,६११/- |
| | एकूण अंदाजपत्रकीय रक्कम :- | **रु.५६,५७,०००/-** |

प्रस्ताव– तरी संस्थानचे गट नं.१६९ निमंगाव को-हाळे येथील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थानाच्या इमारतींचे आतिल व बाहेरील बाजुने रंगकाम करणेसाठी अंदाजे रु.५६,५७,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीन ई-निविदा प्रक्रिया करुन निविदा मागविणेस निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५६,५७,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीक लोडकरीता सबस्टेशन व जनरेटरसाठी इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्कीटेक्ट नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद: अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क)अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय–

०१. निर्णय क्र.४२१ दि.२६/०७/२०१९(विद्यूत विभाग)–“.. यावर सविस्तर चर्चा होवुन, श्री साईनाथ हॉस्पीटल तसेच द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबिकल, इलक्ट्रीकल पॅनेल व केबल खरेदी करून बसविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रू.३,७४,०२५/- मात्राचे खर्चास मान्यता देण्यात आली. १०१० केव्हीए जनसेट-०२ नग व २५०० केव्हीएसबस्टेशन, जनरेटर रूम व पॅनेल रुमचे बांधकामासाठी येणा-या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर एकत्रित खर्चाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा असे ठरले. ”

०२. निर्णय क्र.४८७ दि.०४/१२/२०१९(बांधकाम विभाग) “..यावर सविस्तर चर्चा होवुन, श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता सबस्टेशन व जनरेटर रूमचे बांधकामासाठी आर्कीटेक्ट/ सल्लागार नेमणे का आवश्यक आहे? यासह अपेक्षित असलेल्या बाबींसह सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरले. ”

प्रस्ताविक: उपकार्यकारी अभियंता, विद्यूत विभाग यांनी दि.१९/०८/२०१९ रोजीचे पत्राने मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील नि. क्र.४२१ चे अनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवास वाढीव लोडकरिता सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकाम करणेकामी येणारे विद्यूतविषयक खर्चास मान्यता घेवून सदरच्या १०१० केव्हीए जनसेट ०२ नग व २५०० केव्हीए सबस्टेशन, जनरेटर रुम व पॅनेल रुमचे बांधकामाचे इस्टीमेट हे बांधकाम विभागामार्फत मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर होवून त्यास मा.व्यवस्थापन समितीची बांधकाम विभागाने मान्यता घेवून तातडीने कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी विद्यूत विभागाने बांधकाम विभागाकडून सबस्टेशन, जनरेटर रुम व पॅनेल रुम इत्यादी बांधकामाचे इस्टीमेट घेवून बांधकाम व विद्यूतविषयक खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत एकत्रित मान्यता घेणे गरजेचे होते.

या कामाचे बांधकाम प्लॅन व अंदाजपत्रक तयार करणेसाठी सल्लागार नेमणे, येणारे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत तसेच शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणे व नगरपंचायत मंजुरी घेणे या बाबींची पूर्तता करावी लागणार आहे. विद्यूत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावात नविन जनरेटर रुमचे बांधकाम हे सध्याच्या जनरेटर रुम समोरील मोकळया जागेत करणेबाबत नमूद आहे. करीता त्याचेकडून सदरहु कामाचे ठिकाण दर्शविणारा लेआउट नकाशा व बांधकामासाठी विद्यूतविषयक Requirements/ स्पेसिफिकेशनचा तपशिल मागविण्यात आला. विद्यूत विभागाने १३ मी.x २५ मी. साईजची व ५.५० मी. स्लॅब हाईट असलेल्या आर.सी.सी. इमारतीचा प्लॅन पाठविला होता. त्यानुसार ३२५ चौ.मी. बांधकामासाठी ढोबळ मानाने सेंट्रल पी. डब्ल्यु. डी. चे प्लिंथ एरीया दर रु.२७,८४५/- प्रति चौ.मी. या दराने अंदाजे रु.९०,४९,६२५/- खर्च अपेक्षित आहे. सध्या संस्थानचे विविध कामांसाठी २.००% पेक्षा कमी दराने खालील आर्कीटेक्ट सेवा देत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | आर्कीटेक्टचे नाव | फी दराची टक्केवारी (प्रकल्प किंमतीच्या) | अंदाजे फीची रक्कम (रु.९०,४९,६२५/- रकमेवर) |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईनाथ रुग्णालयाचे टॉयलेट नूतनीकरण करणे. | इनजिनियिस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव | ०.५% | ४५,२४८/- |
| ०२ | श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर मजल्याचे बांधकाम करणे | निकम पा. असोशिएट्स, श्रीरामपूर | १.००% | ९०,४९६/- |
| ०३ | भांडार इमारतीचे बांधकाम करणे. | बिनेश सुकुमार, कोची | १.००% | ९०,४९६/- |
| ०४ | शैक्षणिक संकुल इमारतींचे बांधकाम. | डी. ओ. निकम, पुणे | १.२५% | १,१३,१२०/- |
| ०५ | लाडू प्रसाद युनिटसाठी बांधकाम करणे. | सुशील देशमुख औरंगाबाद | १.९५% | १,७६,४६८/- |
| ०६ | साई नॉलेज पार्क प्रकल्प | संदीप शिक्रे अँड असो. मुंबई | ०.०० % | ०.०० |

वरील पैकी श्री साईनाथ रुग्णालयाचे परीसरातचउपरोक्त काम असल्याने, आर्कीटेक्ट इनजिनियिस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव यांचेकडून त्यांचे मंजुर फी दराने सदरचे काम करून घेता येईल असे नमूद करून उपरोक्त बांधकामाचे प्लॅन,इस्टीमेट व आराखडे तयार करणेसाठी अ) आर्कीटेक्ट/ सल्लागार नेमणेकामीविहीत ई-प्रस्ताव प्रक्रिया राबवून आर्कीटेक्ट / सल्लागार नेमणे.अथवा ब) इनजिनियिस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव यांचेकडून त्यांचे ०.५% या मंजुर फी दराने काम करून घेणे याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेत सादर करणेत आला असता त्यावर वरीलप्रमाणे निर्णय क्र.४८७ संमत झाला आहे.

त्यानुसार सदरहु सबस्टेशन व जनरेटरसाठी बांधकाम करणे, कामी आर्कीटेक्ट/ सल्लागार नेमणे का आवश्यक आहे? यासह अपेक्षित असलेल्या बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

शिर्डी नगरपंचायतकडून बांधकाम परवानगी घेणेकामी बांधकाम आराखडे व डिटेल वर्कींग ड्रॉइंग तयार करणेसाठी आर्कीटेक्ट नेमणे आवश्यक आहे. तसेच आर्कीटेक्ट यांचे Scope of work मध्ये Structural Engineer यांच्या सेवांचा समावेश करता येईल.

सदरच्या १०१० के.व्ही.ए. जनसेट ०२ नग व २५०० के.व्ही.ए. सबस्टेशनचे इमारतीची उंची ६ मी. असल्याने व व्हायब्रेशनचे अनुषंगाने खाली नमूद केलेल्या DESIGN CRITERIA FOR GENERATOR ROOM AND GENERATOR FOUNDATION विषयक बाबी विचारात घेऊन आर्कीटेक्ट / स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे मार्फत डिझाईन व ड्रॉइंग तयार करुन घेणे आवश्यक आहे.

The horizontal eccentricity, in any direction, between the centre of gravity of the machine foundation system and the centroid of the foundation soil contact area shall not exceed 5% of the respective foundation dimension.

Machinery foundations shall be independent of building foundations. Surrounding concrete slabs or paving shall be separated from the machinery foundations by a 12 mm joint formed with compressible material and sealed with an approved elastic sealant.

Foundations shall be designed such that the natural frequency of the foundation/soil system is either less than 0.8 or greater than 1.2 times the operating frequency of the machine.

The machine foundation vibration must be limited to amplitude within the acceptable range which is less than 0.2mm as per IS 2974.

Except where other wise determined by the Project Director, foundations for machinery with a total machine weight of more than 2500Kg shall be designed for static and dynamic loads. The Design shall normally include a full dynamic analysis of the foundation system.

The effect of vibration on other structures transmitted via soil and ground water, allowing for water table fluctuation, shall be checked and taken into consideration during the design stage.

The underside of foundations shall be above the water table wherever possible and should rest neither on previously back filled soil nor on soil sensitive to vibration. In cases where it is necessary for the foundation to bear on back fill, the back fill shall meet the select fill requirements as specified in Geo-technical Report and must be compacted to 95% Standard Proctor Density.

Building should be design for Crane moments and gantry loads if any.

प्रस्ताव : उपरोक्त कामे करणेसाठी आर्कीटेक्ट/सल्लागार नेमणेसाठी खालील पर्यायांवर निर्णय होणे आवश्यक आहे.

अ) वर नमूद केलेल्यापैकी निम्नतम दराचे आर्कीटेक्ट सेवा देणेस तयार असल्यास त्यांचेकडून त्यांचे मंजुर फी दराने काम करून घेणे. अथवा

ब) विहीत पद्धतीने कोटेशन मागवून आर्कीटेक्चरल सल्लागार नेमणे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीक लोडकरीता सबस्टेशन व जनरेटरसाठी इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्कीटेक्ट म्हणून (Structural Design सह) श्री साईनाथ रुग्णालयाचे टॉयलेट नूतनीकरण करणेकामी नियुक्त करण्यात आलेले आर्किटेक्ट इनजिनियिस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव यांची प्रकल्प किंमतीच्या ०.५% या मंजुर फी दराने नियुक्ती करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०७** **साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन-निर्गमन करणे सोयीचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात बदल केलेप्रमाणे पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणेस व त्यासाठी येणाऱ्या रु.४.७५ लक्ष मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियम कलम २१मधील पोट कलम (१) (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी देश विदेशातून लाखो साईभक्त शिर्डीला येतात. श्री साईबाबा संस्थानने साईभक्तांसाठी शिर्डी व परिसरामध्ये मोठया प्रमाणावर सुविधा व नवनविन प्रकल्प उभारलेले आहेत. यामध्ये मंदिर परिसर नुतनीकरणाचे महत्वाचे काम संस्थानने पूर्ण केले आहे. साईभक्तांना मंदिर परिसरात सहजतेने ये-जा करणेसाठी ०५ गेटची निर्मिती केलेली असून या सर्व गेटला अनुक्रमे गेट नं. ०१ ते गेट नं. ०५ असे क्रमांक दिलेले आहेत. साईभक्तांचे सुलभ माहितीकरीता मंदिर परिसराचे सर्व गेटचे अस्तित्वातील नंबर बदलून त्याऐवजी खालीलप्रमाणे नावांचा वापर केल्यास साईभक्तांना सदर गेटची सुलभतेने माहिती होईल. याशिवाय गेटचे अशा स्वरुपाचे नामकरण केल्यास साईभक्तांना ही नावे मंदिर परिसरातील पवित्र श्रध्दास्थानांशी निगडीत असल्याने लक्षात ठेवण्यास सोपे जाईल. याबाबत काही साईभक्तांनी समक्ष भेटून तोंडी सुचना केल्या आहेत.

| अ.नं. | सध्याचे नाव | करावयाचा नाम निर्देश |
|---|---|---|
| ०१ | गेट नं. ०१ | श्रध्दा व्दार SHRADDHA GATE |
| ०२ | गेट नं. ०२ | अभिषेक व्दार ABHISHEK GATE |

| | | |
|---|---|---|
| ०३ | गेट नं. ०३ | व्दारकामाई व्दार DWARKAMAI GATE |
| ०४ | गेट नं. ०४ | गुरुस्थान व्दार GURUSTHAN GATE |
| ०५ | गेट नं. ०५ | सबुरी व्दार SABURI GATE |
| ०६ | शनि गेट | शनीमहाराज व्दार SHANIMAHARAJ GATE |

वर नमूद तक्त्यात दर्शविलेनुसार पितळी अक्षरात तयार करावयाचे बोर्ड व त्यासाठी अपेक्षित अंदाजे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) ओतिव पितळी अक्षरेः- साईज - ६" एकूण इंग्रजी अक्षरे - ७६ नग
एकूण मराठी अक्षरे - ४५ नग
काना, मात्रा, वेलांटी – २५ नग

२) एम. एस. बोर्डः- CRCA Sheet व Square Pipe Frame मध्ये
साईज १) ८ फुट x २ फुट – ०५ नग
२) १० फुट x २ फुट – ०१ नग

उपरोक्त नमूद ०१ व ०२ साठी एकूण अंदाजे रु.४.७५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

प्रस्ताव:- तरी साईभक्तांचे सुलभ माहितीकरीता मंदिरपरिसराच्या सर्व प्रवेशव्दारांच्या नावात उपरोक्त तक्त्यात नमूद केलेले एम एस बोर्डवर पितळी अक्षरातील नवीन बोर्ड तयार करुन बसविणेस व त्यासाठी अपेक्षीत अंदाजे रु.४.७५ लक्ष मात्रचे खर्चास तसेच याकामी ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०७** **यावर सविस्तर व सखोल चर्चा झाली, साईभक्तांनी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचेकडे वेळोवेळी तोंडी सुचना केल्या आहेत की, मंदिर परिसरामध्ये येणे किंवा जाणेसाठी असलेल्या ५ दारांना नावे नाहीत. समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने हरवलेल्या व्यक्तींबाबत विविध सुचना तसेच उपाय योजना करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.**

**समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, गेट नं.१ व गेट नं.५ हे शेजारी-शेजारी असल्याने गेट नं.१ यास "श्रध्दा व्दार" व गेट नं. ५ यास "सबुरी व्दार" असे नाव देणे उचित होईल. गेट नं.२ यास "अभिषेक व्दार" असे नाव सुचविलेले आहे. मात्र त्यास काहीही दाखला नाही. अशा परिस्थतीत गेट क्र.२ यास "साईबाबा व्दार" असे नाव दिल्यास उचित होईल, असे सर्वानुमते ठरले. तसेच गेट नं.३ पासून व्दारकामाई जवळ आहे व गेट नं.४ पासून गुरुस्थान जवळ आहे. त्यामुळे गेट नं.३ यास "व्दारकामाई व्दार" व गेट नं.४ यास "गुरुस्थान व्दार" असे नाव देणे उचित होईल. तसेच गेट नं.६ यास शनिगेट हे नाव प्रचलित आहे, अशा परिस्थीतीत त्यास "शनिमहाराज व्दार" नाव देण्यास कुठलीही हरकत येण्याची शक्यता नाही.**

**वरील सर्व बाबींचा सर्वंकष विचार करुन साईभक्तांना मंदिर परिसरात आगमन-निर्गमन करणे सोयीचे व्हावे व सुलभरित्या माहिती व्हावी याकरीता मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात उपरोक्त प्रमाणे बदल करणेस व पितळी अक्षरात नविन बोर्ड तयार करुन बसविणेस तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.४.७५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा मंदिर परिसराचे नाम फलकावरील इंग्रजी नावामध्ये "SHREE SAIBABA MANDIR AREA" असा बदल करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६३,०००/-मात्रचे अपेक्षीत खर्चास व कोटेशन मागविणेकरीता मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

आणि या अधिनियमान्वये *विश्वस्तव्यवस्थेचा* कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियम कलम २१ मधील पोट कलम (१) (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी देश विदेशातून लाखो साईभक्त शिर्डीला येतात. श्री साईबाबा संस्थानने साईभक्तांसाठी शिर्डी व परिसरामध्ये मोठया प्रमाणावर सुविधा व नवनविन प्रकल्प उभारलेले आहेत. यामध्ये मंदिर परिसर नुतनीकरणाचे महत्वाचे काम संस्थानने पूर्वीच पूर्ण केले आहे. समाधी मंदिर परिसराचे नावाचे फलक नगर-मनमाड रस्त्यासन्मुख कम्पाऊंड ग्रीलवर लावण्यात आलेले आहेत. त्यापैकी इंग्रजी फलकांचा तपाशिल खालीलप्रमाणे आहे.

०१) एलईडी बॅकलीट फलक : SHREE SAIBABA MANDIR COMPLEX

०२) पितळी अक्षरांचा फलक : SHREE SAIBABA TEMPLE COMPLEX

वर नमूद इंग्रजी फलकावरील पितळी अक्षरातील TEMPLE या नावाऐवजी MANDIR असे करणे तसेच दोन्ही फलकांवरील COMPLEX या नावाऐवजी AREA असे करणेबाबत तोंडी सूचना काही साईभक्तांनी समक्ष भेटून केलेली आहे. त्यानुसार वरील दोन्हीही फलकांवर इंग्रजी नावामध्ये “SHREE SAIBABA MANDIR AREA” असा बदल करणे संयुक्तिक होईल असे मत आहे. यासाठी MANDIR व AREA ही अक्षरे सध्याचे बोर्डवर लावणेसाठी अंदाजे रु.६३,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव– तरी वर नमूद फलकावरील इंग्रजी नावांमध्ये “SHREE SAIBABA MANDIR AREA” असा बदल करणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.६३,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास व याकामी कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे नाम फलकावरील इंग्रजी नावामध्ये “SHREE SAIBABA MANDIR AREA” असा बदल करणेस तसेच याकामी एलईडी बॅकलीट फलक व पितळी अक्षरांचा फलक तयार करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.६३,०००/-मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील पी.आय.एल.क्र.१२०/२०१९ श्री.उत्तमराव रंभाजी शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मधील दि.०९.१०.२०१९ चे आदेशातील पॅरा नं.१७ मध्ये नमुद केलेले शिर्डी–औरंगाबाद या रस्त्याचे कामाबाबत सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक/ औरंगाबाद यांचेकडील प्राप्त माहितीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूदः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियम २००४ मधील तरतूदः अधिनियम २१ (क) पोट कलम (१) नंतर खालीलप्रमाणे तरतूद आहे.“(१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोईसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय महामंडळांना शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय – दि.०७/११/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७६.

“.. शिर्डी- औरंगाबाद (घोटी-नागपूर महामार्ग) या महामार्गावर ब-याच ठिकाणी खड्डे पडलेले असून औरंगाबाद मार्गे शिर्डी कडे येणा-या साईभक्तांना याचा त्रास होत आहे. सदरचा महामार्ग अहमदनगर व औरंगाबाद या दोन्ही जिल्ह्यांच्या हद्दीमध्ये आहे. सदरचा महामार्ग दुरूस्तीबाबत शासनस्तरावर काही प्रयोजन आहे किंवा काय ? तसेच आर्थिक तरतूद केलेली आहे किंवा कसे याबाबत संस्थानचे बांधकाम विभागाने दोनही जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तसेच Highway विभागाकडे पत्रव्यवहार करून माहित घ्यावी व त्यांनतर सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा असे ठरले.”

प्रस्तावना– मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील पी.आय.एल क्र.१२०/२०१९ श्री.उत्तमराव रंभाजी शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मधील दि.०९/१०/२०१९ चे आदेशातील पॅरा नं.१६

व १७ मध्ये नमूद केलेले औरंगाबाद-शिर्डी रस्त्याची दुरुस्ती/ मजबुतीकरण इत्यादी आवश्यक कामे हाती घेणेबाबत तसेच सदर काम हाती घ्यावयाचे नियोजन असल्यास ते कधी सुरु होणार व कधी पूर्ण होणार याबाबतचे माहितीसह सदरहु रस्त्याचे कामाबाबतची सद्यस्थिती व निधिची उपलब्धता याबाबतची माहिती मिळणेसाठी संस्थानमार्फत जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/३१०२/२०१९ दि.१३/११/२०१९ अन्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद व नाशिक यांना पत्र देणेत आलेले आहे.

(अ) सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्या अखत्यारीतील रस्त्यांबाबतचा अहवाल- संस्थानचे पत्र पुढील कार्यवाहीस्तव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांचेकडे हस्तांतरीत केले असून त्याची प्रत संस्थानला दिलेली होती. संस्थानचे उपरोक्त पत्रावर सुरु असलेल्या कार्यावाहीची माहिती घेणेसाठी, दि.१०/१२/२०१९ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय तसेच अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांचे कार्यालयात संस्थानमार्फत उपअभियंता श्री.देसाई यांना पाठविणेत आले होते. त्यांनी दोन्ही कार्यालयातून संबधीत कामासंबंधी माहिती घेतली.

सदर कामाचे कार्यवाहीबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ यांनी दि.०२/१२/२०१९ रोजी अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांना अग्रेषित केलेल्या पत्राची छायांकित प्रत माहितीसाठी दिलेली असून त्यामध्ये, “मा.उच्च न्यायलय मुंबई खंडपीठ,औरंगाबाद यांच्या आदेशाने कळविल्यानुसार औरंगाबाद ते कोपरगाव (शिर्डी) पर्यंत रस्तयाची एकूण लांबी ११८ कि.मी आहे. त्यामध्ये रा.म.मंडळ, औरंगाबाद यांचेकडे रस्त्याची १०१ कि.मी लांबी असून उर्वरीत १७ कि.मी लांबी रा.म.मंडळ, पुणे यांचेकडे आहे. राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांच्याकडे औरंगाबाद ते शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र.(७५२) अंतर्गत एकूण १०१ कि.मी.ची हद्द असून, सदर हद्दीमध्ये कि.मी ५९/०० ते ११४/०० मध्ये (PR) अंतर्गत औरंगाबाद ते लासुर पर्यंत काम करण्यात आलेले आहे. कि.मी.१७/०० ते कि.मी.५९/०० मध्ये (Potholes) खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तसेच कि.मी.२९/०० ते ५९/०० मध्ये एकूण १५ कि.मी. (PR) चे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर कामाचे निविदा EPC अंतर्गत काढण्यात आलेली आहे. उर्वरीत एकूण ४२ कि.मी पैकी २७ कि.मी लांबीमध्ये मजबुतीकरणाचे काम प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्तावास मान्यता मिळताच सदर काम तात्काळ सुरु करुन जून २०२० मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.” असे नमूद केलेले आहे.

(ब) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्या अखत्यारीतील रस्त्यांबाबतचा अहवाल-संस्थानचे दि.१३/११/२०१९ रोजीचे पत्रास अनुसरुन संदर्भ क्र.०२ अन्वये सहा.मुख्य अभियांता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांचा दि.१०/१२/२०१९ रोजीचा अहवाल माहितीस्तव संस्थानला पाठविला आहे. सदर पत्रात, “शिर्डी औरंगाबाद रस्त्याच्या सद्यस्थिती व दुरुस्तीच्या नियोजनाची माहिती सादर करणेबाबत सहा.मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील दि.१८/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये सुचना देण्यात आलेल आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे. –

या विभागांतर्गत असलेले कोपरगाव अहमदनगर या प्र.रा.मा.०८ दर्जाच्या रस्त्याची किती ८१/८०० (पुणतांबा फाटा) ते ९२/८०० (शिर्डी बसस्थानक) ही ११ किमी लांबी विषयांकित शिर्डी औरंगाबाद रस्त्याचा भाग आहे. सदर लांबीतील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरुन सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम बीओटी तत्वावर मे.सुप्रिम इन्फ्रा.इं.प्रा.लि.,मुंबई यांचेमार्फत करण्यात आलेला असून सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणे उद्योजकास बंधनकारक आहे. सदर प्रकल्पाची अधिसुचना कालावधी दि.१२/१२/२०१९ पर्यंत मंजूर असून पुढे त्यास मुदतवाढ न मिळाल्यास शासनाकडून मिळणा-या निधिच्या उपलब्धतेनुसार विभागामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येईल.

तसेच सा.बां.उपविभाग, कोपरगांव यांचेकडून प्राप्त माहितीनुसार पुणतांबा फाटा ते तळेगाव मळे विषयांकित रस्त्यापैकी ही २९ कि.मी. लांबी सा.बां.उपविभाग, कोपरगाव यांचे कार्यक्षेत्रात असून सदर लांबीपैकी १० कि.मी. लांबीतील खड्डे भरण्यात आले असून उर्वरित लांबीतील खड्डे भरणे प्रगतीत असल्याचे कळविले आहे.” असे नमूद केलेले आहे.

प्रस्ताव– तरी सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक व औरंगाबाद यांचेकडून प्राप्त माहिती पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.०९** **यावर सविस्तर चर्चा झाली, समिती समोर महाराष्ट्र शासनाचे मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक/औरंगाबाद, राष्ट्रीय महामार्ग, औरंगाबाद यांचेशी झालेला पत्रव्यवहार दाखविणेत आला. यावरुन असे निदर्शनास येते की, राष्ट्रीय महामार्ग औरंगाबाद विभागातील कि.मी.१७ ते कि.मी.५९ या ४२ कि.मी. अंतरातील रस्ता वगळता उर्वरीत रस्त्यांची दुरुस्ती संबधीत विभागामार्फत चालू आहे. उपरोक्त ४२ कि.मी. रस्त्याचे कोणत्या भागात कोणत्या स्वरुपाचे दुरुस्तीचे काम गरजेचे आहे. त्या दुरुस्ती कामाचा तपशील काय आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षीत आहे, काम पुर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षीत आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागविणेत यावा, असे ठरले.**

**तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, श्रीरामपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.श्री.लहु कानडे यांनी जनहीत याचिका नं.१२०/२०१९ चे संदर्भाने नेवासा फाटा ते बाभळेश्वर या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करणेबाबत विनंती केली आहे. अशाच आशयाची विनंती श्री.केतन खोरे यांनीही केलेली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग यांचेकडून सविस्तर अहवाल व अंदाजे खर्च याची माहिती मागविण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **आर्थिक वर्ष २०१९-२० करीता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ माहिती प्रसिध्द करुन आलेले प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील कलम १७(०२) (ग) अन्वये, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतच्या वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करिल, तसेच कलम २९ (१) मध्ये ''समिती त्या विश्वस्तव्यस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० सप्टेबरच्या आत सादर करील. '' अशी तरतुद आहे.

तसेच सासंवि-२००९/२५४/(१५)-का-सोळा दि.१६ जुलै,२००९ रोजीचे शासन पत्रान्वये ''संस्थानच्या पुढील लेखापरिक्षणाकरिता मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी पथितयश वर्तमानपत्रांत संस्थानच्या लेखापरिक्षकासंबधी आवश्यक अटींसह जाहिरात देऊन तीन लेखापरिक्षकांची नावे अंतिमतः निवडीकरिता शासनाकडे पाठवावी '' असे कळविण्यात आले होते.

अधिनियमातील तरतुदीस व सासंवि-२००९/२५४/(१५)-का-सोळा दि.१६ जुलै,२००९ रोजीचे शासन पत्रास अनुसरुन वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी करिता संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येऊन आलेले प्रस्ताव खरेदी समितीचे सभेत उघडून पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी नुसार तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला जातो. वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी करिता सदर प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येतो. अशाप्रकारे मागील ०३ आर्थिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता मे.मुकुंद एम चितळे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन विधी व न्याय विभागामार्फत रु.१,७७,०००/- इतकी फी तसेच प्रत्यक्ष अनुषंगिक खर्च इतक्या मानधनावर करण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०१९-२० लवकरच पुर्ण होत असुन, वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी कामी निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणः ५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत प्राप्त झालेले प्रस्ताव खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, आलेले प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१९-२० करीता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणः ५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विहीत वेळेत प्राप्त झालेले प्रस्ताव खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फीचा तुलनात्मक तक्ता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, समितीचे मान्यतेनंतर आलेले प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.११** **सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन आलेले प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो.अंतर्गत लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार म्हणुन बाहेरील सक्षम संस्थेच्या नेमणुका करण्यात येतात.

अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक मा.विधी व न्याय विभागामार्फत करण्यात येते. तथापी सासंवि-२०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का.१६/दि.०८.११.२०१७ चे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करिल, अशी तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुद विचारात घेता श्री साईबाबा संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीप्रमाणेच अंतर्गत लेखा परिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेनेच करणे आवश्यक आहे. सबब, याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी." असे कळविले आहे.

शासन आदेश क्र.सासंवि-१०१९/३२४/प्र.क्र.५७/का.१६, दि.०८.०८.२०१९ अन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता संस्थान, रुग्णालये विभाग, याकरिता मे.सुनिल अभ्यंकर अॅन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची वार्षिक फी रू.६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) अधिक इतर कर व अनुषंगिक खर्च इतक्या मानधनावर अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०१९-२० लवकरच पुर्ण होत असुन, अंतर्गत लेखापरिक्षक नेमणुकी कामी निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणः ५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत प्राप्त झालेले प्रस्ताव खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, आलेले प्रस्ताव अंतर्गत लेखापरिक्षक नेमणुक होणेकामी मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणः ५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विहीत वेळेत प्राप्त झालेले प्रस्ताव खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, समितीचे मान्यतेने आलेले प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१२** **संस्थान संबंधीत आयकर, व्हॅट, व सेवाकर विषयक कामकाजाबाबत सद्यस्थिती.**

**प्रस्ताव-** संस्थानला आयकर विभाग, विक्रीकर विभाग व सेवाकर विभागामार्फत कर वसुली संबंधीत नोटीसा प्राप्त झाल्या असुन बाबत दि.३०.०१.२०१९ रोजी सद्यस्थिती आढावा अवलोकनार्थ सादर करण्यात आला होता. करविषयक प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे वेळोवळी सादर करण्यात येऊन कार्यवाही करण्यात आली असुन सध्या करविषयक कामकाजाचा आढावा खालीलप्रमाणे आहे.

अ)मुल्यवर्धीत कर (MVAT) :-

१. संस्थानला विक्रीकर लागु नसल्याने व्हॅटकर लागु होणार नाही. बाबत विक्रीकर आयुक्त व न्यायाधिकरण, मुंबई येथे सन २००७ साली अपिल दाखल करण्यात आले होते.

२. बाब न्यायप्रविष्ट असतांना दरम्यानच्या कालावधीमध्ये दि.१४.०३.२०१७ रोजी विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांनी आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ चे व्हॅट करनिर्धारण करणेकामी नोटीस दिली होती.

३. विक्रीकर विभागाने लेखापरिक्षण अहवालावरुन आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट करनिर्धारण करुन व्हॅटकर, व्याज व दंड असा रु.२४,२६,२४,४२४/- कोटी देय कर दि.२७.०३.२०१८ रोजीचे नोटीसद्वारे कळविला होता.

४. विक्रीकर न्यायाधिकरणाचा निर्णय प्राप्त होईपर्यंत कर वसुलीस स्थगिती मिळावी म्हणुन मा.उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद येथे रिट अर्ज दाखल केला होता.

५. विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.०७.०९.२०१८ रोजी संस्थान Deemed Dealer असलेबाबत निर्णय दिला.

६. विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई यांचे निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.१७.१०.२०१८ रोजी अपिल अर्ज दाखल करण्यात आला. त्यावर सुनावणी दि.२१.११.२०१८ रोजी सुनावणी झाली व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अपिल दाखल करुन घेतले.

७. दरम्यानच्या कालावधीत विक्रीकर कार्यालयाने आर्थिक वर्ष २०१०-११ चे सुद्धा व्हॅट करनिर्धारण करुन दि.२५.०३.२०१८ रोजी व्हॅटकर, व्याज व दंड अशी एकुण रु.२१,००,२८,८८४/- देय असलेबाबत आदेश केला.

८. विक्रीकर माफी मिळणेकरिता मा.मुख्यमंत्री, मा.वित्त मंत्री, मा.आयुक्त, राज्य कर, विक्रीकर विभाग, महाराष्ट्र राज्य यांना मा.अध्यक्ष यांचे स्वाक्षरीने वेळोवेळी पत्रव्यवहाराद्वारे कळविण्यात आले. अंतिमतः विक्री करातुन सुट मिळत नाही हे दिसुन आले.

९. शासनाने दि.०३.०५.२०१९ रोजी सरसकट माफी योजना (Amnesty Scheme) जाहीर केली. विक्रीकर विभागाने दि.०६.०५.२०१९ रोजी Amnesty Scheme अंतर्गत एकुण व्हॅटकर, व्याज व दंड अशी एकुण रु.२१६,९३,४०,१२५/- व्हॅटकर व त्यामधुन सदर योजनेअंतर्गत व्हॅटकर, व्याज व दंड यामध्ये मिळणारी सवलत रु.१४६,५०,५९,७९३/- वजा जाता रु.७०,४२,८०,३३२/- भरणेबाबत Courtesy Letter दिले व मा.सह आयुक्त विक्रीकर विभाग व विक्रीकर अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेच्या दिवशी प्रत्यक्ष भेट देऊन चर्चा-विचारविनिमय केला.

१०. मा.व्य.स. निर्णय क्र.१७६ व १७७/दि.०६.०६.२०१९ अन्वये आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ विरुद्ध अपिलात जाणेबाबत मान्यता मिळाली.

११. मा.विक्रीकर विभागाने दि.२५.०७.२०१९ रोजी ई-मेलद्वारे पुन्हा Courtesy Letter देऊन आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर एकुण व्हॅटकर, व्याज व दंड अशी एकुण रु.१०९,७७,८५,४१३/- यामधुन Amnesty Scheme योजनेअंतर्गत लाभ रु.७५,३०,८२,७८१/- वजा जाता रु.३४,४७,०२,६३२/-अंतिमतः भरणेबाबत कळविले.

१२. आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल दाखल करण्यात येऊन व्हॅटकर कमी होऊन दि.०१.०४.२००९ ते दि.३०.०६.२०१७ अखेर रु.२६,७०,०९,३४४/- रक्कम भरणेबाबत विक्रीकर विभागाने कळविले. मा.व्य.स. निर्णय क्र.४२९/दि.२६.०७.२०१९ अन्वये सदर रक्कम भरण्यास मान्यता मिळाली. विहीत पद्धतीने Amnesty Scheme योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात दि.३१.०७.२०१९ रोजी भरणा करण्यात आला.

१३. विक्रीकर विभागाने भरणा करण्यात आलेली रक्कम गृहीत धरुन प्रत्यक्ष वर्षनिहाय आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर व्हॅट करनिर्धारणे करुन व्हॅटकर दरात झालेली वाढ, अनोंदणीकृत विक्रेता

म्हणुन व्याज दर आकारणीत वाढ यामुळे रु.१,४८,२२,७५७/- करनिर्धारण आदेशापोटी Amnesty Scheme अंतर्गत दुस-या टप्प्यात दि.३१.०८.२०१९ अखेर भरणेबाबत सुचविले.

१४. मा.व्य.स. निर्णय क्र./दि.२१.०८.२०१९ अन्वये रु.१,४८,२२,७५७/- भरणा करण्यास मान्यता मिळाली. त्यास अनुसरुन दि.२३.०८.२०१९ अखेर विक्रीकर विभागाकडे विहीत पद्धतीने ऑनलाईन चलनांद्वारे भरणा करण्यात आला.

१५. अशाप्रकारे व्हॅटकर Amnesty Scheme अंतर्गत पहिल्या व दुस-या टप्प्यात एकुण रु.२८,१८,३२,१००/- भरणा करण्यात आलेबाबत विक्रीकर विभागाने Settlement Order पारीत केल्या असुन दि.२८.०८.२०१९ रोजी दि.०१.०४.२००९ ते दि.३०.०६.२०१७ या कालावधीकरिता ना-बाकी दाखला (MVAT Clearance Certificate) दिले आहे.

ब) आयकर (Income Tax) :-

१. करनिर्धारण वर्ष २०१५-१६:- दि.३१.१२.२०१७ रोजी मा.उपायुक्त, आयकर, मुंबई यांनी करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे करनिर्धारण व फेर करनिर्धारण करुन रु.१२२ कोटी देय कर असलेबाबत नोटीस पाठविली होती. यामध्ये संस्थान धार्मिक नसुन धर्मादाय असल्यामुळे दक्षिणा पेटीमध्ये प्राप्त झालेल्या रक्कमेवर आयकर, कॉर्पस फंड रक्कमेवर मिळालेले व्याज व अखर्चित उत्पन्न विनियोग रक्कमेवर फॉर्म नं.१० कर सल्लागारांनी ऑनलाईन दाखल केला नाही या सर्वांचा समावेश असुन एकुण तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | आयकर रक्कम | ८२,१२,५२,००९/- |
| २ | सरचार्ज | ८,२१,२५,२०१/- |
| ३ | एज्युकेशन सेस | २,७१,०१,३१६/- |
| ४ | विलंब व्याज | ३०,२८,२१,३६५/- |
| ५ | वजा – मुळातून करकपात | -१,२८,३८,०४७/- |
| | **एकुण देय कर** | **१२२,०४,६१,८४४/-** |

सदर नोटीस विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर सुनावणी होऊन आयकर विभागाने फेर करनिर्धारण करण्यात येऊन आयकर लवादाकडे अपिल दाखल करण्याचा व स्टे करिता आयकर विभागाकडे प्रस्ताव देण्याचा निर्णय दिला होता. त्यास मा.आयकर आयुक्त (अपिल) यांचेकडे दि.०८.०३.२०१९ रोजी अपिल अर्ज दाखल करण्यात आला असुन त्यावर अद्याप आयकर विभागाकडून सुनावणी सुरु झालेली नाही. बाबत, सीए दिपक टिकेकर, मुंबई कामकाज करत आहेत.

२. करनिर्धारणवर्ष २०१३-१४:- करनिर्धारणवर्ष २०१३-१४चे करनिर्धारण होऊन देय कर नसलेबाबत दि.२४.११.२०१६ रोजी करनिर्धारण आदेश दिला होता. तथापि,फेर करनिर्धारण करणेबाबत आयकर विभागाने दि.१९.०३.२०१९ रोजी नोटीस दिली होती.यामध्ये संस्थान धार्मिक नसुन धर्मादाय असल्यामुळे दक्षिणा पेटीमध्ये प्राप्त झालेल्या रक्कमेवर आयकर, ट्रस्टला Income from House PropertyStandard Deduction, रुग्णालये विभाग व शैक्षणिक संकुलाची वार्षिक जमा रक्कम, कॉर्पस फंड रक्कमेवर मिळालेले व्याज व अखर्चित उत्पन्न विनियोग रक्कमेवर फॉर्म नं.१० कर सल्लागारांनी ऑनलाईन दाखल केला नाही या सर्वांचा समावेश असुन एकुण तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | आयकर रक्कम | ७२,७४,७५,०४४/- |
| २ | सरचार्ज | --- |
| ३ | एज्युकेशन सेस | २,१८,२४,२५१/- |
| ४ | विलंब व्याज | ५३,७५,११,५३६/- |
| ५ | वजा – मुळातून करकपात | --- |
| | **एकुण देय कर** | **१२८,६८,१०,८३१/-** |

बाबत मा.उच्च न्यायालयात दि.१९.०९.२०१८ रोजी रिट अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर सुनावणी होऊन दि.२४.१०.२०१८ रोजी फेर करनिर्धारण करणेबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश केला. सदर आदेशाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालय येथे दि.१६.११.२०१८ रोजी Special Leave Petition दाखल करण्यात आले होते. त्यावर दि.३०.११.२०१८ व दि.१८.०१.२०१९ रोजी सुनावणी होऊन करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणेबाबत व करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे अपिल हे दोन्हीही एकावेळेस सुनावणी करावी व तोपर्यंत कर भरण्याकरिता स्टे मिळाला होता. त्यास अनुसरुन करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणेबाबत आवश्यक माहिती सादर करण्यात आली होती. त्यानंतर आयकर विभागाने दि.१९.०३.२०१९ रोजी रु.१२८,७८,९७,५८०/- देयकर असलेबाबत करनिर्धारण आदेश दिला. सदर आदेशापोटी दि.१७.०४.२०१९ रोजी कमिशनर, आयकर विभाग यांचेकडे अपिल दाखल करण्यात आले आहे.

३. अशाप्रकारे करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे अपिल कमिशनर, आयकर विभाग यांचेकडे दाखल करण्यात आले असुन सीए दिपक टिकेकर व सीए आर.आर. मुनी सदर कामकाज पाहत आहेत. अद्याप सुनावण्या झाल्या नसुन बाब न्यायप्रविष्ट आहे.

४. करनिर्धारणवर्ष २०१४-१५:- करनिर्धारणवर्ष २०१४-१५चे करनिर्धारण होऊन दि.२४.११.२०१६ रोजी देय कर नसलेबाबत करनिर्धारण आदेश झाला आहे. तथापि, आयकर विभागाने दि.३१.०३.२०१९, दि.२१.०५.२०१९ व दि.१९.११.२०१९ रोजी फेर करनिर्धारणासंबंधी आणखी कागदपत्रे मागविली आहेत. दि.०४.१२.२०१९ रोजी फेर करनिर्धारण करण्यायोग्य नसल्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तथापि, आयकर विभागाकडून दि.३१.१२.२०१९ पूर्वी करनिर्धारण करण्याचे नियोजन दिसून येत आहे. संस्थानचे कर सल्लागार सीए आर.आर. मुनी, मुंबई यांचेमार्फत कागदपत्रे संकलित करुन सादर करण्याचे कामकाज चालू आहे.

५. करनिर्धारण वर्ष २०१७-१८चे करनिर्धारण करणेबाबत आयकर विभागाने दि.०१.०२.२०१९ रोजी नोटीस दिली असुन आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत दि.०८.०२.२०१९ मुदत दिली होती. त्यास अनुसरुन दि.०८.०२.२०१९ रोजी नोटीस पैकी जास्तीत जास्तीत कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच दि.२१.०८.२०१९ रोजी आयकर विभागाने पुन्हा उपरोक्तप्रमाणे नोटीस दिली असुन दि.२६.०८.२०१९ रोजी कागदपत्रे सादर करणेबाबत कळविले होते. नोटीसमध्ये नमुद केलेली माहिती क्लिष्ट स्वरुपाची व मोठया प्रमाणावर असल्याने माहिती सादर करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी मिळणेबाबत ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०५.०९.२०१९ रोजी करनिर्धारणसंबंधीत कामकाज पाहणारे सीए आर.आर. मुनी, मुंबई यांचे नांवे अधिकारपत्र देण्यात आले असुन प्राप्त नोटीस संबंधीचे कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. त्यानुसार पढील कार्यवाही सुरु आहे.

६. करनिर्धारण वर्ष २०१८-१९चे फेर आयकर विवरणपत्र दि.३०.०३.२०१९ रोजी ऑनलाईन पद्धतीनेआयकर विभागास दाखल करण्यात आले आहे. आयकर विभागाकडून दि.२२.०९.२०१९ रोजीचे नोटीसीद्वारे संस्थानचे Accumulation of Income by Trust, Receipts of Trust & Refund Claim बाबतची माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करणेबाबत कळविले. संस्थान कर सल्लागार सीए आर.आर. मुनी, मुंबई यांना करनिर्धारण वर्ष २०१८-१९ करिता संस्थानचेवतीने आयकर विभागाकडे माहिती सादर करण्याकरिता अधिकारपत्र देण्यात आले. त्यानुसार दि.०७.१०.२०१९ रोजी आयकर विभागास ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करण्यात आली आहे.

ब) सेवाकर (Service Tax):- सेवाकर कार्यालयामार्फत संस्थानला दि.२२.०४.२०१४ रोजी रु.१०.६१ कोटी सेवाकर भरणेबाबत Commissioner of Central Excise, Customs & Service Tax, Aurangabad विभागामार्फत नोटीस प्राप्त झाली होती. विहीत पद्धतीने मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने कार्यवाही करुन सीए श्रेणिक गांधी, पुणे यांचेमार्फत पत्रव्यवहार करुन व अंतिमतः कमिशनर, नाशिक यांचेसमोर करनिर्धारणासाठी आवश्यक पुर्तता केल्यानंतर रु.१,२१,९४,२५४/- सेवाकर देय आहे. यामध्ये लेझरव्हिजन मल्टिमिडीया थीम पार्क करिता घेतलेली विदेशी सेवा यावर रु.१,२१,०६,६८७/-, ऑनलाईन सेवा रु.३६,०१३/-, द्वारावती भक्तनिवास येथे काही कालावधीकरिता लागलेला सेवाकर रु.५१,३७४/- यांचा समावेश आहे. सदर कर नोटीसविरोधी Customs, Excise & Service Tax Appellate Tribunal, West Zone Bench, Mumbai येथे दि.१७.११.२०१५ रोजी अपिल दाखल करण्यात आले होते. सदर अपिलची सुनावणी दि.१०.०६.२०१९ व दि.०५.०८.२०१९ अशी होती. सेवाकर संबंधीत काम पाहणेबाबत सीए श्रेणिक गांधी, पुणे यांची मा.व्य.स. निर्णय क्र.४६९/दि.१५.०६.२०१७ अन्वये नियुक्ती करण्यात आली असुन ते विनामोबदला सेवाकर विषयक कामकाज करत आहेत.

सेवाकर कायद्यानेसुद्धा Amnesty Scheme दि.०१.०९.२०१९ पासून जाहीर केली आहे. संस्थान कर सल्लागार सीए, ॲड. श्रेणिक गांधी, पुणे यावर काम करत आहेत. Union Budget 2019-20 has proposed the SabkaVishwas (Legal Dispute Resolution) Scheme 2019 यामध्ये ५०% कर, व्याज व दंड यामध्ये सवलत प्रस्तावित आहे. कर सल्लागार सीए श्रेणिक गांधी, पुणे व मा.विश्वस्त कायदेतज्ञ समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांचे सल्ल्याप्रमाणे कामकाज चालु असुन सीए ॲड. श्रेणिक गांधी, पुणे यांनी सदर योजनेत देय होत असलेल्या सेवाकराचा तपशिल कळविला आहे तो खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | सेवाकर रक्कम (रु.१,२१,९४,२५४/- च्या ५०% ) | ६०,९७,१२७/- |
| २ | वजा अपिल करिता भरलेली रक्कम | -९,१४,५७०/- |
| | SVLDRS 2019 योजनेअंतर्गत एकुण देय सेवाकर | ५१,८२,५५७/- |

अशाप्रकारे SVLDRS 2019 योजने अंतर्गत रु.६०,९७,१२७/- सेवाकर अदायगीकरिता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे स्वतंत्र प्रस्ताव सादर केला आहे.

क) करविषयक कामकाज करणा-या लेखापरिक्षण संस्था, कर सल्लागार, विधिज्ञ यांचीमाहिती:–

| अ.नं. | कामाचे स्वरुप | लेखापरिक्षण संस्थेचे नांव | मा.व्य.स. निर्णय क्र. | फी चा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | वार्षिक आयकर विवरणपत्र दाखल करणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे, Scrutiny, करनिर्धारण, फेर करनिर्धारण इ. तसेच मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे विधिज्ञांकरिता आवश्यक माहिती सादर करणे. आवश्यकतेप्रमाणे हजर राहणे, | मे.आर.आर. मुनी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई | निर्णयक्र.१४५/ दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ | विनामोबदला तथापि, संस्थान आयकर कामकाजानिमित्त संस्थान भेटीचे वेळी मोफत निवास, प्रसाद भोजन, वाहन व प्रत्यक्ष खर्चाचा परतावा |
| २ | वार्षिक आयकर विवरणपत्र दाखल करणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे,Scrutiny, करनिर्धारण, फेर करनिर्धारण इ. तसेच मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे विधिज्ञांकरिता आवश्यक माहिती सादर करणे. आवश्यकतेप्रमाणे हजर राहणे, | मे.व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई | निर्णय क्र. १४५/ दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ | विनामोबदला तथापि, संस्थान आयकर कामकाजानिमित्त संस्थान भेटीचे वेळी मोफत निवास, प्रसाद भोजन, वाहन व प्रत्यक्ष खर्चाचा परतावा |
| ३ | आयकर अपिल्स :-Income Tax Commissioner Appeal, Tribunal Appeal etc. तसेच मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे विधिज्ञांकरिता आवश्यक माहिती सादर करणे. आवश्यकतेप्रमाणे हजर राहणे, | सीए दिपक टिकेकर, मुंबई | निर्णय क्र. १४५/ दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ | ICAI नियमाप्रमाणे देय होणारी प्रति केस, प्रति सुनावणी इ. प्रमाणे बील आकारणी |
| ४ | मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात संस्थानची बाजु मांडणे | ॲड.एस. गणेश, दिल्ली | निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ निर्णय क्र. १४५/ दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.१६/ दि.०८.०१.२०१८ | विनामोबदला तथापि, संस्थान आयकर कामकाजानिमित्त विमान प्रवास बील, निवास इ. प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपुर्ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | मा.सर्वोच्च न्यायालयात रिट अर्ज, अपिल दाखल करणे, संस्थानची बाजु मांडणे | ॲड.मेहुल गुप्ता, दिल्ली | निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ निर्णय क्र. १४५/ दि.२६.०२.२०१९ | विनामोबदला तथापि, संस्थान आयकर कामकाजाकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपुर्ती |
| ६ | मा.सर्वोच्च न्यायालयात आयकर, व्हॅटकर, इ. संबंधीत रिट अर्ज, अपिल दाखल करणे, संस्थानची बाजु मांडणे | विधिज्ञ ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई | निर्णय क्र.५३०/ दि.२२.०८.२०१८ निर्णय क्र. १४५/ दि.२६.०२.२०१९ | विनामोबदला तथापि, करविषयक कामकाजाकरिता संस्थान भेटीचे वेळी मोफत निवास, प्रसाद भोजन, वाहन व प्रत्यक्ष खर्चाचा परतावा |
| ७ | विक्रीकर - मुल्यवर्धित कर (VAT)– Commissioner Appeal, MVAT Tribunal Appeal, तसेच मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे विधिज्ञांकरिता आवश्यक माहिती सादर करणे. आवश्यकतेप्रमाणे हजर राहणे, | ॲड.पी.सी. जोशी, मंबई | निर्णय क्र.५५४/ दि.२१.०६.२००९ | MVAT Appeal रु.५०,०००/- High Court कामकाज प्रत्यक्ष भेटीनुसार |
| ८ | GST – GST TDS, GST Monthly, Quarterly, Yearly Returns, Audit Report– आर्थिक वर्ष २०१९-२० | सीए शंकर अंदाणी ॲण्ड कं., अहमदनगर | निर्णय क्र.४६९/ दि.१५.०६.२०१७ | वार्षिक फी रु.३,००,०००/- + त्यावरील सेवाकर |
| ९ | Income Tax – TDS आर्थिक वर्ष – दि.०१.१०.२०१९ ते दि.३१.०३.२०२१ | मे.उल्हास बोरसे ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, नाशिक | दि.१२.०९.२०१९ मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील विषय नं.४ | वार्षिक फी रु.१,४९,८६०/- (सर्व करांसह एकत्रित) |
| १० | मुल्यवर्धित कर (VAT) - Commissioner Appeal, MVAT Tribunal Appeal, तसेच विधिज्ञांकरिता आवश्यक माहिती संकलित करणे. आवश्यकतेप्रमाणे हजर राहणे,विनामोबदला असल्याने कायमस्वरुपी नियुक्ती | १. श्री.ए.एल. कुलकर्णी, कोपरगांव २. श्री.शशिकांत कुलकर्णी, नाशिक, विक्रीकर सल्लागार (सन १९९१ पुर्वीपासून) | निर्णय क्र.४६९/ दि.१५.०६.२०१७ | विनामोबदला |
| ११ | सेवाकर (**Service Tax**)– Commissioner Appeal, CESTAT Appeal, विनामोबदला असल्याने कायमस्वरुपी कामकाज करण्यास नियुक्ती | सीए ॲड.श्रेणिक गांधी, पुणे | निर्णय क्र.४६९/ दि.१५.०६.२०१७ | विनामोबदला सेवाकर संबंधीत कमिश्नर अपिल, CESTAT Appeal. |
| १२ | पूर्व लेखापरिक्षक – आर्थिक वर्ष २०१९-२० | मे.उल्हास बोरसे ॲण्ड कं., चार्टर्ट अकौंटंटस्, नाशिक | निर्णय क्र. ७७/ दि.३०.०१.२०१९ | रु.१,००,०००/- |
| १३ | अंतर्गत लेखापरिक्षक – आर्थिक वर्ष २०१९-२० | मे.सुनिल अभ्यंकर ॲण्ड असोसिएटस्, सीए, पुणे | शासन आदेश क्र.सासंवि-१०१९/ ३२४/प्र.क.५७/ का.१६ दि.०८.०८.२०१९ | रु.६,००,०००/- + इतर कर व अनुषंगीक खर्च |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | वैधानिक लेखापरिक्षक -<br>आर्थिक वर्ष २०१८-१९ | मे. मुकुंद एम. चितळे ॲण्ड कं., सीए,मुंबई | शासन आदेश क्र.सासंवि-१०१९/२८३/प्र.क.५१/ का.१६<br>दि.०७.०८.२०१९ | रु.१,७७,०००/- + त्यावरील कर व प्रत्यक्ष अनुषंगीक खर्च |
| १५ | आयकर सल्लागार<br>आर्थिक वर्ष – दि.०१.०८.२०१७ ते दि.३१.०७.२०१९<br>(करनिर्धारणासंबंधीत कामकाज असमाधानकारक असल्याने पुढील कालावधीकरिता सीए आर.आर. मुनी, मुंबई कामकाज करत आहेत) | सीए राहुल केळकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई | निर्णय क्र.४६९/<br>दि.१५.०६.२०१७ | वार्षिक फी<br>रु.७७,०००/- + कर<br>वार्षिक आयकर विवरणपत्र भरणे, करनिर्धारण, छाननी व संबंधीत संपुर्ण कामकाज |

उपरोक्तप्रमाणे Income Tax,MVAT, Service Tax, GST, Monthly Income Tax TDS इ. संबंधीत कामकाज मा.कायदेतज्ञ समिती सदस्य श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने करण्यात येत आहे. संबंधीत कामकाजाकरिता नियुक्ती करण्यात आलेल्या लेखापरिक्षण संस्था, कर सल्लागार, विधिज्ञ व त्यांना देण्यात येणारी फी, प्रत्यक्ष खर्च प्रतिपुर्ती बाबत माहिती अवलोकनार्थ सादर.

अशा प्रकारे आयकर, व्हॅटकर,सेवाकर व ते संबंधीत कामकाज करण्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या लेखापरिक्षण संस्था, विधिज्ञ इ. संबंधीत माहितीची सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१२** **यावर सविस्तर चर्चा झाली, संस्थान संबंधीत आयकर, व्हॅट, व सेवाकर विषयक कामकाजाबाबत समितीला सविस्तर माहिती देण्यात आली, त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१३** **साईभक्तांकडून संस्थानला दि.३१.०३.२०१६ अखेर देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/जमा असलेल्या वितळणे योग्य असलेल्या चांदीच्या वस्तू वितळवून त्यापासून विटा/बार तयार करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २८ जुलै, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार दि.३१/०३/२०१६ अखेर संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/जमा असलेल्या वितळविणे योग्य सोने-चांदीच्या वस्तू वितळवून, उपलब्ध होणा-या शुध्द सोने-चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी,पेन्डेन्टस् बनविणेसाठी मान्यता मिळालेली आहे..

मा. शासनाने मान्यता दिलेनुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार सर्वप्रथम संस्थान व्यवस्थापनामार्फत दिनांक ३१ मार्च, २०१६अखेर उपलब्ध होणारी चांदी (अंदाजे वजन २७१४.२२६ किग्रॅ)या धातूचे अलंकार / वस्तू वितळविणेकामी भारत सरकार टंकसाळ, मुंबईयांचेकडून दि. ०१/०१/२०१९ रोजी मध्ये नमूद केलेल्या बाबींस अनुसरुन प्रस्ताव-वजा- दरपत्रक मागविण्यात आले होते.त्यास अनुसरुन,भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांनी दि.२८/०१/२०१९ चे पत्राने प्रस्ताव–वजा- दरपत्रक सादर केले होते.

भारत सरकार टंकसाळ, मुंबई ( India Governmnet Mint, Mumbai)यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव-वजा-दरपत्रक दि.२६/०२/२०१९ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेसभोर निर्णयार्थ सादर करणेत आले होते. त्यावर निर्णय क्र.१०३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी समोर उपस्थित होते. समितीने त्यांचेशी मजुरीचे दराबाबत चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार देण्यात आलेली वेतनवाढ व चांदीच्या १०० % शुध्दतेची खात्री यामुळे इतरांचे तुलनेने मजुरीचे दर जास्त आहेत.मात्र संस्थानचे काम मोठे असल्याने नाणे बनविण्याच्या मजुरीमध्ये सुट देण्यास व तसे लेखी देण्यास त्यांनी मान्यता दर्शविली. मात्र चांदी वितळवून बार बनविणेकामी दिलेल्या दरामध्ये काम करण्यास तयार आहे, असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्या चांदीची नाणी तयार करण्याऐवजी सर्व चांदी भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून वितळवून बार तयार करुन घेण्यात यावेत.व श्री साई पादुका/ श्री साई प्रतिमा असलेली नाणी बनविणेकामी नामांकित ज्वेलर्स यांना मा.स्थानिक समितीचे सभेसमोर बोलावूनचांदीच्या विटापासून श्री

साई पादुका/ श्री साई प्रतिमा असलेली नाणी संस्थानमध्ये तयार करुन घेणेबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती द्यावी व त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी,असे ठरले.

तथापि, संस्थानकडे दिनांक ३१ मार्च, २०१६अखेर उपलब्ध असलेली वितळविणे योग्य चांदी धातूचे अलंकार / वस्तू (अंदाजे वजन २७१४.२२६ किग्रॅ) एवढे आहे. भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांनी मुंबई स्थित रिफायनरीमध्ये ८५% व त्यापेक्षा अधिक शुध्दता असलेली चांदी दिल्यास दरमहा २०० किलो चांदी शुध्दीकरण क्षमता आहे, असे पत्रात नमूद केले आहे. तथापि भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांची क्षमता कमी असल्याने भारत सरकार टंकसाळ, हैद्राबादयांचेकडे दुरध्वनीव्दारे विचारणा करण्यात आली होती.

त्यास अनुसरुन,भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांचेकडे माहिती मागविली असता,त्यांनी दि.०७/०८/२०१९ रोजीचे पत्राने माहिती कळविली आहे.

भारत सरकार टंकसाळ, मुंबई व भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांनी यासंबंधी दिलेला तपशिलाबाबत तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून मागविणेत आलेला प्रस्ताव-वजा-दरपत्रक तपशिल | अ. नं. | भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून आलेला प्रस्ताव-वजा-दरपत्रक तपशिल | भारत सरकार टंकसाळ,हैद्राबाबद यांचेकडून आलेला प्रस्ताव-वजा-दरपत्रक तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | IGM यांचे मुंबई स्थित रिफायनरीमध्ये चांदी वितळविणेची दररोजची किती किलोग्रॅमची क्षमता आहे तसेच संस्थानमार्फत उपलब्ध होणारे उपरोक्त चांदी एकाच टप्प्यातवितळविणे शक्य होईल कां ? | १. | अ) मुंबई स्थित रिफायनरीमध्ये प्रतिदिनी ५० किलोग्रॅम चांदी वस्तू वितळविण्याची क्षमता आहे.<br>ब) चांदी शुध्दीकरण क्षमता दरमहा २०० किलोग्रॅम | अ) हैद्राबाद स्थित रिफायनरीमध्ये प्रतिदिनी १०० किलोग्रॅम चांदी वस्तूवितळविण्याची क्षमता आहे.<br>ब) चांदी शुध्दीकरण क्षमता दरमहा २००० किलो ग्रॅम (२ मेट्रिक टन ) आहे. |
| २. | चांदी वितळविणेची कार्यपध्दती काय असेल ? | ३. | आपले अधिकृत प्रतिनिधीचे उपस्थितीत चांदीचे वजन करुन घेण्यात येईल. मेल्टिंगपुर्वी नमूना काढण्यात येईल.<br>चांदी वितळविणे व शुध्दीकरण करुन त्याचे ९९ % शुध्द चांदीमध्ये रुपांतरण होऊन रिझल्ट येणेकामी अंदाजे ५ ते ६ आठवडे लागतील. | आपले अधिकृत प्रतिनिधीचे उपस्थितीत चांदीच्या सर्व वस्तू / दागिनेमधून खडे ,लाकूड काढून वेगळे करुन उर्वरित चांदीचे वजन करण्यात येईल.<br>चांदी वितळविलेनंतर मेल्टिंगमुळे कमी होणा-या मेल्टिंग केलेल्या चांदीच्या बारचे संस्थानचे अधिकृत प्रतिनिधी समक्ष वजन करण्यात येईल |
| ३. | चांदी प्रथम वितळविणे (Melting) व त्यापासून शुध्द स्वरुपातील (Refining) चांदीच्या विटा (Biscuits) तयार करणेकामी प्रति किलोग्रॅम किती खर्च (शासकीय करांसह) येईल ? | ४. | १) चांदी धातू शुध्दता ७९.९% व त्यापेक्षा कमी दिल्यास (वितळविल्यानंतर शुध्दीकरण करतेवेळी नुकसान गृहीत धरुन ) त्यापासून ९९९ शुध्द चांदीचे बार तयार करणेकामी दर प्रति किलो ग्रॅम रु.७२३६/-<br>२) चांदी धातू शुध्दता ८०.००% ते ९९.८० % दिल्यास (वितळविल्यानंतर शुध्दीकरण करतेवेळी नुकसान गृहीत धरुन ) त्यापासून ९९९ शुध्द चांदीचे बार तयार करणेकामी दर प्रति किलो ग्रॅम रु.४९२६/- | जमा करतेवेळी घेण्यात येणारी चांदी - सर्व प्रकारची चांदी<br>चांदी परत करतेवेळी असलेले दर<br>१) ९९०.० व त्यापेक्षा जास्त एक वेळ रिफायनिंगसाठी<br>प्रति किलोग्रॅम – रुपये २४००/-<br>२) ९९९.० व त्यापेक्षा जास्त दोन वेळ रिफायनिंगसाठी<br>प्रति किलोग्रॅम – रुपये ४८००/- या व्यतिरिक्त मेल्टिंग आणि असाईंग चार्जेस प्रति किलोग्रॅम रुपये १०००/- व १८ % जी.एस.टी. |

उपरोक्त तक्त्यातील नमूद बाबीस अनुसरुन असे दिसून येते की भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांची चांदी वितळविणेची व शुध्दीकरण भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद पेक्षा कमी असून, दरही जास्त आहेत.

दि.२२/११/२०१९ रोजीचे पत्राने भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांनी चांदी वितळविणे संबंधी समक्ष चर्चा करणेकामी भेटीची वेळ मागितली असता त्यांना दि.१७/१२/२०१९ रोजी भेटीची वेळ देण्यात आली होती. दि.१७/१२/२०१९ रोजी श्री.सुनिल कुमार यादव, डेप्युटी जनरल मॅनेजर, श्री.डी शिवा सुब्रहण्यम यादव, डेप्युटी मॅनेजर भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांचेबरोबर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचेशी समक्ष चर्चा

झाली. भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद मध्ये तिरुपती देवस्थान, हुलीगम्मा मंदिर, कालाहस्ती देवस्थान अशा मोठया देवस्थानांकडील सोने आणि चांदी वितळविण्यात येत असून त्यांना सदर कामाचा मोठा अनुभव आहे.

दि.१७/१२/२०१९ रोजीचे चर्चेस अनुसरुन, दि.१९/१२/२०१९ मेलव्दारे त्यांनी नव्याने प्रस्ताव दिलेला आहे. परंतु सदरचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने सदरचे प्रस्तावावर चर्चा करणेकामी, मा.तदर्थ समितीच्या दि.३१/१२/२०१९ रोजी होणाया सभेसमोर भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांचे प्रतिनिधींना समक्ष बोलाविणेत आले आहे.

तरी, सदरचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने त्यावर भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांचे प्रतिनिधींबरोबर समक्ष चर्चा होणेकामी सविनय सादर.

भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद यांनी दि.१९/१२/२०१९ रोजी नव्याने सादर केलेला प्रस्ताव सोबत जोडला आहे.

**निर्णय क्र.१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांकडून संस्थानला दि.३१.०३.२०१६ अखेर देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/जमा असलेल्या व वितळणे योग्य असलेल्या चांदीच्या वस्तू वितळवून त्यापासून विटा/बार तयार करुन घेणेकामी भारत सरकार टंकसाळ, हैद्राबाद व मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४** **लेखाशाखा विभागाकडील स्ट्रॉंगरुममधील तिजोरी व लॉकर्स कॅबिनेट इतरत्र हलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** भक्तनिवास इमारतीत दुस-या मजल्यावर लेखाशाखा विभागासाठी साधारणत: १९९८ साली एक स्ट्रॉंगरुम तयार करण्यात आले आहे. सदर स्ट्रॉंगरुममध्ये देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने,चांदी व इतर मौल्यवान वस्तू ठेवण्यात येतात.

सदर स्ट्रॉंगरुमध्ये सध्या एकूण साधारण: ४,४०० किलोग्रॅम वजनाच्या वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच सध्या दैनंदिन जमा होणा-या सोने, चांदी वस्तू तसेच मौल्यावान खडे वस्तूही या ठिकाणी ठेवण्यात येत आहेत.

सदर स्ट्रॉंगरुममध्ये ठेवण्यात आलेल्या मौल्यवान वस्तूंचे वजन क्षमतेपेक्षा जादा झाल्यास तेथील इमारतीच्या स्लॅबला इजा पोहचू शकते. त्या अनुषंगाने, भविष्यात काही अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच स्ट्रॉंगरुमचे खालील मजल्यावर साईभक्तांची दर्शन लाईन असल्याने दर्शन लाईनमध्ये असलेल्या भक्तांना आकस्मिक इजा पोहचू नये, यासाठी दि.२०/८/२०१९ रोजीचे पत्राने संरक्षण विभागाचे निगरानीत बांधकाम विभागाने स्ट्रॉंगरुमची क्षमता तपासणी (Structural Audit) करण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले होते.

त्यास अनुसरुन, दि.६/११/२०१९ रोजी सायं. ४.२५ वाजता बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, श्री.एस.एम.जोरी, कन्स्लटंट, श्री.जे.एस.सबरवाल यांनी स्ट्रॉंगरुमची तसेच स्ट्रॉंगरुममध्ये ठेवलेल्या वस्तुंची पाहणी केली असता, त्यांनी स्ट्रॉंगरुममध्ये क्षमतेपेक्षा जास्त (तिन पट) वजन असलेचे पाहणीचे वेळी म्हटले आहे.

तथापि स्ट्रॉंगरुममधील तिजोरी, लॉकर्स कॅबिनेट जास्त जड असल्याने, तिजोरी देणगी काऊंटर नं. ०२ या ठिकाणी ठेवता येईल, तसेच लॉकर्स कॅबिनेट इतरत्र हलविता येईल. त्यामुळे स्ट्रॉंगरुममधील वजन काही प्रमाणात कमी होईल.

त्या अनुषंगाने, या क्षेत्रात काम करणारे माहितगार इसम यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांनी सदर कामाबाबत प्रत्यक्ष पाहणी केली असता, श्री.परशराम किसन बारहाते यांनी दि.२७/११/२०१९ रोजीचे अर्जाने याकामी रक्कम रुपये १२०००/- मात्र (अक्षरी रुपये रक्कम बारा हजार मात्र) येईल असे कळविलेले आहे. सदरचे कामासाठी अर्जदार श्री. परशराम किसन बारहाते व त्यांचे इतर ०३ सहकारी अशी एकूण चार माणसे येणार असून, त्यांनी अर्जामध्ये त्यांची नांवे दिलेली आहेत. त्यांना कामाचे वेळेस स्ट्रॉंगरुममध्ये प्रवेश द्यावा लागणार आहे. त्यांच्या त्याबाबत रजिस्टर मध्ये नोंद व सहया घेता येतील.

सदरचे काम संरक्षण विभागाचे निगराणीत करता येईल तसेच कामाचे वेळेस प्रत्यक्ष सी सी टी व्ही विभागामार्फत संपूर्ण व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस, व सदरचे काम पुर्ण झालेनंतर कामासाठीची मजुरीची रक्कम रुपये १२०००/ मात्र. (अक्षरी रक्कम रुपये बारा हजार मात्र.) अर्जदार श्री. परशराम किसन बारहाते यांचे नांवे रोखीने अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच लेखाशाखा विभागाकडील स्ट्रॉंगरुममधील तिजोरीचा वापर होईल अशा योग्य ठिकाणी स्थलांतरीत करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/संरक्षण विभाग/सीसीटीव्ही कक्ष)**

---

**विषय नं.१५** **श्री साईप्रसादालय करीता नविन आटा युनिट खरेदी करणेस व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती व नाष्टा पाकीटमध्ये पुरी देणेत येते. श्री साईपसादालयात चपाती व पुरीकरीता दररोज अंदाजे ३५- ४० क्विंटल आट्याची आवश्यकता आहे. त्यासाठी १८ इंच साईजच्या दोन व १६ इंच साईजची एक अशा एकुण तीन गिरणी कार्यान्वित असून प्रती तासास अडीच क्विटंल आटा तयार होते. ४० क्विटंल आटा तयार करणेसाठी १६ तास गिरणी अविरत कार्यान्वित ठेवावे लागतात.

सध्या कार्यान्वित असलेल्या १८ इंच गिरणी सन १९९३ मध्ये खरेदी केलेले असून ऑनलाईन चक्की युनीट सन २००८ मध्ये खरेदी केलेले आहे. सध्या कार्यान्वित असलेल्या गिरणी नॉनस्टॉप १६ तास कार्यान्वित ठेवलेमुळे गिरणीच्या मोटार गरम होणे, जळणे याचे प्रमाण वाढलेले असून जातेला वारंवार टाके मारावे लागतात. त्यामुळे गिरण्याचे मेन्टेनंन्स वाढले आहे. गिरणी बंद पडलेस श्री साईप्रसादालयास आट्याची अडचण येते.

मागणी:- श्री साईप्रसादालतील चपाती व नाष्टा पाकीटचा आटयाच्या मागणी नुसार तासी १० क्विंटल क्षमतेचे युनिट असणे आवश्यक आहे. तसेच अत्याधुनिक डस्ट विरहीत गिरणी युनिट मार्केटमध्ये उपलब्ध आहे. श्री गजानन महाराज देवस्थान, शेगाव यांचेकडे असलेले युनीट मध्ये २४ इंच साईजच्या जातेच्या चार गिरणी कार्यान्वीत असून तासी १० क्विंटल आटा तयार होतो. तसेच सदरचे गिरणी युनिट साठी कमी जागा लागते व सदरचे युनिट ड्रस्टविरहीत आहे. अशा पद्धतीचे गिरणी युनिट बसविलेस प्रसादालयात आवश्यक तेवढा आटा उपलब्ध होईल. तत्सम प्रकारचे आटा युनिट पुरवठादार यांचेकडून खर्चाचा अंदाज येणेकरीता दरपत्रक घेतले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | दर | एकुण दर |
|---|---|---|---|
| 1 | Supply Installation and commissioning of 1000 kg/hr. capacity Atta Plant include Cleaning machine, VibroSeperator, Centrifugal Atta Separator, Pneumatic System, Floor Mill 24”, Varam Conveyer with water dumpler, Elevator, Storage Tank, Electric Motor & panel Board. | 23,75,000.00 | 23,75,000.00 |
| | **GST 5%** | | 1,18,750.00 |
| | **Total** | | 24,93,750.00 |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे श्री साइप्रसादालयाकरीता तासी १००० किलो क्षमतेचे आटा युनिट खरेदीकामी रक्कम रु.२४,९३,७५०.०० ( अक्षरी रक्कम रुपये चोवीस लाख त्र्याण्णव हजार सातशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- श्री साईप्रादालयातील चपाती व पुरीकरीता लागणारा आटा तयार करणेसाठी सध्या असलेले आटा युनीट कमी पडत असून सदरच्या मशिनरीचे मेन्टेनंन्सही वाढलेले आहे. त्यामुळे प्रसादालयात नविन आटा युनिट खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्याता घेऊन महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन ई निविदा बोलविता येतील.

प्रस्ताव- श्री साईप्रसादालयात चपाती व पुरीचा आटा तयार करणेस अडचण येऊ नाही तसेच अत्याधुनिक डस्ट विरहीत आटा युनिट विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु रु.२४,९३,७५०.०० ( अक्षरी रक्कम रुपये चोवीस लाखत्र्याण्णव हजार सातशे पन्नास) मात्र पर्यंतच्या खर्चास

तसेच महाराष्ट शासनाचे www.mahatendrs.gov.inया संकेत स्थळावर ई निविदा जाहीरात प्रसिद्ध करुन ई निविदा मागविणेस मान्यतेकरीता प्रस्तावमा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयात चपाती व पुरीचा आटा तयार करणेकामी नविन आटा युनिटची उपयुक्तता व भविष्यातील गरज पाहता श्री साई प्रसादालयाकरीता नविन अत्याधुनिक डस्ट विरहीत आटा युनिट खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२४,९३,७५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१६** **दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये सेंट्रल ए.सी.यंत्रणा बसविणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांना संस्थानकरीता सहजा सहजी देणगी देता यावी म्हणुन, मंदिर व मंदिर परिसरात दक्षिणा पेटया बसविण्यात आलेल्या आहेत. सदर दक्षिणापेटीतील रकमेची मोजणी आठवडयातून साधारणत: दोन वेळेस (दर मंगळवारी व शुक्रवारी) होत असते. दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीसाठी मंदिरासमोरील सभा मंडपाचे (नंदी हॉल) खाली तळमजल्यात एक हॉल बनविण्यात आलेला आहे. परंतु सदर हॉल हा सर्व बाजूने बंदिस्त आहे. तेथे हवा खेळती राहणेसाठी काहीही व्यवस्था नाही. सदर हॉलमध्ये फक्त सिलिंग फॅन बसविलेले आहेत. पुरंत उन्हाळयात सिलींग फॅनची हवा पुरेशी मिळत नसल्याने हॉलमधील वातावरण हे खूपच गरम स्वरूपाचे राहते. तसेच बाहेरील हवा आत येण्यासाठी काहीही मार्ग नसल्याने, तेथे भयंकर उकाडा निर्माण होतो. त्यामुळे कर्मचारी सदर ठिकाणी जास्त वेळ बसून काम करण्यास टाळाटाळ करतात. पर्यायाने काम वेळेत पार पाडणेकामी एकुणच कामकाजात अनेक अडचणी येऊन काम वेळेत पुर्ण करून घेणे अडचणीचे होत आहे. सदरचे काम करतेवळी कर्मचा-यांना जाणवणारा उकाडा कमी होवुन कामकाज सुरळीत पणे व वेळेत पार पाडणेकरीता संस्थानचे मेकॅनिकल विभागामार्फत दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचा संपुर्ण हॉल वातानुकुलीत करणे करीता सेंट्रल ए.सी यंत्रणा बसवुन मिळणेबाबत लेखाशाखेने मागणी केलेली आहे.

उपरोक्त मागणी नुसार दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलची प्रत्यक्ष पाहणी केली असुन सदर ठिकाणी डक्टेबल सेंट्रल ए.सी. यंत्रणा बसवता येईल तसेच सदर यंत्रणेचे आऊटडोर युनिट पालखी रथ ठेवलेल्या मागील मोकळया जागेत ठेवता येतील. याकामी येणा-या खर्चाचे अंदाजाकरीता तत्सम प्रकारचे कामे करणा-या एजन्सीज कडुन दर घेतले असता सेंट्रल ए.सी यंत्रणा बसविणेकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Description | Capacity | Amount Rs. |
|---|---|---|---|
| 1. | Supply, installation Testing and Commissioning of Inverter Compressor Ductable Split A.C. units. | 22 Ton | 9,48,300/- |

उपरोक्त प्रमाणे २२ टन क्षमतेची डक्टेबल सेंट्रल ए.सी यंत्रण उभारणी कामी अंदाजे रक्कम रूपये -९,४८,३००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्रया/स्पष्ट मत:- दक्षिणा पेटीत जमा होणारी रक्कम मोजणीसाठी असलेली जागा सर्व बाजुने बंदिस्त असलेने तथे हवा खळती राहणे शक्य नाही. त्यामुळे जास्त वेळ काऊंटींग चालेस उपस्थित कर्मचा-यांना मोठया प्रमाणात उकाडयाचा त्रास होतो. कर्मचा-यांना उकाडयाचा त्रास होवु नये याकरीता सदर ठिकाणी लेखाशाखेचे मागणी नुसार हॉल मध्ये सेंट्रल ए.सी यंत्रणा बसविता येईल.

याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मा. व्यवस्थापन समीतीचे मान्यता मिळालेनंतर सदरची यंत्रणा उभारणी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करून ई-निविदा मागविता येतील.

प्रस्ताव:- दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे हॉल मध्ये कर्मचा-यांना उष्णतेचा त्रास जाणवु नये याकरीता सदरचे हॉलमध्ये डक्टेबल सेंट्रल ए.सी यंत्रणा उभारणीकामी येणा-या अंदाजे रक्कम रूपये-९,४८,३००/- (अक्षरी रक्कम रूपये-नऊ लाख अठ्ठेचाळीस हजार,तिनशे) मात्रचे खर्चास तसेच महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा जाहीरात प्रसिध्द करून ई-निविदा बोलाविणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ ( Ad-hoc ) व्यवस्थापन समीतीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये सेंट्रल ए.सी. यंत्रणा बसविणेकामी या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करुन त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१७** **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMC करीता ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद: (१) कलम १४(२)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) कलम १७(२)(झ) - सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

प्रस्तावना: साईभक्तांना अधिकाधिक सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साईआश्रमभक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, व्दारावती निवासस्थान, श्री साई प्रसादालय तसेच रुग्णांकरीता श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे विविध क्षमतेच्या एकूण ३७ लिफ्टस बसविण्यात आलेल्या आहेत. सदरचे ठिकाणी बसविणेत आलेल्या लिफ्टचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ.नं. | ठिकाण | लिफ्टचा तपशील | कंपनी | नग | खरेदी दिनांक रुपये | खरेदी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | साई आश्रम भक्तनिवासस्थान | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३. G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १२ | २०/७/२०१२ | १,६९,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| २. | साई धर्मशाळा | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ६ | २८/०७/२०१२ | ९१,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| ३. | नविन भक्तनिवासस्थान | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ४ | ३०/०६/२०१४ | ५७,१९,५१२/- |
| ४. | व्दारावती | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+4 | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ४ | १५/८/२००९ | ६४,००,०००/- |
| ५. | श्री साई प्रसादालय | एस.एस. ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | ०१/१०/२००८ | ३०,४१,१००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – २.५ टन, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | | |
| ६. | साईनाथ रुग्णालय | ॲटोमॅटीक डोअर, हायड्रोलीक, प्रवासी क्षमता – २०, G+2 | पावरलिंक इंजिनिअर्स | २ | ११/०८/२००७ | २०,२८,७७९/- |
| ७. | साईबाबा हॉस्पीटल | एस.एस. ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १५, G+2 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ३ | ३०/०६/२०१४ | ५२,९४,७३७/- |
| ८ | शिर्डी बसस्थानक भक्तनिवाससथान | एस.एस. ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G +3 | व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि. मुंबई | २ | २७.०७.२०१७ | २५,००,०००/- |
| | | | **एकूण लिफ्ट :** | **३७** | | |

उपरोक्त ३७ लिफ्ट पैकी अ.नं. २ चे लिफ्ट बसविणेत आलेली साईधर्मशाळा इमारती करीता बांधकाम परवाना घेणेची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू असलेने सदरचे लिफ्ट वापराकरीता लायसन्स मिळालेले नसलेने, त्यांचा वापर करण्यात येत नाही. तसेच अ. नं. ८ शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथील लिफ्ट दिनांक ३१/३/२०२० पर्यंत वारंटी कालावधी असलेने या ठिकाणचे व साईधर्मशाळा येथील ७ अशा एकुण ९ लिफ्ट वगळून उर्वरित २८ लिफ्टकरीता दिनांक२६/०२/२०१९ रोजीचेमा. व्यवस्थापनसमितीचेसभेतीलनिर्णय

क्रं.१४०(११) अन्वये जा.नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/५८५९/२०१९ दिनांक ५.०३.२०१९ रोजीचे नुसार मे. फोनिक्स इलेव्हेटर लिफ्ट प्रा. लि. मुंबई यांना दिनांक १.३.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१९ याकालावधी करीता रु.१०,७९,०००/- मात्र रक्कमेस CAMC कार्यादेश देणेत आलेला आहे.

CAMC कॉन्ट्रकट मध्ये सर्व मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल स्पेअरपार्ट हे सदर कॉन्ट्रकट मध्ये येत त्या स्पेअरपार्टची कोणतीही किमंत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात. शिवाय कंपनीचे / कॉन्ट्रक्ट कडील प्रशिक्षीत टेक्निशियन येऊन मशिनची साफ सफाई, सेटींग करुन देत असतात. जेणेकरुन लिफ्ट सुरळीत चालु राहणे शक्य होणार आहे. CAMC कालावधीमध्ये सर्व लिफ्टच्या मशिनरीचा कोणताही मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल पार्ट नैसगिकरित्या खराब झाल्यास ती बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

चालू CAMC कालावधीमध्ये मे. फोनिक्स इलेव्हेटर लिफ्ट प्रा. लि. मुंबई यांनी आतापर्यंत खालीलप्रमाणे स्पेअरपार्ट बदलून दिलेले आहे.

| **अ.नं.** | **स्पेअर पार्टचा तपशिल** |
|---|---|
| १. | वायर रोप १३mm, ८mm व डोअर वायर रोप २ mm, ३mm |
| २. | बटन |
| ३. | ऑईल सील, ऑईल, |
| ४. | मेल फिमेल कॉन्टेक्ट , रिले, ३व ४ पोल कॉन्टक्टर |
| ५. | रीड स्वीच, लिमिट स्वीच, DCL स्वीच |
| ६. | रेक्टीफाईड कार्ड |
| ७. | डोअर स्पींग, गिब्ज, रोलर, बेल्ट |
| ८. | मोटार व क्वॉईल रिवायडींग |

मागणी:- सदर लिफ्टचे CAMC कालावधी दिनांक २८.२.२०२० रोजी संपणार असलेने त्यापुढिल एक वर्ष कालावधी करीता सर्व लिफ्ट CAMC करावी लागणार आहे. मागील वर्षाचे प्राप्त दर यानुसार पुढिल वर्ष CAMC करीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | ठिकाण | उत्पादक कंपनी | लिफ्ट संख्या | सन २०१९- २० वर्षाकरीता CAMC देणेकामी अपेक्षीत खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १३ | (मागील वर्षाचे CAMC रक्कमेच्या ५ % वाढ गृहीत धरुन) |
| २ | साईबाबा भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०४ | |
| ३ | साईबाबा हॉस्पीटल | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०३ | |
| ४ | व्दारावती भक्तनिवास | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ०४ | ११,३२,९५०/- |
| ५ | साईनाथ हॉस्पीटल | पावरलिंक इंजिनिअर्स | ०२ | |
| ६ | साईप्रसादालय | ओटीस इलेव्हेटर कं. लि. | ०२ | |
| ७ | शिर्डी बसस्थानक भक्तनिवास | व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि. | ०२ | ८०,०००/- (अपेक्षीत खर्च) |
| | | **एकुण रक्कम** | **३०** | **१२,१२,९५०/-** |

उपरोक्त प्रमाणे अ. नं. १ ते ६ मधील नमुद २८ लिफ्टचे दिनांक २८.२.२०१९ रोजी कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टव अ. नं. ७ मधील लिफ्टचा वारंटी कालावधी दि. ३१/०३/२०२० रोजी संपत असल्याने पुढिल एक वर्ष कालावधी करीता एकत्रित ३० लिफ्टचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी अंदाजे रक्कम रु. १२,१२,९५०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय:- संस्थान मधील सर्व लिफ्ट सुरळीत कार्यरत राहणेकामी त्यांची CAMC देणे आवश्यक आहे. याकरीता सर्व लिफ्टचे एकत्रित CAMC चे कॉन्ट्रॅक्ट देणे करीता महाराष्ट्र शासनाच्या www\mahatenders.gov.in या वेबसाईटवर तसेच संस्थानचे संस्थान वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस तसेच CAMC करीता येणा-या अंदाजे रक्कम रु. १२,१३,८७५/- मात्रचे खर्चास मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णाचे सोई सुविधेकरीता लिफ्ट सुरळीत कार्यान्वित राहणे करीता एकुण ३० लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रुपये १२,१३,८७५/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील एकुण ३० लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१२,१३,८७५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) तसेच दुषीत पाणी प्रक्रिया प्रकल्प (ETP) चे वार्षिक ऑपरेटींग व मेटनन्स (AMC) देणेकामी येणाऱ्या खर्चास ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समिती दिनांक ५.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६१३(१) नुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील सांडपाणी प्रक्रिया सयंत्रचा दिनाक १.१०.२०१८ ते दि ३०.९.२०१९ या वर्ष कालावधीकरीता वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्स (AMC) करीता मे. ग्रीनसांयटीफिक डेव्हलपमेंट (इं) प्रा. लि. मुंबई यांना प्रती माहे रक्कम रु.७२,०००/- प्रमाणे एक वर्ष कालावती करीता रक्कम रु. ८,६४,०००/- मात्र रक्कमेस देणेत आलेले आहे. सदरची मुदत दिनाक ३०.९.२०१९ रोजी सपंलेली असल्याने नव्याने ई निविदा प्रकिया करावी लागणार होती.

श्री साईनाथ हॉस्पीटल येथील लॉन्ड्री व श्री साईबाबा हॉस्पीटल पॅथोलॉजी लॅब येथील सांडपाण्यावर प्रकिया करणेसाठी अनुक्रमे १३०००लि. व ३०००लि. प्रतीदिन क्षमतेचे स्वतंत्र ETP प्लॅन्टची माहे मार्च २०१९ मध्ये उभारणी करणेत आलेली आहे. सदर प्लॅन्टची वारंटी कालावधी माहे२८ फेब्रुवारी २०२० रोजी संपणार असलेने वारंटी कालावधी संपलेनंतर पुढे एक वर्ष कालावधी करीता द्यावयाची वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्स (AMC) करीता ई निविदा प्रसिद्ध करावी लागणार आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल येथील प्लॅन्ट दोन शिफ्ट मध्ये तसेच साईनाथ रुग्णालय येथील प्लॅन्ट दोन शिफ्ट मध्ये ऑपरेटींग करावी लागेल.

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील STP व ETP प्लॅन्ट जवळ जवळ असल्याने दोन्ही प्लॅन्ट करीता एकत्रित निविदा काढलेस दहा ऐवजी पाच कर्मचा-यांत दोन्ही प्लॅन्ट ऑपरेटींग करता येईल. व पर्यायाने संस्थानची अंदाजे माहे ५०,०००/- इतकी अर्थिक बचत होणार असलेने दोन्ही प्लन्ट वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्सकरीता एकत्रित ई निविदा प्रसिद्ध करणेस व STP चे वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्सचे काम दिलेले मे. ग्रीन सांयटीफिक डेव्हलपमेंट (इं) प्रा. लि. मुंबई यांना दिनांक १.१०.२०१९ ते दिनांक २८.२.२०२० या पाच महिन्याच्या कालावधी कालावधी करीता मंजूर दरात मुदतवाढ देणेस मान्यता करीता प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरच्या प्रस्तावास मा. तदर्थ(Ad- hoc) समितीचे दिनांक ४.१२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ५१६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दिनांक १.३.२०२० ते दिनांक २८.२.२०२१ या एक वर्ष कालावधी करीता STP व ETP प्लॅन्टचे एकत्रित वार्षिकऑपरेटींगवमेंटनंन्स (AMC) देणेकामी तत्सम काम करणा-या एजन्सी कडून खर्चाचा अंदाज येणेकरीत ईमेल द्वारे दरपत्रक मागविणेत आले असून त्यानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मनुष्य बळ | 65,380.00 |
| 2 | केमिकल | 33,410.00 |
| 3 | दुरुस्ती, सुपरविजन , पाणी तपासणी अहवाल | 31,772.00 |
| 4 | प्रति माह एकुण खर्च (1+2+3) | 1,30,562.00 |
| 5 | एक वर्षाकरीता येणार एकुण खर्च (अ.नं. 4X 12 ) | 15,66,744.00 |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील STP व ETP प्लॅन्टचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्स (AMC) देणेकामी रक्कम रु १५,६६,७४४/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. तदर्थ (Ad-Hoc) समितीची मान्यता घेऊन ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करता येईल.

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील STP व ETP प्लॅन्टचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक ऑपरेटींग व मेंटनंन्स (AMC) देणेकामी एकत्रित ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१५,६६,७४४/-पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) तसेच दुषीत पाणी प्रक्रिया प्रकल्पाचे (ETP) वार्षिक ऑपरेटींग व मेटनन्स (AMC) देणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५,६६,७४४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१९** **वुलन ब्लॅकेट खरेदीबाबत पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांचे दि.०९.१०.२०१९ चे दि.१६.१०.२०१९ रोजी प्राप्त झालेले वुलन ब्लॅकेंटसाठी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबतचे पत्र.**

**प्रस्ताव-** मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांनी दि.०९.१०.२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

This is with reference to the tender id.2019_SAI_397673_1 and tender reference number SSST/Purchase/2019/10/Woolen Blanket for the supply of woolen blanket on 5th March, 2019.

We would also like to brought into your kind knowledge that we had already submitted our sample & test report on 24th March, 2019 & Security Payment of Rs.51,750/- vide NEFT Txn. No.000197598930 on 19th June, 2019 after request from your Sansthan, but even after 6 months from the allotment of contract and submission of other requirements, we have not been issued any PO or any confirmation letter regarding the work order.

Therefore, we hereby request you to please refund our security deposit payment of Rs.51,750/- and we assure you that we will redeposit the security payment as and when the po will be issued to us.

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

मे.बांठिया एंटरप्रायजेस, पुणे यांनी दिलेल्या ब्लॅकेटचा नमुन्याची संस्थानच्या तांत्रिक स्पेसिफिकेशप्रमाणे टेक्सटाईल लॅबमध्ये साईभक्त निवास विभागाने तपासणी करून घेतली असता, सदर वुलन ब्लॅकेट ही संस्थानचे टेक्निकल स्पेसिफिकेशनप्रमाणे नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत साईभक्त निवासस्थान विभागाने सादर केलेल्या दि.०३.१२.२०१८ च्या टिपणीवर RE-Tender करा असे निर्देश होते. त्यास अनुसरून खरेदी विभागाकडून दि.१९.१२.२०१८ रोजी फेर ई-निविदेसह प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यानुसार वुलन ब्लॅकेटसाठी दि.१४.०१.२०१९ ते ०४.०२.२०१९ या कालावधीत नवीन फेर ई-निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. यामध्ये ८ ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर ई-निविदांचे तांत्रिक बीड दि.११.०२.२०१९ रोजी उघडण्यात आले होते. तसेच दि.१३.०२.२०१९ रोजी पात्र ८ निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडणेत आले होते.

यामध्ये मे.पुजा इंटरनॅशलन, लुधियाना यांचे प्रती नग रू.६९०/- असे दर प्राप्त झाले होते. त्यांनी मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.१८.०२.२०१९ चे सभेत हे दर कमी करणेस असमर्थता दर्शविली होती. मात्र सदर निविदाधारक हे महाराष्ट्राबाहेरील असल्यामुळे खरेदी नियमावलीतील ३.१.२.८ तरतुदीनुसार महाराष्ट्रातील व्दितीय न्युनतम दरधारक मे.ओम एजन्सी, औरंगाबाद यांना L1 च्या दरात पुरवठा करण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत मा.उपसमितीचे दि.१८.०२.२०१९ चे सभेत समक्ष विचारणा करण्यात आली होती. चर्चेअंती त्यांनी

प्रथम न्युनतम दरधारकाचे दरात ५० टक्के म्हणजेच २५०० वुलन ब्लॅकेटचा पुरवठा करण्याचे मान्य केले आहे व तसे संमतीचे लेखी पत्रही त्यांनी दिले होते. त्यामुळे संस्थानची वुलन ब्लॅकेटची एकुण ५,००० नगाची मागणी दोन पुरवठाधारकांना न्यूनतम दराने सम प्रमाणात विभागणी करून पुरवठा आदेश देण्याची मा.उपसमितीने दि.१८.०२.२०१९ चे सभेत शिफारस केली होती. सदर मा.उपसमितीचे इतिवृत्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कायम करण्यात आले होते. तसेच लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागणार असल्यामुळे लेटर ऑफ इंटेन्ट देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि सदर फाईल स्वाक्षरी होऊन दि.२१.०३.२०१९ रोजी प्राप्त झाली होती. नेमकी दि.१०.०३.२०१९ पासून लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता चालू झाल्यामुळे सदर पत्रे आचारसंहितेनंतर देण्याचे ठरले होते.

आचारसंहिता दि.२६.०५.२०१९ रोजी संपल्यानंतर सदर पत्रे दि.०३.०६.२०१९ रोजी मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना व मे.ओम एजन्सी, औरंगाबाद यांना देण्यात आले होते. मे.पुजा इंटरनॅशनल यांनी वुलन ब्लॅकेटचा नमुना दि.१३.०६.२०१९ रोजी तर मे.ओम एजन्सीज, औरंगाबाद यांनी दि.२०.०६.२०१९ रोजी सादर केला होता. तसेच मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांनी रक्कम रू.५१,७५०/- मात्र संस्थानकडे सुरक्षा अनामत रक्कम भरली आहे. तर मे.ओम एजन्सीज,औरंगाबाद यांची निविदेसोबत बयाणा रक्कम रू.५५,०००/- संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून जमा आहे.

सदर दोन्हीही नमुने अनुक्रमे २०.०६.२०१९ व २२.०६.२०१९ रोजी प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान यांचेकडे वुलन ब्लॅकेटचे निविदेत दिलेले टेक्निकिल स्पेसिफिकेशनप्रमाणे पडताळणी करून पुरवठा आदेश देणेबाबत लेखी अभिप्राय देणेसाठी पाठविले होते. तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाला याबाबत पाठपुरावा म्हणून दि.१५.०७.२०१९ रोजी स्मरणपत्र देण्यात आलेले होते. सदर स्मरणपत्रावर साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने दि.१७.०७.२०१९ चे पत्रान्वये सदर ब्लॅकेटचे नमुने लॅब तपासणीसाठी दि.१४.०७.२०१९ रोजी WRA, ठाणे या लॅबकडे पाठविल्याचे व रिपोर्ट प्राप्त झालेनंतर अभिप्राय कळविण्यात येतील असे कळविले होते. यानंतरही साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. तथापि अदयापपर्यंत त्यांचा लेखी अभिप्राय प्राप्त झालेला नाही. मात्र साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडून मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांचा ब्लॅकेटचा नमूना संस्थानचे स्पेसिफिकेशनप्रमाणे ६५ टक्के बरोबर असल्याचे तसेच मे.ओम एजन्सीज,औरंगाबाद यांचा ब्लॅकेटचा नमूना संस्थानचे स्पेसिफिकेशनप्रमाणे ३५ टक्के बरोबर असल्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर संबंधित निविदाधारकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी निर्देश दिल्याचे सांगितले होते. याबाबत साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने ॲड.श्री.जे.के.गोंदकर, शिर्डी यांना याबाबत सल्ला मिळणेसाठी पत्र दिले होते. त्यावर त्यांनी दि.१३.११.२०१९ रोजीचे पत्राने " दोन्ही निविदाधारकांकडून सदरचे वुलन ब्लॅकेट आपले स्पेसिफिकेशनप्रमाणे सादर करणेबाबत कळविणे व दिलेले नमुने हे स्पेसिफिकेशनप्रमाणे नाही, असेही कळविणे जरूरीचे आहे. तसेच जर दोन्ही निविदाधारक आपले स्पेसिफिकेशनप्रमाणे सदर वुलन ब्लॅकेट आपणास पुरविणार नसतील तर त्यांचेबरोबर करार करण्याचे कारण नाही. मात्र त्यांचेवर एकदम फौजदारी गुन्हा नोंदविणे हे वर नमूद केलेप्रमाणे उचित होणार नाही." असा अभिप्राय दिला आहे.

सदर ब्लॅकेटबाबत साईभक्त निवासस्थान विभागाने मे.पुजा इंटरनॅशनल,लुधियाना व मे.ओम एजन्सीज, औरंगाबाद या निविदाधारकांकडुन वुलन ब्लॅकेटमध्ये असलेल्या त्रुटीबाबत चर्चा करून आपल्या स्पेसिफिकेशन मागणीप्रमाणे सुधारणा करून पुन्हा नमुना मागविणेस किंवा वुलन ब्लॅकेटचे नमुने आपल्या मागणीप्रमाणे नसल्याने पुढील योग्य ती उचित कार्यवाही होणेस नम्र विनंती. असे दि.१०.१२.२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे.

दरम्यान निविदाधारकांनी संस्थानकडे सादर केलेल्या ब्लॅकेटच्या नमुन्यांनाही चार महिन्याचा कालावधी उलटला आहे व याबाबत संस्थानकडून पुढे काहीही कळविले न गेल्यामुळे मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना वरीलप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम परत करणेची मागणी केली आहे. तसेच दुसरे पुरवठाधारकही दुरध्वनी करून सुरक्षा अनामत रकमेची मागणी करत आहे.

वुलन ब्लॅकेटच्या यापुर्वीचे प्रथम ई-निविदेच्या बाबतीत मागील पुरवठादार मे.बांठिया एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून प्रथम ब्लॅकेटचा नमूना लॅब रिपोर्ट बरोबर न आल्याने त्यांना बलॅकेटचा नमूना दुस-यांदा देण्याची संधी देण्यात आली होती. यामध्येही त्यांचे रिपोर्ट संस्थानचे स्पेसिफिकेशनप्रमाणे प्राप्त झाले नव्हते. तसेच सध्याचे दोन्हीही निविदाधारकांचे ब्लॅकेटचे संस्थानने लॅब तपासणी केलेले रिपोर्ट संस्थानचे स्पेसिफिकेशनप्रमाणे प्राप्त झालेले नाहीत.

मागील पुरवठादाराला दिलेल्या दोन संधी व सध्याचे २ निविदाधारकांना दिलेली प्रत्येकी एक संधी या ४ ही वेळचे लॅब तपासणीमध्ये संस्थान स्पेसिफिकेशनप्रमाणे लॅब रिपोर्ट प्राप्त झालेले नाहीत असे दिसून येते. त्यामुळे सदर ई-निविदा प्रक्रिया रद्द करून ब्लॅकेटचे टेक्निकल स्पेसिफिकेशन पुन्हा साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामार्फत तपासून त्यानंतर पुन्हा याकामी तिस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया करावी व सध्याचे दोन्हीही निविदाधारकांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी असे वाटते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता,

१. सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करावी अगर कसे?

२. वुलन ब्लॅकेटचे टेक्निकल स्पेसिफिकेशनची साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामार्फत पुर्न:तपासणी करून फेर ई-निविदा प्रक्रिया करावी अगर कसे?

३. मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांची रू.५१,७५०/- व मे.ओम एजन्सीज, औरंगाबाद रू.५५,०००/- मात्र यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करावी अगर कसे?

किंवा

नवीन ब्लॅकैटचे नमुने मागवुन पुन्हा लॅब तपासणी करावी किंवा कसे?

वरील "१" ते "३" किंवा नवीन ब्लॅकैटचे नमुने मागवुन पुन्हा लॅब तपासणी करावी किंवा कसे? याबाबत उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वुलन ब्लॅकेट खरेदी करणेबाबतची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, मे.पुजा इंटरनॅशनल, लुधियाना यांची रक्कम रू.५१,७५०/- व मे.ओम एजन्सीज, औरंगाबाद यांची रक्कम रू.५५,०००/- मात्र संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली. तसेच वुलन ब्लॅकेटचे टेक्निकल स्पेसिफिकेशनची साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामार्फत पुर्न:तपासणी करून याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग/श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.२०** **मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचेकडील हरबराडाळ पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे संस्थानचे झालेले नुकसान भरपाईसाठी ॲड श्री. भवर यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार दिवाणी दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे एकत्रीत ई-निविदेचा समावेश होता. गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले गहू, तांदुळ, साखर, व हरभरा दाळीचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले होते. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत कमर्शिअल बीड उघडण्यात आले होते.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना निवडलेल्या हरबरादाळीचे नमुन्यांचे दरांमध्ये त्यांचे दर न्यूनतम असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते. तथापि ते चर्चा वाटाघाटीस अनुपस्थित होते.

मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांचे हरभरा दाळीसाठीचे प्रती क्विंटल दर तज्ञांनी निवडलेले हरभरा दाळीचे नमुन्यांमध्ये इतर निविदाधारकांपेक्षा ४ ही क्वार्टरमध्ये न्यूनतम आहेत. त्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडिंग

कंपनी, बार्शी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/८३४/२०१९ दि.११/६/२०१९ रोजीचा पुरवठा आदेश ई-मेलद्वारे देण्यात आला होता.

तथापि, मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.११ जून, २०१९ रात्रौ ९.४२ वाजता खालीलप्रमाणे ई-मेलद्वारे कळविले होते.

We have learnt about allotment of Tender to us by going through attached Work Order sent through this email.

However, you are hereby informed that, in view of unexpected unforeseen financial difficulties which our firm is going through at present and considering the terms and conditions mentioned in the Work Order, it would be difficult for us to enter into any agreement.

संस्थानच्या किराणा माल व इतर अनुषंगिक साहित्याचे वार्षिक ई-निविदेमध्ये प्रथमच मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी हरभरा दाळ पुरविणेस असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे हरबराडाळ खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागली होती. तसेच हरबराडाळ ३०० क्विंटल तातडीने दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून प्रती क्विंटल रू.५,३३९/- दराने खरेदी करावी लागली असून याकामी रू.१६,०१,७००/- खर्च आला होता. थोडक्यात हरबराडाळ खरेदी साठीची निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत आवश्यकतेप्रमाणे एकुण ६८५.१७ क्विंटल हरबराडाळ रू.५३३९/- प्रती क्विंटल दराने मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात आली होती.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ व खादयतेलाचा पुरवठा न केल्याने संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्याने कारवाई करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.३५८- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी हरबराडाळ पुरवठा करण्यास नकार दिल्याने तातडीने दरपत्रकाव्दारे करण्यात आलेल्या ३०० क्विंटल हरबराडाळ खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रू.१६,०१,७००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच तातडीने हरबराडाळ खरेदी कामी आलेल्या वाढीव खर्चाची रक्कम मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचेकडून वसुल करण्यात येऊन त्यांचे नाव पुढील तीन वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात यावे तसेच MSME अंतर्गत निघणा-या त्रुटी बाबत सविस्तर तपासणी करून प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.
हरबराडाळ खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारी हरबराडाळ सध्याचे दरपत्रकातील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास तसेच ते पुरवठा करण्यास तयार नसल्यास दरपत्रकाव्दारे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी दि.११.०६.२०१९ चे मेल अन्वये हरबराडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे संस्थानला दरपत्रके मागवून तातडीने डाळ खरेदी करावी लागली होती. तसेच फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागली होती. त्यामुळे निविदा अटी-शर्तीमधील तरतुदीनुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचेकडून संस्थानची झालेली नुकसान भरपाई वसुल होणे गरजेचे आहे. निविदा अटी-शर्तीमधील N. आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाई या तरतुदीमध्ये अ.नं.३ मध्ये खालील तरतुद आहे.

तरतुद क्रं.३- निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

वरील तरतुदीचा विचार करता मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी हरबराडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे A,B व E मध्ये नमूद केलेप्रमाणे जादा खर्च आलेला आहे. तसेच C व D मध्ये नमूद केलेप्रमाणे डिसेंबर २०१९ पर्यंत जादा खर्च येणार आहे. जानेवारी २०२० ते मार्च २०२० या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया होऊन याकामीचा दर मे.अमितकुमार ट्रेडिंग, बार्शी यांचे दरापेक्षा कमी असल्यामुळे याकामी संस्थानला जादा खर्च येणार नाही. त्यामुळे या कालावधीसाठी रक्कम वसुलीचा प्रश्नच उद्भत नाही.

A. ११ जून २०१९ ते २९/७/२०१९ या फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी संस्थानने दरपत्रकाव्दारे मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून हरबराडाळ खरेदी केली त्यासाठी झालेला खर्च खालील तक्त्यात नमूद केलेला आहे.

| तारीख | परिमाण | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| २७.०६.२०१९ | १६८.३० | ५,३३९/- | एप्रिल ते जुन २०१९- ५,३५०/-<br>जुलै ते सप्टेंबर २०१९- ५,४००- | - |
| ०१.०७.२०१९ | ११९.०४ | | | |
| ११.०७.२०१९ | १९९.२० | | | |
| १७.०७.२०१९ | ९९.२३ | | | |
| १८.०७.२०१९ | ९९.४० | | | |
| एकुण क्विंटल | ६८५.१७ | | | |

B. दि.३०.०७.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत मे.प्रमोद सप्लायर्स,मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या हरबराडाळीसाठी जादा आलेला खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| तारीख | परिमाण | मे.प्रमोद सप्लायर्स यांचे दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ३०.०७.२०१९ ते ११.१०.२०१९ | १८१२.५० | ५,४७०/- | ५,४००/- | १,२६,८७५/- |

C. संस्थानला १ ऑक्टोंबर २०१९ ते ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत हरबराडाळ खरेदीसाठी आलेला जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| तारीख | परिमाण | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १२.१०.२०१९ ते ३०.११.२०१९ | ६०१.२० | ५,७७०/- | ५,५००/- | १,६२,३२४/- |

D. संस्थानला ०१ डिसेंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत हरबराडाळ खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| तारीख | अंदाजे परिमाण | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.१२.२०१९ ते ३१.१२.२०१९ | १०९८.४० | ५,७७०/- | ५,५००/- | २,९६,५६८/- |

E. संस्थानचा  हरबराडाळ खरेदी फेर ई-निविदा प्रक्रिया जाहिरातीसाठी खर्च झालेला आहे. जनसंपर्क कार्यालयाकडून दि.२५.०७.२०१९ व दि.१४.०८.२०१९ चे पत्राने प्राप्त झालेला खर्च एकत्रित करुन तो खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| अ.नं | तपशिल | आलेला खर्च |
|---|---|---|
| १ | जाहिरात खर्च | १,०१,२०९/- |

| | |
|---|---|
| एकुण वर नमूद A to E प्रमाणे संस्थानचा झालेला व जादा होणारा खर्च | ६,८६,९७६/- |

वरील A,B,C,D व E प्रमाणे संस्थानला आलेला जादा खर्च व येणारा सर्व खर्च रू.६,८६,९७६/- वर सविस्तर नमूद केला आहे.

वरीलप्रमाणे नोव्हेंबर २०१९ पर्यंत झालेला वाढीव व डिसेंबर २०१९ पर्यंत होणारे वाढीव खर्चाची रक्कम त्यांचेकडून वसुल करणेकामी त्यांना सदर रक्कम संस्थान खाती जमा करणेबाबत इकडील

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२३१/२०१९ दि.१०.०९.२०१९ अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी सदर नोटीसचा खुलासा श्री.जितेंद्र वाघ, ॲडव्होकेट, हायकोर्ट, औरंगाबाद यांचेमार्फत दि.२८.०९.२०१९ रोजी केला आहे. तो यासोबत सादर केला आहे. सदर खुलाशाबाबत संस्थानकडून पुढे काय कारवाई करणे उचित होईल याबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेणेचे ठरले होते. त्यास अनुसरून ॲड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३०६०/२०१९ दि.०९.११.२०१९ अन्वये मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आले होते.

त्यावर ॲड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांनी दि. १४.११.२०१९ चे पत्रान्वये त्यांचे मत कळविलेले आहे. ते यासोबत सादर केले आहे. यामध्ये त्यांनी संस्थानचे झालेले नुकसानीसाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे त्यांचे मत कळविले आहे.

"In view of the above, as per our opinion, it would appropriate for Shri Saibaba Sansthan Trust to file a civil suit in Civil Court for claiming the amount losses & damages against M/s. Amitkumar Trading Company, Barshi.

तरी वरील संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्यानुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचे विरूध्द राहाता येथील वरीष्ठ दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावा अगर कसे? याबाबत पुढील उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची पुर्न:तपासणी करुन सविस्तर फेर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२१** **मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचेकडील खाद्यतेलाचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे संस्थानचे झालेले नुकसान भरपाईसाठी ॲड श्री.भवर यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार दिवाणी दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणामाल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.३६,९२,३५,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर प्रस्ताव दि.२५.०१.२०१९ रोजी खरेदी विभागाकडे देण्यात आला होता. त्यानुसार खरेदी विभागाने प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा दि.११.०२.२०१९ ते ०२.०३.२०१९ या कालावधीत मागविल्या होत्या. यामध्ये खादय तेलाचा समावेश होता. खादय तेलाच्या ई-निविदा ४ क्वार्टरसाठी ४ टप्प्यांमध्ये स्वतंत्र दरांसाठी मागविण्यात आल्या होत्या.

खादय तेल खरेदीच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०७.०३.२०१९ रोजी उघडण्यात आल्या होत्या. तथापि दि.१०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरू झाल्यामुळे याबाबतची पुढील नमूने निवडणे, कमर्शिअल बीड उघडणे, चर्चा-वाटाघाटी करणे व मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता घेणे वगैरे कार्यवाही आचारसंहिता संपलेनंतर करणेचे ठरले होते. त्यास अनुसरून तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले खादयतेलाचे नमुने तज्ञांकडून दिनांक २१.०५.२०१९ रोजी निवडण्यात आले आहेत. तसेच दि.३०.०५.२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत कमर्शिअल बीड उघडण्यात आले होते.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांना हरबरा दाळ व खादय तेलामध्ये त्यांचे दर न्यूनतम असल्याचे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेत चर्चा व वाटाघाटीसाठी करणेसाठी उपस्थित राहणेबाबत त्यांना दि.४/६/२०१९ रोजी दूरध्वनीवर कळविण्यात आले होते.

त्यानंतर मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी, बार्शी यांनी दि.५/६/२०१९ रोजी सायंकाळी खालीलप्रमाणे ई-मेल पाठविला होता.

We had participated in the captioned tender process. It is learnt that we are L1 in the abovementioned Tender for Edible Oil.

However, after going through the commercial bids of other bidders, we realized that inadvertently while calculathing per Quintal rate, we had considered " per Litre rate"

(instead of per kilogram rate) while quoting per Quintal rate (as per the Standard 15 litre packing rate quoted to us by the manufacturers).

Under such circumstances, we request you to kindly reconsider our rate calculating as-per litre rate in proportion to per quintal rate; instead of per kilo rate in proportion to per quintal rate. Otherwise it will not be possible for us to supply the Edible Oil as required by you. This is nothing but a calculation error as per Litre rate is used and prevailing in the market as a standard.

सदर ई-मेलबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे निर्णय क्रं.२६० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्रं.२६०- प्रस्तुत प्रकरणी राविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक अमितकुमार ट्रेडिंग कंपीन, बार्शी हे आजचे व्यवस्थापन समितीसभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापि त्यांनी दि.०५.०६.२०१९ रोजी ई-मेलव्दारे खादयतेलाचे दर हे लिटरचा विचार करून भरलेले आहेत. व त्यामुळे सदर दरामध्ये दरवाढ मिळावी अन्यथा ते खादयतेल पुरवठा करणेस असमर्थ असल्याचे कळविले होते.
यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदा अटी-शर्ती व सुधारित खरेदी नियमावलीतील दरवाढ देण्याची तरतुद नसल्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बर्शी यांची विनंती फेटाळण्यात येऊन, ते पुरवठा करण्यास तयार नसल्यामुळे व त्यांनी MSME सवलत घेऊन निविदा भरलेली असल्यामुळे, पुढील तीन वर्षासाठी त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे, असे ठरले.
तसेच याकामी त्वरीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारे खादयतेल मागील पुरवठाधारक यांचेकडून मंजूर दराने खरेदी करावे, ते पुरविण्यास तयार नसल्यास तातडीने दरपत्रके मागवुन खादयतेल खरेदी करावे, असे ठरले.

वरील निर्णयाप्रमाणे मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांचा काळया यादीत समावेश करून तसे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/९१५/२०१९ दि.१३.०६.२०१९ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच खादयतेल खरेदीकामी संस्थानने जुलै ते सप्टेंबर २०१९, ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ व जानेवारी ते मार्च २०२० या कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन यामध्ये मे.कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. दरम्यानचे कालावधीत नवीन फेर ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत मे.कैलास फुड अॅण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून मागील तिमाहीचे (जानेवारी ते मार्च-२०१९) चे दराने संस्थानने खादयतेलाची खरेदी केली होती.

मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांनी वरील त्यांचे ई-मेल अन्वये दरवाढ मागितली होती. ती नामंजूर करण्यात आली आहे. तथापि निविदा अटी-शर्तीमधील N. आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाई या तरतुदीमध्ये अ.नं.३ मध्ये खालील तरतुद आहे.

तरतुद क्रं.३-निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

वरील तरतुदीचा विचार करता मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी, बार्शी यांनी खादयतेल पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे, संस्थानला खालील A,B व C मध्ये नमूद केलेप्रमाणे जादा खर्च आलेला आहे. तसेच F मध्ये नमूद केलेप्रमाणे जाहिरात खर्च आला आहे आणि D व E नमूद केलेप्रमाणे मार्च २०२० पर्यंत जादा खर्च येणार आहे.

A. ११ जून २०१९ ते ३१/७/२०१९ या फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी संस्थानला मागील वर्षाचे पुरवठाधारक मे.कैलास फुड अॅन्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून मागील तिमाहीचे (जानेवारी ते मार्च २०१९) दराने खादय तेल खरेदी करावे लागले होते. त्यामुळे याकामी जादा आलेला खर्च खालील तक्त्यात नमूद केलेला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १८.०६.२०१९ | ५१.६० | ८,८७५/- | ८,८६५/- | ३,५०१/- |
| २५.०६.२०१९ | २४८.५५ | ८,८७५/- | ८,८६५/- | |
| ०६.०७.२०१९ | ४९.९५ | ८,८७५/- | ८,८६५/- | |
| एकुण | ३५०.१०० | | | |

B. खादय तेलाचे फेर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर ई-निविदेचा पुरवठा आदेश दि.१/८/२०१९ रोजी मे.कैलास फुड अॅन्ड जनरल स्टोअर्स, सातारा यांना देण्यात आलेला आहे. त्यांचेकडून दि.१/८/२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत संस्थानने नवीन ई-निविदा दराने मे.कैलास फुड अॅन्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेकडून खादय तेल खरेदी केलेले आहे. सदर तेल खरेदीसाठी आलेला जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.०८.२०१९ ते ३०.०९.२०१९ | ५४९.९५ | ९,१५०/- | ८,८६५/- | १,५६,७३५.७५ |

C. संस्थानला ०१ ऑक्टोंबर २०१९ ते ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले उर्वरित परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी केलेचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा आलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.१०.२०१९ ते ३०.११.२०१९ | २२९.३८ | ९,१९०/- | ८,८७५/- | ७२,२५४.७० |

D. संस्थानला ०१ डिसेंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे. यामध्ये तेलाची खरेदी आवश्यकतेनुसार केली जाणार असल्यामुळे सदर खरेदीचे परिमाण कमी होण्याची शक्यता आहे.

| खरेदी करावयाचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.१२.२०१९ ते ३१.१२.२०१९ | ५२१.१२ | ९,१९०/- | ८,८७५/- | १,६४,१५२.८० |

E. संस्थानला जानेवारी २०२० ते मार्च २०२० पर्यंत फेर ई-निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेले दराने निविदेमध्ये नमूद केलेले परिमाणाइतके खादयतेल खरेदीसाठी येणारा जादा खर्च खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| खरेदी करावयाचा कालावधी | परिमाण क्विंटल | फेर ई-निविदा दर प्रती क्विंटल | मे.अमितकुमार यांचे दर प्रती क्विंटल | जादा येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१.०१.२०२० ते ३१.०३.२०२० | ७५०.५० | ९,२५०/- | ८,८७५/- | २,८१,४३७.५० |

F. संस्थानचा खादय तेल खरेदी फेर ई-निविदा प्रक्रिया जाहिरातीसाठी खर्च झालेला आहे. जनसंपर्क कार्यालयाकडून दि.२५.०७.२०१९ व दि.१४.०८.२०१९ चे पत्राने प्राप्त झालेला खर्च एकत्रित करुन तो खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| अ.नं | तपशिल | आलेला खर्च |
|---|---|---|
| १ | जाहिरात खर्च | ८९,२६२/- |

| | |
|---|---|
| एकुण वर नमूद A to F प्रमाणे संस्थानचा झालेला व जादा होणारा खर्च | ७,६७,३४३.७५ |
| पुर्णांकित रक्कम रूपये | ७,६७,३४४/- |

वरील A,B,C,D,E व F प्रमाणे संस्थानला आलेला जादा खर्च व येणारा जादा खर्च तसेच जाहिरात खर्च असे एकुण खादयतेल खरेदीसाठी संस्थानचा जादा खर्च रू.७,६७,३४४/- वर सविस्तर नमूद केले प्रमाणे झालेला आहे.

वरीलप्रमाणे वाढीव झालेला व होणारे मार्च २०२० पर्यंतची खर्चाची रक्कम त्यांचेकडून वसुल करणेकामी त्यांना सदर रक्कम संस्थान खाती जमा करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२३०/२०१९ दि.१०.०९.२०१९ अन्वये पत्र देण्यात आले होते. त्यावर त्यांनी सदर नोटीसचा खुलासा श्री.जितेंद्र वाघ, ॲडव्होकेट, हायकोर्ट, औरंगाबाद यांचेमार्फत दि.२८.०९.२०१९ रोजी केला आहे. तो यासोबत सादर केला आहे. सदर खुलाशाबाबत संस्थानकडून पुढे काय कारवाई करणे उचित होईल याबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेणेचे ठरले होते. त्यास अनुसरून ॲड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३०६०/२०१९ दि.०९.११.२०१९ अन्वये मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आले होते.

त्यावर ॲड.श्री.नितीन भवर, हायकोर्ट यांनी दि. १४.११.२०१९ चे पत्रान्वये त्यांचे मत कळविलेले आहे. ते यासोबत सादर केले आहे. यामध्ये त्यांनी संस्थानचे झालेले नुकसानीसाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे त्यांचे मत कळविले आहे.

“In view of the above, as per our opinion, it would appropriate for Shri Saibaba Sansthan Trust to file a civil suit in Civil Court for claiming the amount losses & damages against M/s. Amitkumar Trading Company, Barshi.

तरी वरील संस्थान ॲडव्होकेट यांचे सल्ल्यानुसार मे.अमितकुमार ट्रेडिंग कंपनी,बार्शी यांचे विरूध्द राहाता येथील वरीष्ठ दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावा अगर कसे? याबाबत पुढील उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची पुर्न:तपासणी करुन सविस्तर फेर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२२** **मे.जय योगेश्वर ॲन्ड कंपनी, राहाता यांनी सन २०१९-२० या निविदा पुरवठा कालावधीतील नोव्हेंबर ते डिसेंबर २०१९ या दोन महिन्याच्या कालावधीत संस्थानला पुरविलेल्या व पुरवावयाच्या कांदयासाठी दरामध्ये दरवाढ मिळणेचे विनंतीपत्राबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१९-२० या कालावधीतील भाजीपाला पुरवठादार मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांनी दि.०४.११.२०१९ रोजीचे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

“ सन २०१९-२० (माहे जुलै १९ ते डिसेंबर १९) या कालावधीत मला साईबाबा संस्थानचे भाजीपाला विभागाचे कांदा पुरविण्याचे टेंडर मिळाले होते. मी आजपर्यंत ते पुरविले. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे (अतीवृष्टीमुळे) कांदयाचे पिकाचे पुर्ण नुकसान होऊन कांदयाचे भाव गगनाला भिडले आहे. माझे टेंडर भाव रू.१६/- प्रती किलो असून सध्याचे भाव ६०-६५ रू.प्रती किलो आहे माझे प्रचंड नुकसान होत असून कांदयाचे भाव अजून आठ दिवसात ८० रू. प्रती किलो होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करून मला टेंडर मध्ये नियम व अटी क्रं.३५ नुसार भाव वाढ करून मिळावी ही विनंती.

इथुन मागे चार महिने मी प्रामाणिक पणे कांदा पुरविला त्यात पण माझे प्रंचड नुकसान झाले आहे तरी सर्व नैसर्गिक आपत्तीचा विचार करून माझ्या बाबतीत विचार व्हावा ही विनंती.”

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

संस्थानचे प्रसादालय विभागाचे मागणीस अनुसरून सन २०१९-२० साठी भाजीपाला खरेदीची ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/५८६६/२०१९ दि.०५.०३.२०१९ अन्वये खालील तपशीलाप्रमाणे क्वॉर्टर वाईज पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| **APRIL TO JUNE -2019** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Description of Work / Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **Rate per Kg** | **Total Amount** |
| 1 | पालक – चांगल्या प्रतिचा | 7500 | किलो | 12.90 | 96,750.00 |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | | **96,750.00** |
| | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **2,903.00** |
| **July to September-2019** | | | | | |
| **Sr.No** | **Description of Work / Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **Rate Per Kg** | **Total Amount** |
| 1 | कांदा – चांगल्या प्रतिचा, मोठा | 62500 | किलो | 13.80 | 862,500.00 |
| 2 | कढीपत्ता –चांगल्या प्रतिचा | 1375 | किलो | 24.70 | 33,962.50 |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | | **896,462.50** |
| | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **26,894.00** |
| **OCTOBER TO DECEMBER-2019** | | | | | |
| **Sr.No** | Description of Item(s) | **No.of Qty** | **Units** | **Rate Per Kg** | **Total Amount** |
| 1 | कांदा – चांगल्या प्रतिचा, मोठा | 62500 | किलो | 15.85 | 990,625.00 |
| 2 | डांगर – चांगल्या प्रतिचा,मोठे | 25000 | किलो | 8.80 | 220,000.00 |
| 3 | पालक – चांगल्या प्रतिचा | 7500 | किलो | 11.90 | 89,250.00 |
| 4 | कढीपत्ता –चांगल्या प्रतिचा | 1375 | किलो | 24.70 | 33,962.50 |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | | **1,333,837.50** |
| | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **40,015.00** |
| **JANUARY TO MARCH-2020** | | | | | |
| **Sr.No** | Description of Item(s) | **No.of Qty** | **Units** | **Rate per Kg** | **Total Amount** |
| 1 | हिरवी मिरची – लवंगी (गावरान) | 11250 | किलो | 31.25 | 351,562.50 |
| 2 | पालक – चांगल्या प्रतिचा | 7500 | किलो | 11.80 | 88,500.00 |
| 3 | कढीपत्ता –चांगल्या प्रतिचा | 1375 | किलो | 24.60 | 33,825.00 |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | | **473,887.50** |
| | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **14,217.00** |

वरीलप्रमाणे एकुण रक्कम रू.२८,००,९३७.५० मात्रचे वार्षिक पुरवठयापोटी त्यांनी संस्थानला दि.२०.०३.२०१९ रोजी करारनामाही करून दिलेला आहे. सदर करारनाम्यात दरवाढीबाबत व इतरही काही तरतुदी आहेत त्या खालीलप्रमाणे:-

९. वरील अ.नं.८ मध्ये नमूद केलेप्रमाणे पार्टी नं.२ यांनी मंजूर दराने भाजीपाल्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

२३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार पार्टी नं.१ संस्थानचे व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. पार्टी नं.१ निविदाधारकाची कोणतीही अट/अटी पार्टी नं.२ संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

२४. सदर करारनाम्यातील सर्व शर्ती व अटी पार्टी नं.२ यांचे वर बंधनकारक राहतील, मात्र कोणत्याही एका अटीचा भंग पार्टी नं.२ यांनी केल्यास सदरचा करार पार्टी नं.१ यांना कोणतीही लेखी सुचना न देता रद्द करण्याचा

अधिकार राहिल व तशा परीस्थितीत पार्टी नं.२ यांचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी पार्टी नं.१ यांनी पत्करलेली नाही.

तथापि सदर पुरवठाधारक मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांनी निविदेतील खालील तरतुद क्रं.३५ नुसार दरवाढीची मागणी केली आहे.

अट क्रं.३५- निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गीक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेंबदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक भाजीपाला पुरवठा करू शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरूप घेण्यात येईल.

वरील अटीचा विचार करता, नैसर्गिक आपत्तीमुळे निविदाधारक पुरवठा करू शकला नाही व तसे संस्थानला लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरूप घेण्यात येईल. अशी तरतूद आहे.

महाराष्ट्रामध्ये बहुतांशी ठिकाणी अतिवृष्टी झालेली आहे. नगर जिल्हयातही ब-याच ठिकाणी अतिवृष्टी होऊन शेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे कांदयाचे दरामध्येही मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. ही वस्तुस्थिती आहे. ही नैसर्गिक आपत्ती आहे. तसेच सदर आपत्ती ही निविदाधारक मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांचे नियंत्रणाबाहेर आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर संस्थानला लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुसार घेण्यात येईल. या अटी-शर्ती नुसार मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांनी ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ या तिमाहीसाठी दिलेल्या पुरवठा आदेशातील फक्त कांदयाचे दरामध्ये नोव्हेंबर ते डिसेंबर २०१९ या दोन महिन्याच्या कालावधीसाठी भाववाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांना दिलेल्या पुरवठा आदेशातील एप्रिल ते जून २०१९ व जुलै ते सप्टेंबर २०१९ हा कालावधी पुर्ण झालेला आहे आणि त्यांनी केलेल्या पुरवठयाबाबत प्रसादालय विभागाची तक्रार नाही.

संस्थानची ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ या तिमाहीतील कांदयाची मागणी ६२,५०० किलो आहे. यातून ऑक्टोबर महिना संपलेला आहे. उर्वरीत २ महिन्याचे कालावधीसाठी अंदाजे २५,००० ते ३०,००० किलो कांदा संस्थानला आवश्यक आहे. सदर कांदा पुरविणेसाठी सध्याचे मार्केट रेटचा सरासरी अंदाजे दर रू.५० ते ७०/- प्रती किलोचे दरम्यान आहेत. म्हणजेच संस्थानच्या निविदा मंजूर दराच्या तिपटीपेक्षाही जास्त आहेत.

सदरचे पुरवठाधारकाने ऑक्टोबर महिन्यातील दि.१०,१३ व १४.१०.२०१९ या तारखेला कांदा पुरवठा केलेला नाही. म्हणून प्रसादालय विभागाने दि.१७.१०.२०१९ चे पत्राने कळविले होते. त्यानुसार त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२८२४/२०१९ दि.२५.१०.२०१९ अन्वये कारणे दाखवा नोटीसही देण्यात आली होती. तथापि प्रसादालय विभागाकडून प्राप्त झालेल्या बीलानुसार सदर पुरवठाधारकाने खालीलप्रमाणे कांदयाचा पुरवठा केलेला आहे.

| अ.नं | मालाचे वर्णन | माल मागणी तारीख | प्रसादालय विभागाची मागणी | पुरवलेल्या मालाचे वजन |
|---|---|---|---|---|
| १ | कांदा | १०.१०.२०१९ ते १२.१०.२०१९ | २००० किलो | १०८४ किलो |
| २ | कांदा | १३.१०.२०१९ ते १६.१०.२०१९ | २००० किलो | १४२३ किलो |

वरील तक्त्याचे अवलोकन करता सदर पुरवठाधारकाने १० तारखेला ५० टक्के व १३ तारखेला साधारण ७४.५० टक्के कांदयाचा पुरवठा केलेला आहे. प्रसादालय विभागाचे तक्रारीनुसार सदर पुरवठाधारकाने वरील ३ तारखांना मालाचा कमी पुरवठा केलेला आहे.

याबाबत सदर पुरवठाधारकाने खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे-

आपण दिलेल्या नोटीसबाबत खुलासा करतो की दि.१०,१३ व १४.१०.२०१९ व त्या आसपासच्या कालावधीमध्ये अतिवृष्टी (नैसर्गिक आपत्तीमुळे) भाजीपाला व कांदयाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे मार्केटला माल येत नव्हता तसेच काही ठिकाणी शेतातून माल बाहेर काढता येत नसल्यामुळे मार्केटला माल नसल्यामुळे थोडा उशीर झाला त्यामुळे सहकार्य करावे ही विनंती.

वरील खुलासा विचारात घेऊन, सदर पुरवठाधारकाला ताकीद देणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांनी संस्थानच्या निविदेतील व करारनाम्यातील नैसर्गिक आपत्ती नुसारचे अटीस अनुसरून कांदयाचे दरामध्ये नोव्हेंबर व डिसेंबर २०१९ या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी भाववाढ मिळण्याची विनंती केली आहे. निविदेतील व करारनाम्यातील तरतुदीनुसार नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन भाववाढ दयावी किंवा कसे? याबाबत उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीपुढे सादर करणेबाबत निर्देश आहेत.

सध्या कांदयाचे प्रती किलोचे दर रू.५० ते ७०/- चे दरम्यान आहेत. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यासाठी अंदाजे ३०,००० किलो कांदयाची आवश्यकता राहील. संस्थानचा ऑक्टोंबर ते डिसेंबर २०१९ या तिमाहीचा कांदयाचा दर प्रती किलो रू.१५.८५ पैसे आहे. पुरवठाधारक मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांचेकडून कांदयाचा पुरवठा चालू आहे.

अतिवृष्टी ही नैसर्गिक आपत्ती आहे व ही आपत्ती पुरवठादाराचे नियंत्रणा बाहेर आहे. त्यामुळे सदर पुरवठादाराने केलेले कांदयाचे दरवाढीचे विनंतीबाबत विचार व्हावा असे मत आहे.

तरी वरील वस्तुस्थिती विचारात घेता, नोव्हेंबर व डिसेंबर २०१९ या दोन महिन्यासाठी मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता यांनी पुरविलेल्या कांदयासाठी व पुरवाव्या लागणा-या कांदयासाठी रू.१५.८५ पैसे प्रती किलो दरामध्ये दरवाढ दयावयाची अगर कसे? याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२२** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२३** **संस्थानचे विविध विभागाकरीता कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करुन घेणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१९-२० करीता संस्थानचे सर्व विविध विभागांकरीता आवश्यक कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईकामी इकडील जा.नं.एसएसएस/वशी-भांडार/८०६/२०१९ दि.०४.०७.२०१९ अन्वये माहिती मागविण्यात आलेली होती. मुदती अखेर विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी करून छपाई करून घ्यावयाचे साहित्याचे साधारण एकुण २२९ आयटेम्सचे परिशिष्ठ सोबत जोडलेले आहे. यामध्ये सर्व विभागांसाठी वापरात येणारी जनरल छपाई व संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाई साहित्य ही एकत्रित केले आहे.

सदर छपाईकामी येणारे अंदाजे खर्च काढणेसाठी तीन प्रेसधारकांना बोलवून साहित्याचे छपाई सर्व नमुने त्यांना दाखवून त्यांचेकडून अंदाजे दर घेण्यात आले आहेत व त्या दरांची सरासरी काढून अंदाजे छपाईसाठी येणारा दर निश्चित करून Estimated Cost काढण्यात आलेली आहे.

संस्थानचे एकत्रित विभागवार करावयाचे कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | | विभागाचे नांव | विभागवार येणारा अपेक्षित छपाई खर्च |
|---|---|---|---|
| १ | A | लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ८,६६६.६७ |
| २ | B | साईप्रसाद निवासस्थान | १,८७,२७०.०० |
| ३ | C | व्दारावती भक्तनिवास | ५०,५९३.३३ |
| ४ | D | अभिलेख कक्ष | ३,१६३.३३ |
| ५ | E | जनसंपर्क विभाग | ११,७१०.०० |
| ६ | F | ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग | २,१३३.३३ |
| ७ | G | बगिचा विभाग | ६,०३८.३३ |
| ८ | H | पाणी पुरवठा विभाग | १५,६२०.०० |
| ९ | I | साई आश्रम भक्तनिवास | ३,३१,५६६.६७ |
| १० | J | बांधकाम विभाग | ५,९३३.३३ |
| ११ | K | मेकॅनिकल विभाग | ५,८१०.०० |
| १२ | L | आरोग्य विभाग | ७,५१३.३३ |
| १३ | M | प्रकाशने विभाग | ५,२२६.६७ |
| १४ | N | श्री साई प्रसादालय | ८१,२७८.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | O | सामान्य प्रशासन विभाग | ८,७८५.०० |
| १६ | P | फायर अॅण्ड सेप्टी विभाग | १३,०२०.०० |
| १७ | Q | मंदिर विभाग | ६,४२१.६७ |
| १८ | R | माहिती व तंत्रज्ञान विभाग | १४,८२३.३३ |
| १९ | S | साईबाबा भक्तनिवासस्थान | १०,५६६.६७ |
| २० | T | कॅन्टीन विभाग | ८०,४१०.०० |
| २१ | U | विद्युत विभाग | १,५८,०६५.०० |
| २२ | V | लेखाशाखा | १,८५,३९३.३३ |
| २३ | W | वाहन विभाग | ९६,८७५.०० |
| २४ | X | संरक्षण विभाग | ५७,८२३.३३ |
| २५ | Y | सी.सी.टी.व्ही.विभाग | १७,२३९.०० |
| २६ | Z | खरेदी विभाग | २,८६४.०० |
| २७ | Z-1 | भांडार विभाग | १४,८५३.०० |
| २८ | Z-2 | जनरल छपाई | ३,१६,६२५.०० |
| २९ | Z-3 | संगणक प्रीप्रिंटेड स्टेशनरी | ४२,६३,७००.०० |
| | | एकूण:- | ५९,६९,९८७.३२ |
| | | **एकूण पुर्णांकित रक्कम-** | **५९,६९,९८७/-** |

वरील परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे कार्यालयीन व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईकामी पुर्णांकित रक्कम ५९,६९,९८७/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा लागेल. सदर साहित्य अंदाजे छपाई खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने त्याची ई-निविदा प्रक्रिया करून छपाई करून घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे संस्थानचे विविध विभागांनी मागणी केलेप्रमाणे कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करून घेणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रू.५९,६९,९८७/- (अक्षरी रू.एकोणसाठ लाख एकोणसत्तर हजार नऊशे सत्त्याऐंशी) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागाकरीता कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५९,६९,९८७/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही-खरेदी भांडार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालवत असलेल्या मोफत बॅग क्लोकरुम, पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, प्रसाद व दुध स्टॉल इ. व्यवसायास पुढील ११ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे साईप्रसाद इमारत व साईउद्यान इमारत परिसरातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या जागा विविध व्यवसायाकामी दि.३१/०५/२०१२ ते जुलै २०१७ या कालावधीत भाडेतत्वावर वापरास देण्यात आलेल्या होत्या.

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण | मुदत |
|---|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालयमध्ये | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| २ | क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ३ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालया जवळ) | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ४ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालया जवळ) | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ६ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ७ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ८ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |

त्यानंतर माहे ऑगस्ट २०१७ मध्ये साईप्रसाद इमारती पाडण्यात आल्यानंतर उक्त संस्थेने स्वखर्चाने संस्थान मालकीचे जागेत उक्त तक्त्यात दर्शविलेल्या ठिकाणी स्टॉल तयार करुन त्यासमोर दर्शविलेप्रमाणे व्यवसाय सुरु केलेले आहे. म्हणजेच उक्त संस्था दि.३१/०५/२०१२ पासून आजही उक्त तक्त्यात दर्शविलेल्या संस्थान मालकीच्या ठिकाणच्या जागा सलगपणे वापरत आहेत.

यास्तव उक्त संस्थेस उक्त व्यवसाय करणेसाठी जागा वापराची मुदत दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत दर ११-११ महिन्यांसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन एप्रिल २०१७ पासून साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह सुविधा विनामोबदला पुरविणेच्या अटीवर मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या आणि उक्त संस्थेकडून दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीतील प्रति स्टॉल भाडेदराच्या फरकाची रक्कम रु.१,५५,७०९/- अशी एकूण आठ स्टॉलच्या भाडेदराच्या फरकाची एकूण रक्कम रु.१२,४५,६७२/- इतकी वसुल करणेच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्रं.५० हा खालीलप्रमाणे झालेला आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना पूर्वीचे साईप्रसाद इमारती व परिसरातील उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे आठ गाळे दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत दर ११-११ महिन्यांसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन एप्रिल २०१७ पासून साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह सुविधा विनामोबदला पुरविणेच्या अटीवर मुदतवाढ देणेस व करारनामा करुन घेणेस तसेच संस्थेकडून दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीतील प्रति स्टॉल भाडेदराच्या फरकाची रक्कम रु.१,५५,७०९/- अशा एकुण आठ स्टॉलच्या भाडेदराच्या फरकाची एकुण रक्कम रु.१२,४५,६७२/- इतकी वसुल करण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे अलाहिदा कार्यवाही करणेत आलेली असून सदर व्यवसायाची मुदत दि.३१/१०/२०१९ रोजी संपुष्टात आली असलेने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भांकित पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१७३/२०१९ दि.२१/११/२०१९ अन्वये "उक्त संस्था ही श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था असून संस्था संस्थान मान्यतेने संस्थान परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी स्नानगृह,मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर,थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल तसेच मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम चालवित असून त्या माध्यमातून श्री साईभक्तांना योग्य दरात उत्तम सेवा सुविधा पुरवित आहे. त्याचबरोबर संस्थेमार्फत संस्थेच्या सभासदांना व कामगारांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कर्जरुपाने मोठया प्रमाणात अर्थसहाय्य करत असल्याने संस्था ही संस्थेचे सभासद व कर्मचारी यांची कामधेनू आहे. संस्था साईप्रसाद इमारत व साईउद्यान इमारत परिसरात खालीलप्रमाणे सुविधा पुरवित आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालय इमारतीमध्ये. |
| २ | क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ३ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ४ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ६ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर. |
| ७ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ८ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर. |

उपरोक्त बॅग क्लोकरुम,मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम व पादत्राणेगृह,प्रसाद स्टोअर व दुध स्टॉलच्या जागा वापराची मुदत दि.३१/१०/२०१९ रोजी पूर्ण होत आहे. तरी संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी वरीलप्रमाणे चालवत असलेले व्यवसायास दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी चालविणेस परवानगी मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत साईभक्तांचे सोईसाठी चालविणेत येत असलेल्या उपरोक्त व्यवसायास पूर्वीप्रमाणेच दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१०,७१८/-+१०%प्रमाणे रु.१,०७२/- अशी एकुण दरमहा प्रति स्टॉल होणारी रक्कम रु.११,७९०/- इतकी म्हणजेच एकूण ८ स्टॉलची होणारी मासिक रक्कम रु.९४,३२०/- याप्रमाणे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देता येईल व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत साईभक्तांचे सोईसाठी चालविणेत येत असलेल्या

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालय इमारतीमध्ये. |
| २ | क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ३ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ४ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ६ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर. |
| ७ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ८ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर. |

या उपरोक्त व्यवसायास पूर्वीप्रमाणेच दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१०,७१८/-+१०%प्रमाणे रु.१,०७२/- अशी एकुण दरमहा प्रति स्टॉल होणारी रक्कम रु.११,७९०/- इतकी म्हणजेच एकूण ८ स्टॉलची होणारी मासिक रक्कम रु.९४,३२०/- याप्रमाणे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेच्या व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना खालील तक्त्यात नमुद अ.नं.३ व ४ म्हणजेच प्रसाद स्टोअर व दुध स्टॉलचे बाबतीत अन्न व औषध प्रशासन तसेच शॉप ॲक्ट अंतर्गत आवश्यक असणारा परवाना संस्थानकडे दोन महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर संस्थान मालकीचे साईप्रसाद इमारत व साईउद्यान इमारत परिसरातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना क्लोकरुम, प्रसाद स्टोअर, दुध स्टॉल, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व पादत्राणेगृह इत्यादी व्यवसायासाठी प्रत्येक स्टॉलकरीता मागील मासिक भाडेदरात १०% इतकी वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१०,७१८/-+१०% प्रमाणे रु.१,०७२/- अशी एकुण दरमहा प्रति स्टॉल रक्कम रु.११,७९०/- इतकी म्हणजेच एकूण ८ स्टॉलची होणारी मासिक रक्कम रु.९४,३२०/-मात्र व मीटर रिडींगप्रमाणे**

**विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली, व पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेण्यात यावा,असे ठरले.**

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालय इमारतीमध्ये. |
| २ | क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ३ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ४ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ). |
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ६ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर. |
| ७ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ परिसर. |
| ८ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर. |

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२५** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी. ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.५८७ संस्थान कायम कर्मचा-यास पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन संस्थान कायम कर्मचा-यांचा पाल्यांचा सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक शुल्क परताव्याकामी एकुण रक्कम रु.३४,४२,६६५/- (अक्षरी रुपये –चौतीस लाख बेचाळीस हजार सहाशे पासष्ट) मात्र (रुग्णालय विभागांसह) प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

तसेच संस्थानचे शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात ज्या कर्मचा-यांचे पाल्य शिक्षण घेत आहेत, त्यांचेकडून प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क न घेता, सदरची रक्कम जमा नावे करण्यात येते. श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयातील कर्मचा-यांचे पाल्यांनी शैक्षणिक शुल्क रोखीने भरलेले असल्यास त्यांनाही फी परतावा दयावा लागेल. त्यानुसार उपरोक्त दोन्ही शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांची रक्कम रु.२०,१०,५७०/-(अक्षरी रुपये-वीस लाख दहा हजार पाचशे सत्तर ) मात्र जमा नावे करण्यात आलेली आहे. म्हणजेच संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परताव्याकामी सन २०१८-१९ मध्ये मंजुर रक्कम रु.६०,००,०००/- मात्र पैकी रक्कम रु.५४,५३,२३५/- मात्र एकुण खर्च झालेला आहे.

आता सन २०१९-२० या वर्षाच्या कर्मचा-यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | २०१८-१९ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | २०१९-२० मध्ये अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | सर्व विभाग (रुग्णालये वगळता) | रु.२०,५२,२८२/- | रु.२५,००,०००/- |
| ०२. | रुग्णालये विभाग | रु.१३,९०,३८३/- | रु.२०,००,०००/- |
| | एकुण रक्कम | रु.३४,४२,६६५ /- | रु.४५,००,००० /- |
| ०३. | शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा | रु.२०,१०,५७०/- | रु.३०,००,०००/- |
| | अ.क्र.१, २ व ३ एकुण रक्कम | रु.५४,५३,२३५ /- | रु.७५,००,०००/- |

शासन मंजुरी क्रमांक सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये संस्थानचे प्रचलित पद्धतीप्रमाणे संस्थानच्या कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.७५,००,०००/- (अक्षरी रुपये- पंच्याहत्तर लाख) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्भ समितीचे मान्यतेनंतर विहित पद्धतीने कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० या वर्षाचा शैक्षणिक फी परतावा करता येईल.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात कायम कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.७५,००,०००/- (अक्षरी रुपये- पंच्याहत्तर लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२६** **सन २०२०-२१ मधील (दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग,स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी / सुविधा पुरविणे." व (२) पोट कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावीक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागात एकूण १५३६ खोल्या, साईधर्मशाळा विभागात १९२ हॉल व व्दारावती भक्तनिवास विभागात ३१६ खोल्या वापरात आहेत. या विभागांतील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स ठेकेदारामार्फत करुन घेतले जाते.

सन २०१९-२० मधील दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३ निर्णय क्र.७८३ नुसार यापुर्वी साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास निवासस्थानाकरीता कर्मचारी संख्या निश्चित करुन व त्याचा आकृतीबंध तयार करुन ई-निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्याऐवजी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता व साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबिंग इ.

मेन्टेन्स/स्वच्छता कामाचे स्वरुप निश्चित करुन सदरची कामे ठोक पध्दतीने करुन देणेबाबत ई-निविदेत नमुद करुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार कामाचे स्वरुप निश्चित करुन ई-निविदा मागविणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३,१४,१५ निर्णय क्र.८६,८७, ८८ नुसार अनुक्रमे साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छताकामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी कार्यादेश खालील कोष्टकात नमुद केलेप्रमाणेकार्यादेश देण्यात आला आहे.

| विभागाचे नाव | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८%GST सह दरमहा रक्कम रु. | GST वगळून वर्षाला रुपये | १८%GST सह वर्षाला येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ७९ | १६१ | ६९,४६,०००-/ | ८१,९६,२८०-/ | ८,३३,५२,०००-/ | ९,८३,५५,३६०-/ |
| साईधर्मशाळा | ४० | ७५ | २८,०१,०००/- | ५,०४,१८०/- | ३,३६,१२,०००/- | ३,९६,६२,१६०/- |
| व्दारावती भक्तनिवास | ०८ | ३७ | ९,९९,७३०/- | ११,७९,६८१/- | १,१९,९६,७६०/- | १,४१,५६,१७२/- |

मागणीः- उपरोक्त कोष्टकात नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.२९/०२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०२०-२१ मधील दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१ या कालावधीकरता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

सन २०२०-२१ करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ) कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने येणारा खर्च.

| विभागाचे नाव | सध्याचे ठेकेदाराचे वार्षिक दर GST वगळून | १०% वाढ गृहित धरुन अपेक्षित खर्च रु | GST वगळून एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ८,३३,५२,०००-/ | ८३,३५,२००/- | ९,१६,८७,२००/- |
| साईधर्मशाळा | ३,३६,१२,०००/- | ३३,६१,२००/- | ३,६९,७३,२००/- |
| व्दारावती भक्तनिवास | १,१९,९६,७६०/- | ११,९९,६७६/- | १,३१,९६,४३६/- |
| एकूण रक्कम रु. | १२,८९,६०,७६०/- | १,२८,९६,०७६/- | १४,१८,५६,८३६/- |

ब) कुशल व अकुशल मनुष्यबळ संख्या नमुद करुन येणारा खर्चाबाबत सविस्तर तपशील खालीलप्रमाणे

साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवासकरीता सन २०१९-२० कामाचे स्वरुपानुसार ठोक पध्दतीने ई-निविदा राबविण्यात आली होती त्यामध्ये काउंटर लिपीक व इमारत पर्यवेक्षक या पदाचे काम वगळण्यात आले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

A) साईआश्रम भक्तनिवास (काऊंटर लिपीक, इमारत पर्यवेक्षक, कार्यालय लिपीक इ.)

| अ.नं | कर्मचारी तपशील | मागणी कर्मचारी संख्या | मिळालेली कर्मचारी संख्या | अपुरी कर्मचारी संख्या | सुट्टी सोडविणेकामी कर्मचारी संख्या | एकूण मागणी कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुशल | ६१ | २४ | ३७ | ०६ | ४३ |

B) साईधर्मशाळा (काऊंटर लिपीक, इमारत पर्यवेक्षक, कार्यालय लिपीक इ.)

| अ.नं | कर्मचारी तपशील | मागणी कर्मचारी संख्या | मिळालेली कर्मचारी संख्या | अपुरी कर्मचारी संख्या | सुट्टी सोडविणेकामी कर्मचारी संख्या | एकूण मागणी कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुशल | १९ | ०४ | १५ | ०२ | १७ |

C) व्दारावती (इमारत पर्यवेक्षक)

| अ.नं | कर्मचारी तपशील | मागणी कर्मचारी संख्या | मिळालेली कर्मचारी संख्या | अपुरी कर्मचारी संख्या | सुट्टी सोडविणेकामी कर्मचारी संख्या | एकूण मागणी कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुशल | ०४ | -- | ०४ | -- | ०४ |

त्यानुसार वेळोवेळी कामगार व आस्थापना विभागाकडून कामगार मिळणेबाबत प्रशासकीय मान्यता घेऊन कामगार मिळणेबाबत विनंती केली आहे परंतू अद्यापर्यंत विभागाचे मागणीप्रमाणे कामगार मिळालेले नाही त्यामुळे त्याचा साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधेवर परिणाम होत आहे. करीता सन २०२०-२१ मध्ये कुशल व अकुशल मनुष्यबळानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावे असे तीनही विभागाचे मत आहे.

तरी सन २०२०-२१ करीता तीनही विभागाकडील ई-निविदा राबवितांना कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने न राबवता पदनिहाय कुशल अकुशल मनुष्यबळ संख्या निश्चित करुन व कर्मचारी संख्येनुसार ई-निविदा राबविण्यात यावी असे नम्र मत आहे.

१) साईआश्रम भक्तनिवास कुशल अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

विभागातील बारा इमारती, संपुर्ण परिसर, कॅन्टीन, बस सेवा व कार्यालयाचे हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) कामासाठी आवश्यक मनुष्यबळाचा तपशील.

| अ.नं | तपशील | मनुष्यबळ संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | |
| १) | हाऊसकिपींग कामासाठी | ६५ | ३०८ | ४१३ |
| २) | विद्युत/मॅकेनिकल कामासाठी | १७ | ४८ | ६५ |
| ३) | प्लंबीग कामासाठी | ०९ | १५ | २४ |
| ४) | सुतार,गंवडी, रंगकाम मेन्टनेन्स कामासाठी | १४ | २० | ३४ |
| | एकूण | १०५ | ४३० | ५३६ |

२) साईधर्मशाळा कुशल व अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | तपशील | मनुष्यबळ संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | |
| १) | हाऊसकिपींग कामासाठी | २० | १५० | १७० |
| २) | विद्युत/मॅकेनिकल कामासाठी | ०७ | ०३ | १० |
| ३) | प्लंबीग कामासाठी | ०३ | ०९ | १२ |
| ४) | सुतार,गंवडी, रंगकाम मेन्टनेन्स कामासाठी | ०६ | १० | १६ |
| एकूण | | ३६ | १७२ | २०८ |

**३)** व्दारावती भक्तनिवास कुशल व अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | तपशील | मनुष्यबळ संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | |
| १) | हाऊसकिपींग कामासाठी | ०६ | ७० | ७६ |
| एकूण | | ०६ | ७० | ७६ |

उपरोक्त प्रमाणे कुशल व अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्या निश्चित करुन नव्याने सन २०२०-२१ करीता ई-निविदा राबवितांना यापुर्वी सन २०१८-१९ यावर्षामध्ये कुशल व अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्येनुसार एम.पी.एन्टरप्रायजेस,पुणे यांना दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर कार्यादेश देण्यात आला होता. परंतू सदर ठेकेदाराचे काम समाधानकारक नसल्याने त्यांचा कार्यादेश दि.१५/१०/२०१८ रोजी रद्द करण्यात येऊन, संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या इतर ठेकेदारांकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून कामे करुन घ्यावे असे ठरले होते त्यानुसार बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.१५/१०/२०१८ ते नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो देण्यात आलेल्या कार्यादेशाचा आधार घेऊन साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता खालील तक्त्यात नमुद प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| विभागाचे नाव | बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर **GST** वगळून प्रति महा दर रु. | **GST** वगळून वार्षिक दर रु. | १०% वाढ गृहित धरुन अपेक्षित खर्च रु | **GST** वगळून एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ८०,९३,०६८ | ९,७१,१६,८१६ | ९७,११,६८२ | १०,६८,२८,४९८ |
| साईधर्मशाळा | ३४,७१,१७० | ४,१६,५४,०४० | ४१,६५,४०४ | ४,५८,१९,४४४ |
| व्दारावती भक्तनिवास | ११,५३,२२७ | १,३८,३८,७२४ | १३,८३,८७२ | १,५२,२२,५९६ |
| एकूण रक्कम रु. | १,२७,१७,४६५ | १५,२६,०९,५८० | १,५२,६०,९५८ | १६,७८,७०,५३८ |

विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय –

अ) <u>कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने येणारा खर्च.</u>

१) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये. ९,१६,८७,२००/- (अक्षरी रु.नऊ कोटी सोळा लाख सत्याऐंशी हजार चारशे) मात्र खर्चास,

२) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.३,६९,७३,२००/- (अक्षरी रु.तीन कोटी एकोणसत्तर लाख त्र्याहत्तर हजार दोनशे) मात्र खर्चास,

३) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.१,३१,९६,४३६/- (अक्षरी रु.एक कोटी एकतीस लाख शहान्नव हजार चारशे छत्तीस) मात्र खर्चास,

उपरोक्त अ.नं ०१,०२ व ०३ नुसार तीनही विभागाकडील हाऊसकिपींग कामाकरीता दैनिक वर्तपत्रात एकत्रित ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ठेकेदाराकडून तीनही विभागाकरीता स्वतंत्र ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या <u>**GST** वगळून अंदाजे एकूण रक्कम रु.१४,१८,५६,८३६/- (अक्षरी रु.चौदा कोटी आठरा लाख छपन्न हजार आठशे छत्तीस)</u> मात्रचे खर्चास,

**ब**) कुशल व अकुशल मनुष्यबळ संख्या नमुद करुन येणारा खर्च.

१) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने राबविणे ऐवजी कुशल व अकुशल कर्मचारी मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.१०,६८,२८,४९८/- (अक्षरी रु.दहा कोटी अडुसष्ट लाख अठ्ठाविस हजार चारशे अठ्ठयान्नव) मात्र खर्चास**,**

२) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने राबविणे ऐवजी कुशल व अकुशल मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.४,५८,१९,४४४/- (अक्षरी रु.चार कोटी अठ्ठावन्न लाख एकोणावीस हजार चारशे चौरेचाळीस) मात्र खर्चास**,**

३) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने राबविणे ऐवजी कुशल व अकुशल मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.१,५२,२२,५९६/- (अक्षरी रु.एक कोटी बावन्न लाख बावीस हजार पाचशे शहान्नव) मात्र खर्चास**,**

उपरोक्त अ.नं ०१,०२ व ०३ नुसार तीनही विभागाकडील हाऊसकिपींग कामाकरीता दैनिक वर्तपत्रात एकत्रित ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ठेकेदाराकडून तीनही विभागाकरीता स्वतंत्र कुशल व अकुशल मनुष्यबळ संख्या पुरविणेकामी ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अंदाजे एकूण रक्कम रु.१६,७८,७०,५३८/- (अक्षरी रु.सोळा कोटी अठ्ठयाहत्तर लाख सत्तर हजार पाचशे अडोतीस) मात्रचे खर्चास**,**

उपरोक्त अ किंवा ब बाबींस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ मधील (दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग,स्वच्छता कामे ठोक पध्दतीने अथवा मनुष्यबळ संख्या निश्चीत करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेत यावीत याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.२७** **संस्थान परिसरात साईभक्तांना “श्रीं” चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता अद्यावत Sepcification चे ५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी Consultant ची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ मधील (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –

१) दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०९, निर्णय क्र.४२३.

२) दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२,निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३).

३) दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२३, निर्णय क्र.६१.

प्रस्तावना– संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३) अन्वये “संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, Size 4.80m x 2.88m ०५ नग LED Wall Screen ई-निवीदा

प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७ कोटी ९० लाख + GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदरचे LED Wall Screen बसविणेकामी प्रथम स्थानिक उपसमितीमध्ये जागेची निश्चिती करणेत यावी. तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संस्थानचे सर्व निवासस्थाने,श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय, देणगी कार्यालय इ.ठिकाणी LED ची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च २५ ते ३० लाख असुन प्रथमतः १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पद्धतीने खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली"

तसेच दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.६१ अन्वये सदरचे ०५ नग LED Wall Scree खरेदी करणेकामी पुनःश्च चर्चा होवुन, "दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३) नुसार ०५ नग LED Wall Screen ई-निवीदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली "

सदरहु मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, एकुण ०५ नग LED Wall Screen खरेदी करणेकरीता विहीत पद्धतीने ई-निवीदा मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नासिक, पुणे, औरंगाबाद, मुंबई या ०५ ठिकाणी मराठी वर्तमानपत्रात व नागपुर, दिल्ली या ०२ ठिकाणी इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेस तसेच महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निवीदा मसुदा व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर वेळापत्रकानुसार जाहिरात प्रसिद्ध करणेच्या मान्यतेस्तव दि.२१/०६/२०१९ रोजीचे टिपणीन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर टिपणीवर " पुनःश्च अद्यावत प्रस्ताव सादर करा " असे निर्देशित करण्यात आले आहे.

तथापी, दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.०९ अन्वये ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी येणारे अंदाजे खर्चाचा प्रस्ताव Specifications सह सादर करण्यात आलेला असुन त्यानुसार सदर प्रस्तावास दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३) अन्वये मान्यता देखील देण्यात आलेली असल्याने सदर LED Wall Screen चे Specifications मध्ये बदल करणे उचित होणार नसल्याने दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नासिक, पुणे, औरंगाबाद, मुंबई या ०५ ठिकाणी मराठी वर्तमानपत्रात व नागपुर, दिल्ली या ०२ ठिकाणी इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेस तसेच महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सोबतचा निवीदा मसुदा व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर सोबतचे वेळापत्रकानुसार जाहिरात प्रसिद्ध करणेच्या मान्यतेस्तव उपरोक्त दि.०१/११/२०१९ अन्वये टिपणी सादर करण्यात आली होती.

सदर टिपणीवर वरिष्ठांचे " १) CEO सो यांचे निर्देशाप्रमाणे अदययावत Specification व गुणवत्तेबाबतचे LED घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा. २) सदर प्रकरणी Consultant नेमणुक कार्यवाही करणे उचित राहील असे मत आहे." तसेच " व्यवस्थापन समिती समोर ठेवा " असे निर्देश प्राप्त झालेले आहे.
तरी, दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दि.०१/११/२०१९ रोजीचे टिपणीवरील निर्देशास अनुसरुन, अदययावत Specification व गुणवत्तेबाबतचे ०५ नग Outdoor LED Wall Screen घेणेकामी सदर क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची नेमणुक करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/- + Tax मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दि.०१/११/२०१९ रोजीचे टिपणीवरील निर्देशास अनुसरुन, अदययावत Specification व गुणवत्तेबाबतचे ०५ नग Outdoor LED Wall Screen घेणेकामी सदर क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची नेमणुक करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/- + Tax मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

विभागाचा प्रस्ताव- उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दि.०१/११/२०१९ रोजीचे टिपणीवरील निर्देशास अनुसरुन, अदययावत Specification व गुणवत्तेबाबतचे ०५ नग Outdoor LED Wall Screen घेणेकामी सदर क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची नेमणुक करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/-+Tax मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen बसविणेकामी गुंतवणूक, वापर व उपयुक्तता याबाबींचा तुलनात्मक अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, तसेच सदर वस्तु इलेक्ट्रॉनिक असल्याने पाच वर्षानंतर त्याची घसारा किंमत शुन्य होईल, त्यामुळे असे LED Wall Screen भाडोत्री घेतल्यास किती खर्च येईल याचाही सविस्तर उल्लेख प्रस्तावामध्ये करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२८** **सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदातील व दरपत्रकांमधील उच्चत्तम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८ नुसार सन-२०१९-२० या वर्षात संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विहीत पध्दतीने विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ऑनलाईन व्यापा-यांकडून भंगार साहित्य विक्रीकामी ई-निविदा मागविणेत आलेल्या होत्या. दि.२३/०७/२०१९ रोजी झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्तातील शिफारशी मान्य करण्यात येऊन ई-निविदेतील उच्चतम दरधारकांचे दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ई-निविदेत महाकाली इंडस्ट्रीज, जळगाव यांनी निरुपयोगी चांगल्या गोण्या (कलतान) ५० किलो भरतीचे दर रु. ५३.१०, निरुपयोगी खराब गोण्या (कलतान) ५० किलो भरतीचे दर रु. ४१.३०, अकबर सांडेखॉ पठाण, कोपरगाव यांनी जळालेले इले.बल्ब, टयुबबार, इ. साठी दर रु. ५०/-, शफीक सय्यद, कोपरगाव यांनी संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज साठी दर रु.२०००/- हे दर नजरचुकीने दिलेले असल्याचे लेखी पत्र दिलेले असल्याने, सदरच्या साहित्यासांठी दरपत्रके मागविण्यात येऊन दरपत्रकातील दर व ई-निविदेतील क्रं २ चे दर यांचे दराबाबतचा प्रस्ताव स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेत यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. त्याप्रमाणे सदर साहित्यासाठी दरपत्रके मागविण्यात आले होते. दि. २०/०८/२०१९ रोजी सदरचे दरपत्रके अध्यक्ष/सदस्य मा. खरेदी समिती यांचे समोर उघडण्यात आले, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| ०१ | विक्री करावयाचे साहित्य/वस्तूचा तपशिल | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | - |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | मागिल वर्षाच्या व्यापा-यांना दुरध्वनीवरुन |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले | -- |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | - |
| ०७ | प्राप्त दरपत्रक धारकांची संख्या | ०५ |
| ०८ | पात्र दरपत्रक धारकांची संख्या | ०५ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का | होय . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का | - |
| **१२** | **निविदाकारांनी सादर केलेले दर-** | |

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | akbar sandekha | Maha kali Indust | Shafik Shaikh | New india scrap | Vivektin Supp | Tulsi das Velji | Jalaram Tradi |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | pathan | ries | | center | ly | & Co | ng Com pany |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | 39.00 | **53.10** | 0.00 | 7.50 | 0.00 | 15.52 | 15.51 |
| 2 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | 37.00 | **41.30** | 0.00 | 5.50 | 0.00 | 10.32 | 10.20 |
| 3 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 1 | प्रति किलो | **50.00** | 0.00 | 0.00 | 1.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 4 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 150.00 | 0.00 | **2000.00** | 75.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |

१३ यापूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल आणि खरेदी दर-

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती नग रू. |
|---|---|---|---|
| अ.नं.२२ मध्ये नमूद केलेप्रमाणे. | | | |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | -- | ---- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे उच्चतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| १९ | सध्याचे उच्चतम निविदाकाराचे नांव | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नांवे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.मुख्य लेखाधिकारी,<br>मा.प्रशासकीय अधिकारी,<br>प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष विभाग |

२२ **दि. २०/०८/२०१९ रोजी ०५ व्यापा-यांकडुन मागविण्यात आलेले दरपत्रके अध्यक्ष/सदस्य मा. खरेदी समिती यांचे समक्ष उघडण्यात आलेले असुन दरपत्रकातील दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.**

| Sl. No | Description of Work / Item(s) | Qty | Units | akbar sandekha pathan | Tulsidas Velji And Co | Shafik Shaikh | New india scrap center | Jalaram Trading Company |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | **15.85** | 14.52 | 00 | 10.50 | 13.52 |
| 2 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | **11.20** | 08.76 | 00 | 06.25 | 07.51 |
| 3 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 1 | प्रति किलो | **0.70** | 00 | 0.65 | 0.40 | 00 |
| 4 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | **221** | 00 | 201 | 86.50 | 00 |

विक्री करावयाच्या साहित्यांचा मागील दर, ई-निविदेतील दर व दरपत्रकातील दरांचा तुलनात्मक तक्ता.

| अ. नं. | तपशिल | मागील वर्षीचे खरेदी दर | ई-निविदेतील प्राप्त दर | कोटेशन मधील प्राप्त दर | ई-निविदेतील क्रमांक दोनचे प्राप्त दर | ई-निविदेतील क्रमांक तीनचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 15.12 | 53.10 | **15.85** | 39.00 | **15.52** |
| २ | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 10.13 | 41.30 | **11.20** | 37.00 | **10.32** |
| ३ | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 2.10 | 50.00 | 0.70 | **1.00** | **-** |
| ४ | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 105.00 | 2,000.00 | **221.00** | 150.00 | **75.50** |

२३ सदर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे खर्च रू. – निरंक

ब) दि.२३/०७/२०१९ रोजी झालेल्या स्थानिक उपसमिती सभेत नजरचुकीने सादर केलेल्या साहित्यांचे दरपत्रकांतील दर व ई-निविदेतील क्रमांक दोनचे दरांबाबतचा प्रस्ताव मा. उपसमिती समोर सादर करावे अशी शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन दरपत्रके मागविण्यात आलेली आहे, परंतु ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०७ निविदाधारकांपैकी अकबर पठाण, कोपरगाव यांनी निरुपयोगी गोण्या (कलतान) चांगले व खराब यासाठी क्रमांक दोनचे दर अनुक्रमे दर रु.३९/- व रु. ३७/- असे भरलेले आहे, परंतु सदरचे दर नजरचुकीने दिलेले असल्याने या दरात माल उचलण्यास असमर्थ असल्याचे लेखी कळविलेले आहे.

तरी उपरोक्त ‘अ’ आणि ‘ब’ मध्ये दर्शविलेले उच्चत्तम दराबाबत निर्णय होऊन उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यतेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ (AD-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील ज्या निरूपयोगी भंगार साहित्यासाठी निविदाधारकांनी नजरचुकीने दर दिलेले होते, त्या साहित्यासाठी फेर दरपत्रके मागविण्यात आलेली असुन त्यामधील अकबरखॉ साडेखॉं पठाण यांचे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्या उच्चत्तम दराने सदर निरूपयोगी भंगार साहित्याची उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली विहीत पध्दतीने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.२९** **सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणाऱ्या निरुपयोगी भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र अधिनियम २००४ तरतूद- महाराष्ट्र अधिनियमातील कलम १४(२) (ग) व कलम १७ (४) ला अधिन राहून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

प्रस्ताविकः- साईबाबा संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाच्या भंगार तसेच साहित्याची सन-२०१९-२० या आर्थिक वर्षात ई-निविदा पध्दतीने तसेच वर्तमान पत्रात जाहीरात देवून व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार दर मागविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या मंजुर उच्चतम दराने जमा झालेल्या निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेत आलेली आहे. आजपावेतो (माहे- नोव्हेंबर-२०१९ अखेर) अशा प्रकारच्या भंगार साहित्याचे विक्रीतून एकूण-२०,७८,११२/- (अक्षरी- विस लाख अठयाहत्तर हजार एकशे बारा रूपये मात्र ) संस्थान फंडात जमा करणेत आलेले आहे.

दरवर्षीचे प्रचलित पध्दतीनुसार महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १४(२) (ग) व कलम १७(४) ला अधिन राहून रू.५०,००० चे आतील दैनंदीन वापराने जमा होणारे निरूपयोगी डेडस्टॉक तसेच सादील स्वरूपाचे भंगार साहित्य जसे दुध पिशवी, प्लॉस्टिक भंगार, लोखंडी भंगार , रिकामा खोक्याचा पुठ्ठा, रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, नारळाच्या शेंडया, काळे ऑईल, रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान गोण्या वगैरे साहित्य विक्रीचे तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७६ नुसार अशाप्रकारच्या

दैनंदिन वापराने तयार होणा-या निरूपयोगी भंगार / डेडस्टॉक साहीत्याची विक्री करण्याचे अधिकार समितीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

सन २०१९-२० या वर्षात नेमून दिलेल्या व्यापा-यांना भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०२० रोजी पुर्ण होत आहे. करिता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणारे भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा मागविता येईल.

मागणी- उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केलेनुसार सन-२०२०-२१ या आर्थिक वर्षातील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा प्रक्रीयेसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) निरूपयोगी भंगार/सादिल/ तसेच डेडस्टॉक साहित्याचे विक्रीबाबतच्या अटी व शर्तीचा मसुदा तयार करणे.

२) आयटी विभागामार्फत www.sai.org.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणे, ईडीपी विभागामार्फत www.mahatenders.gov.in या शासकीय संकेतस्थळावर Online ई-निविदा मागविणे/अपलोड करणे, तसेच जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक, या ठिकाणच्या मराठी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे.

३) निरूपयोगी भंगार/सादिल स्वरूपाचे साहित्य तपशिलाचे दरपत्रक तयार करणे.

४) नवीन शासन प्रणालीप्रमाणे संस्थानकडील निरूपयोगी / भंगार साहित्य विक्रीसाठी सोबतचे यादीतील साहित्यास GST आकारणीसंदर्भात लेखाशाखा विभागाचे मार्गदर्शन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे..

उपरोक्त अ.नं.०१ ते ०४ प्रमाणे कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

विभागाचा अभिप्रायः- सन-२०१९-२० या आर्थिक वर्षामधील भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०२० रोजी पुर्ण होत असल्याने नाशवंत/भंगार साहित्य साठवू नये, त्याचे साठवणूकीतून साईभक्तांचे तसेच सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचू नये, करिता अशाप्रकारचे साहित्य वेळीच विक्री/विल्हेवाट करणेसाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक, या ठिकाणच्या मराठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस तसेच Online ई-निविदा मागविणेस, ई-निविदा प्राप्त झोलेनंतर त्या खरेदी समितीपुढे उघडणेस, उच्चतम दर पात्र निविदा धारकास कार्यादेश देणेस मान्यता असावी.

तरी उपरोकृत प्रस्तवावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणाऱ्या निरुपयोगी भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अनुशंगीक खर्चास तसेच ई-निविदेमध्ये प्राप्त होणाऱ्या उच्चत्तम दराने संस्थानकडील निरूपयोगी भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्याची उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली विहीत पध्दतीने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.३०** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांना लागणारे कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | **सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत- २०१९-२०** |
| २ | मागणी | सुरक्षा अकुशल- ७४६ व सुरक्षा कुशल- ६७, एकूण- ८१३ |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१२.०९.२०१९ ते दि.२६.०९.२०१९ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१२.०९.२०१९ रोजी सकाळी- ११.०० वा. |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | **०५ ( पाच )** |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | **०३ ( तीन )** |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १. | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. मुंबई | २.९९% | **L - 2** |
| २. | **मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे** | १.००% | **L - 1** |
| ३. | **मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली** | १.००% | **L - 1** |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर - | |

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | (सेवा कर दर) |
|---|---|---|---|
| १ | सन २०१८ – १९ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००००१ % |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - | |

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी | २०१८ - १९ | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००००१ % |
| १७ | मागील पुरवठादार | १)मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. मुंबई |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | **१.००%** |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | **१)मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे**<br>**२)मे.ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. प्रति सेट मार्केट रेट रु. | |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | | | | |
| | **रु.०.०००००००००१%** | **रु.१.००%** | -- | -- |

संक्षिप्त टीप– मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०२.२०१९, निर्णय क्र.११० अन्वये सन २०१९-२० कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी व निविदा मागविणेस व तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०५ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.०५.११.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१८.१२.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक निविदेचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.नं. | कामाचा तपशिल | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर % | मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे यांचे दर % | मे.ईगल हंटर सोल्युशन लि. पुणे यांचे दर % |
|---|---|---|---|---|
| १) | Service Charges ( in Percentage) for Supply of Security Guards (Ladies/Gents), Security Guards (Ex Servicemen), Security Supervisors, Security Gun men's, Security Officers, Gym Triner, Employees as mentioned on page no 10 of tender document (Excluding PF,GST, Group Insurance, Ex-gratia etc.) | २.९९ | १.०० | १.०० |

यामध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली या दोघांचे दर रु.१.००% हा L-1 असल्याने मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांना सदरचा कार्यादेश विभागुन देता येईल.

तरी, कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत निविदेतील (L-1) मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांना समान विभागुन कार्यादेश देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली या दोघांचे दर समान असल्याने या दोघांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३१** **"साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे युपीएस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारकांबरोबर चर्चा होऊन याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे 60 KVA क्षमतेचे ०२ नग युपीएस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | 60 KVA क्षमतेचे ०२ नग युपीएस. |
| ०२ | मागणी | Sr. No: 01; Description: 60 KVA UPS; Qty: 02 |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.१९.०९.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व ई-मेलद्वारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | १५ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले. |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.१९.०९.२०१९ सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.०५.११.२०१९<br>व्यावसायीक निविदा- दि.१८.१२.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |

| | | |
|---|---|---|
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| अ. नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर (प्रती नग रु.) | स्थिती |
|---|---|---|---|
| **60 KVA UPS** | | **02 Nos Qty** | |
| 01 | M/s Pace Business Machines Pvt. Ltd, Thane | 9,96,400 | L5 |
| **02** | **M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik** | **8,19,993** | **L1** |
| 03 | M/s Hi-tech Computer Services Pvt Ltd, Nashik | 9,32,436 | L4 |
| 04 | M/s S V Electronics, Nashik | 8,20,100 | L2 |
| 05 | M/s Microtronics, Aurangabad | 9,31,700 | L3 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| Sr.No | Year-2017-2018 | UOM | Amount | |
|---|---|---|---|---|
| | | | 2017-2018 | 2018-2019 |
| 01 | 60 KVA UPS | Nos | -- | -- |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.नं. | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| 01 | 60 KVA UPS | -- | -- |
| एकूण रक्कम | | | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं. १३ प्रमाणे |

१७ मागील पुरवठादार

| अ.नं. | वस्तूचे वर्णन | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|
| 01 | 60 KVA UPS | निरंक |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | 60 KVA UPS | 8,19,993 |

१९ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr. No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 60 KVA UPS |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प (प्रस्ताव) खरेदी समितीसमोर सादर करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग. |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |

२३ मागील खरेदी रु.-------------- सध्याचे प्राप्त दर रु.---------------------- फरक रु.----------- % ने कमी/जास्त रु.-----------------

| अ.नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 60 KVA UPS | -- | 8,19,993 | -- | -- |

२४. संक्षिप्त टिप :- "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे 60 KVA क्षमतेचे ०२ नग युपीएस खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये ८,१९,९९३/- (सर्व करांसहीत) एकूण रक्कम रुपये १६,३९,९८६/- मात्र हे निम्नत्तम आहेत. सबब, M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत चर्चा होऊन संबंधीतांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३१** **"साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे युपीएस खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik यांचे प्रतिनिधी समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरांबाबत तसेच दुरुस्ती/देखभाल यांचे सेवेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली तथापी सदर युपीएस ची दोन वर्ष दुरुस्ती व देखभाल करण्यास व याकालावधीत युपीएस अथवा इतर अनुषंगीक साहित्य उदा.बॅटरी इत्यादी बदलुन देण्याचे त्यांनी मान्य केले, व तसे पत्रही दिले, त्यामुळे यावर सविस्तर चर्चा होऊन, "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे युपीएस खरेदी करणेकामी निम्नतम निविदाधारक M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik यांचे सर्व करांसहीत निम्नतम दर रक्कम रु.८,१९,९९३/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट सन-२०२० साठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत. श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट सन २०२०-२१ या वर्षासाठी देणेबाबत ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मागील सर्व्हिस कॉन्ट्रक्टर मे.ट्रिनीटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस्, औरंगाबाद यांना मागील दराप्रमाणे मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- (अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर, ०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३).श्री साईबाबा हॉस्पीटल+साईनगर, ०४).व्दारावती भक्तनिवास+श्री साईनाथ हॉस्पिटल, ०५).श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम भक्तनिवास ए.सी. या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून २४ तास ते ४८ तास देखील वीजपुरवठा बंद ठेवला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे व गर्दीत, अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी २३ नग जनसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरच्या इंजिनची काही ठरावीक कालावधीत इंजिन ऑईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनसेट कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते.हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते. जनसेटचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ हॉस्पिटल | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०८) | व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ हॉस्पिटल | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १४) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १६) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १७) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए ८.३-६४ | ०१ नग. |
| १८) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | ०१ नग. |
| १९) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | ०१ नग. |
| २०) | इर्मजन्सी(थ्री फेज)(स्पेअर) | १०केव्हीए | SC21300645 | X13G2 | ०१ नग. |
| २१) | शांतिनिकेतन | १५ केव्हीए | D21022-0300022 | DM 20 | ०१ नग. |
| २२) | बसस्थानक भक्तनिवास | ६२.५ केव्हीए | ७२०३११८४ | ४ बीटीटीई ३.३ जी ११ | ०१ नग. |
| २३) | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ५० केव्हीए | ७२०३७५२१ | ४ बीटीटीई ३.३ जी १ | ०१ नग. |

मागील वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता देणेकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.in या वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा बोलविण्यात येऊन प्राप्त ई-निविदांमधील निम्नतम दर दिलेले निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेशी दि.२२-०१-२०१९ रोजी मा.स्थानिक उपसमितीचे सभेत दराबाबत चर्चा झाल्यानंतर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी रक्कम रु. ४०,५०,०००/- मात्र दर देऊ केले. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-०१-२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय ७४ (०४) अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी निम्नतम निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी चर्चेअंती देऊ केलेली रक्कम रु. ४०,५०,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता. व त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी जा.नं.एसएसएसटी/विद्युत/५४८३/२०१९ दिनांक १३-०२-२०१९ अन्वये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना रक्कम रु.४०,५०,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता कंपनी मान्यताप्राप्त एकमेव अधिकृत सर्व्हीस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-०१-२०२० रोजी संपत आहे.

उपरोक्त सर्व २३ नग जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे सन-२०२०-२०२१ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

याबाबत दिनांक ०४.१२.२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) कमिटीचे सभेपुढे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दि.०४-१२-२०१९ चे सभेतील विषय नं.४१ निर्णय क्र.५२० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनची तपशीलवार माहिती (उदा.खरेदी दिनांक, खरेदी किंमत इ.सह) तसेच दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता दिलेल्या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी केलेल्या देखभालीचे स्वरुप ( उदा.कोणकोणते स्पेअरपार्टस् खराब झाले, बदलावे लागले. किती वेळा **AMC** ला **Call** लॉग केले इ.) याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तक्त्याच्या स्वरुपात तदर्थ (**Ad-hoc**) कमिटीसमोर सादर करावा, असे ठरले.

त्यानुसार वरील बाबींचा समावेश करुन दि.०९-१२-२०१९ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर दि.१०-१२-२०१९ रोजी मा.ॲडहॉक कमिटीचे सदस्य यांचेशी अहमदनगर येथे चर्चा झाली असता सदर प्रस्तावामध्ये वरील नमूद चार बाबीं व्यतिरिक्त जनसेट खरेदीची किंमत, आतापर्यंत सर्व्हिसिंगसाठी लागलेला खर्च याबाबींचा तक्ता तयार करण्यात यावा. तसेच पुढील वर्षाचे टेंडर हे कॉम्प्रेसिव्ह पध्दतीचे न करता साधे एएमसी (AMC) पध्दतीचे टेंडर काढावे व त्या टेंडर मध्ये फक्त सर्व्हिसिंगसाठी लागणा-या स्पेअर्सचाच समावेश करण्यात यावा व ज्या स्पेअर्सची गरज वर्षातून एकदाच किंवा काही बिघाड झाल्यानंतरच पडते, त्या स्पेअर्सचा समावेश पुढील वर्षाच्या टेंडरमध्ये करण्यात येऊ नये, व ज्यावेळेस दुरुस्तीच्या वेळी असे स्पेअर्स वापरले जातील, त्याचवेळेस फक्त त्यांची किंमत ही टेंडर रक्कमेव्यतिरिक्त आदा करण्यात यावी व यापध्दतीने फक्त सर्व्हिसिंगचेच पुढील वर्षाचे टेंडर काढण्यात यावे.

तसेच टेंडरची किंमत ही फक्त सर्व्हीसिंगसाठी लागणा-या स्पेअर्स नुसार ठेवण्यात यावी. त्यानुसार वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची किंमत कमी होऊन ती आता रु. ३८,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.अडोतीस लाख पन्नास हजार मात्र) इतकी अपेक्षित धरण्यात आलेली आहे. याबाबत नव्याने प्रस्ताव सादर करणेकामी मा.ॲडहॉक कमिटीचे सदस्य यांनी निर्देश दिलेले आहे. त्यानुसार टेंडरमध्ये फक्त सर्व्हिसिंगसाठी लागणा-या स्पेअर्सचा तक्ता व या वर्षीच्या सर्व्हिसिंगचा तक्ता सोबत जोडला आहे.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या उपरोक्तप्रमाणे नमूद वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०२०-२०२१ या वर्षासाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.ॲडहॉक समितीचे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या यापूर्वीच्या प्रस्तावावर दिनांक ०४-१२-२०१९ रोजी झालेल्या मा. ॲडहॉक कमिटीच्या सभेत यावर चर्चा होऊन या प्रस्तावावर झालेल्या निर्णयानुसार तसेच सदर प्रस्तावावर दि.१०-१२-२०१९ रोजी मा.ॲडहॉक कमिटीचे सदस्य यांचेशी अहमदनगर येथे चर्चा केल्यानुसार सदर नविन प्रस्ताव सादर करीत आहोत. आता पुढील कालावधी होणा-या मा.ॲडहॉक कमिटीच्या सभेपुढे हा विषय मान्यतेसाठी सादर होऊन त्यास मान्यता मिळून त्यानंतर पुन्हा पुढील मान्यतेसाठी हा विषय मा.उच्च न्यायालयासमोर मान्यतेसाठी सादर होणार आहे. व त्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील ई- निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे. व त्यानंतर ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर त्या निविदा उघडून पुढील सर्व प्रक्रीया पुर्ण होऊन त्यातील न्युनतम दरधारकास कार्यादेश द्यावा लागणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेस १ ते २ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. सध्याच्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत दि.३१-०१-२०२० रोजी संपत आहे.

शिर्डी परीसरात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून २४ तास ते ४८ तास देखील वीजपुरवठा बंद ठेवला जातो. अशा काळात संस्थानचे संपूर्ण परीसरातील, रुग्णालयातील, भक्तनिवासस्थानांमधील गर्दीत, अंधारात काही अनुचीत घटना घडू नये व दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे व म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे.

मागणी:- (अ) उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या उपरोक्तप्रमाणे नमूद वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०२०-२०२१ या वर्षासाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.ऍडहॉक कमिटीचे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या यापूर्वीच्या प्रस्तावावर दिनांक ०४-१२-२०१९ रोजी झालेल्या मा. ऍडहॉक कमिटीच्या सभेत यावर चर्चा होऊन या प्रस्तावावर झालेल्या निर्णयानुसार तसेच सदर प्रस्तावावर दि.१०-१२-२०१९ रोजी मा.ऍडहॉक कमिटीचे सदस्य यांचेशी अहमदनगर येथे चर्चा केल्यानुसार सदर नविन प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी अंदाजे रक्कम रु.३८,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अडोतीस लाख पन्नास हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच जादा खपाच्या मुंबई येथील इंग्रजीतील एका वर्तमानपत्रात, पुणे येथील मराठीतील एका वर्तमानपत्रात तसेच स्थानिक मराठीतील एका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी मा.ऍडहॉक कमिटीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस

तसेच

(ब). आता मा.ऍडहॉक कमिटीच्या सभेपुढे हा विषय मान्यतेसाठी सादर होऊन त्यास मान्यता मिळून त्यानंतर पुन्हा पुढील मान्यतेसाठी हा विषय मा. उच्च न्यायालयासमोर मान्यतेसाठी सादर होणार आहे. व त्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे. व त्यानंतर ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर त्यानिविदा उघडून पुढील सर्व प्रक्रीया पुर्ण होऊन त्यातील न्युनतम दरधारकास कार्यादेश द्यावा लागणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेस १ ते २ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. तोपर्यंत सन २०२०-२०२१ या वर्षासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून आलेल्या ई-निविदेमधील पात्र व न्युनतम दर देणा-या सर्व्हिस डिलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मंजुर होऊन संबंधित न्युनतम दरधारकास कार्यादेश देईपर्यंतच्या दिवसापर्यंत उपरोक्त जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणेसाठी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून संस्थानच्या २३ जनसेटचे सर्व्हिसिंग करून घेणेसाठी प्रतिमाह मागील टेंडरच्या मंजुर दराने येणा-या रक्कम रुपये ३,३७,५००/-(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख सदोतीस हजार पाचशे) मात्र प्रमाणे दि.०१-०२-२०२० पासून नविन सन-२०२०-२०२१ चा वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कार्यादेश देई पर्यंतच्या कालावधीसाठी येणा-या खर्चास व या कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट सन-२०२० साठी देणेकामी सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनची तपशीलवार माहिती तसेच दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता दिलेल्या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी केलेल्या देखभालीचे स्वरुप याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करावा, असे ठरले, तसेच याकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो याकामाचे सध्याचे ठेकेदार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना मागील टेंडरच्या मंजुर दराने व अटी-शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.३३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,६२,६१५/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक–खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | सचिन राजेंद्र क्षिरसागर विभाग-वाहन हुददा-मॅकनिक मोटार | मुलगा स्वतः | Blood Pressure Diabtes रक्तदाब व मधुमेह | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २२२०.०० | २२२०.०० |
| २. | रुकसाना साजिद खान विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- परीचारीका | स्वतः | Heart Disease | डॉ.गगन शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७३०१.०० | ७३०१.०० |
| ३. | राजेश रमणलाल वाकडे विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल. हुददा-बायोमेडीकल इंजिनिअर | स्वतः | Ulcerative Colities आतड्याच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५०६०३.०० | ५०६०३.०० |
| ४. | शिंदे भाऊसाहेब बाबुराव विभाग -ज्यु.कॉलेज हुद्दा -ग्रंथपाल | वडिल | Blood Pressure Diabtes रक्तदाब व मधुमेह | डॉ. जाधवर | श्रीसाईबाबा हॉस्पिटल | २२३२६.०० | २२३२६.०० |
| ५. | संगिता संजय थोरात विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परीचारीका | पती सासू मुलगी | Diabetes | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२४५८.०० | ८६७०.०० |
| | **अ एकुण रक्कम रु.** | | | | | ९४९०८.०० | ९११२०.०० |
| | **ब.संस्थान रुग्णालयातउपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ६. | सोपान नरहरी पांगारकर विभाग- श्री साईबाबा हॉस्पि. हुददा-ओ.टी.ॲस्स्टि | स्वतः | Caकर्करोग | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरिअल हॉस्पि.मुंबई | ६७१३२.०० | ६३७३२.०० |
| ७. | श्री.परसराम सोमाजी भालेराव विभाग-सरंक्षण हुद्दा –पहारेकरी | पत्नी | Denguencep hatis | Dengue | डॉ.काटे | १५५०१.०० | १५५०१.०० |
| ८. | स्वाती इंद्रभान कडू विभाग- ज्युनियर कॉलेज हुद्दा- शिक्षिका | स्वतः | Caकर्करोग | डॉ.बो-हाडे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४४९००.०० | ३९६४०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | छाया पोपट शेलार<br>विभाग –रुग्णालय<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Caकर्करोग | डॉ. राम नाईक | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | १४१६३.०० | १४१६३.०० |
| १०. | बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग -ध्वनीक्षेपण<br>हुद्दा -विद्युत पर्यवेक्षक | मुला करीता | Renal Transplant | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ५८६५१.०० | ५८६५१.०० |
| ११. | नारायण महादेव जरांगे<br>विभाग-मॅकेनिकल<br>हुददा-वेल्डर | पत्नी | R.F.A. | शर्मा सर | के.ई.एम हॉस्पि.मुंबई | ७१२००.०० | ७१२००.०० |
| | **ब एकुण रक्कम रु.** | | | | | २७१५४७.०० | २६२८८७.०० |
| | **क.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर न केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| १२. | वाल्मीक बाबुराव धरम<br>विभाग- सी.सी.टिव्ही<br>हुददा-मदतनीस | मुलगा | High Temp. | डॉ.शिंदे | शिंदे हॉस्पिटल,राहाता | १२२८०.०० | ८६०८.०० |
| | **क एकुण रक्कम रु.** | | | | | १२२८०.०० | ८६०८.०० |
| | **अ +ब क एकुण रक्कम रु.** | | | | | ३७८७३५.०० | ३६२६१५.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३,६२,६१५/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.तसेच काही निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त १२ कर्मचारी/कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,६२,६१५ -/-मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावातील १२ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.३,६२,६१५/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३४ मेडिकल वैद्यकीय बिल मिळणेबाबत श्रीमती अरुणा तुळशीराम गमे (सोनवणे) यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भीय अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे त्यात वरील विषयास अनुसरुन विनंतीपुर्वक अर्ज करते की, मी आपल्या श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये कंत्राटी पदधतीने ठेकेदारामार्फत कुशल कर्मचारी म्हणुन कार्यरत असुन माझे पती विजय प्रभाकर सोनवणे हे दिनांक- ११/०९/२०१९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते परंतु त्यांचे प्रकृतीत कोणत्याही प्रकारची सुधारणा न झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी के.ई.एम. हॉस्पिटल पुणे येथे दिनांक -१४/०९/२०१९ रोजी ॲडमिट केले. दि.२५/०९/२०१९ रोजी त्यांचे निधन झाले असुन मला मेडिकल खर्च मोठया प्रमाणात (रु.५,५७,७१३) आलेला असुन माझेवर दुखत प्रसंग ओढवला गेला असुन माझ्या मागे दोन मुले असुन मुलगा इयत्ता बारावीत व मुलगी दहावीत आहे हया सर्वाची जबाबदारी माझ्यावर आली आहेत तरी माझ्या अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन मला मेडिकल खर्च मिळावा हि विनंती केलेली आहे.

वस्तुस्थिती-

१. श्री.विजय प्रभाकर सोनवणे हे सुमारे १४ वर्षापासुन श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय येथे कंत्राटी पदधतीने कार्यरत होते.

१. श्री. विजय प्रभाकर सोनवणे यांना दि.११/०९/२०१९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचाराकरीता दाखविले होते.सदर रुग्णास Acute Necrotising Pancreatitisआजार आहे असे निदान

करणेत आले होते. सदर आजारावर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार करणे शक्य नसल्याने डॉ. अजिंक्य ढाकणे, फिजीशियन व डॉ.बच्छाव , व्हिजीटींग गॅस्ट्रोइन्ट्रोलॉजीस्ट डॉक्टर यांनी रुग्णास हायर सेंटरला रेफर केलेलेहोते.

२. श्री विजय प्रभाकर सोनवणे रुग्ण यांना पुढील उपचारासाठी डॉ. विनोद नाईक यांचेकडे के.ई.एम रुग्णालयात यांचेकडे दाखविले होते.

३. श्री विजय प्रभाकर सोनवणे यांची( के.ई.एम रुग्णालय , पुणे )येथे पोटाची सर्जरी केलेली होती. दि.२५/०९/२०१९ रोजी त्यांचे उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यु झालेला आहे.

४. सदर रुग्णाचे ( के.ई.एम रुग्णालय , पुणे )सर्जरीसाठी , उपचारासाठी तसेच मेडीकल करीता एकुण रु ५,५७,७१३/- एवढा खर्च झालेला आहे.

५. श्रीमती.अरुणा तुळशीराम गमे (सोनवणे) रुग्णाची पत्नी यांनी मेडिकल वैद्यकीय बिल मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

६. कंत्राटी पदधतीने काम करत असलेले कर्मचारी व त्यांचे अवलंबीत यांना फक्त श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात मोफत उपचाराची सुविधा मोफत दिलेली आहे. परंतु सदर रुग्णालयात न होणारे उपचार जर दुसरे रुग्णालयात केले तर त्यांचे बिलाचा परताव्याबाबत कुठलीही तरतुद केलेली नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

१. सदरचे रुग्ण श्री विजय प्रभाकर सोनवणे दि.११/०९/२०१९ रोजी उपचारासाठी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भर्ती केलेले होते.

२. सदर रुग्णास Acute Necrotising Pancreatitisआजार आहे असे निदान करणेत आले होते. सदर आजारावर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार करणे शक्य नसल्याने डॉ. अजिंक्य ढाकणे, फिजीशियन व डॉ.बच्छाव , व्हिजीटींग गॅस्ट्रोइन्ट्रोलॉजीस्ट डॉक्टर यांनी रुग्णास हायर सेंटरला रेफर केलेले आहे.

३. सदर डॉक्टरांनी श्री विजय प्रभाकर सोनवणे यांची( के.ई.एम रुग्णालय , पुणे )येथे पोटाची सर्जरी केलेली होती. दि.२५/०९/२०१९ रोजी त्यांचे उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यु झालेला आहे.

४. सदर रुग्णाचे ( के.ई.एम रुग्णालय , पुणे )सर्जरीसाठी , उपचारासाठी तसेच मेडीकल करीता एकुण रु ५,५७,७१३/- एवढा खर्च झालेला आहे.

५. श्रीमती.अरुणा तुळशीराम गमे (सोनवणे) रुग्णाची पत्नी यांनी मेडिकल वैद्यकीय बिल मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

६. कंत्राटी पदधतीने काम करत असलेले कर्मचारी व त्यांचे अवलंबीत यांना फक्त श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात मोफत उपचाराची सुविधा मोफत दिलेली आहे. परंतु सदर रुग्णालयात न होणारे उपचार जर दुसरे रुग्णालयात केले तर त्यांचे बिलाचा परताव्याबाबत कुठलीही तरतुद केलेली नाही.

७. सदर कर्मचारी यांचा मागील केलेल्या सेवेचा विचार करता त्यांनी मागणी केलेल्या बिलाच्या परताव्याबाबत एक विशेष बाब म्हणुन विचार व्हावा असे मत आहे.

तरी सदर रुग्णाचे सर्जरीसाठी उपचारासाठी तसेच मेडीकल करीता झालेल्या खर्चाबाबत सहानभुतीपुर्वक निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अशा प्रकारचे वैद्यकीय बिल मिळणेबाबतच्या सर्व अर्जांचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०२०-२१ करीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सर्व वार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे छपाई व कार्यालयीन स्टेशनरी इ. दरवर्षी सर्व विभागांची वार्षिक मागणी घेऊन ती एकत्रित करुन मा.व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेने विहीत पध्दतीने ई निविदा मागवुन खरेदी करणेत येत असते. त्यानुसार सन २०२०-२१ या वर्षाकरीता लागणारे छपाईकरीता दि.११/०७/२०१९ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना दि. ३१/०७/२०१९ पर्यंत मागणी देणेबाबत कळविण्यात आले होते.त्यानुसार साईबाबा रुग्णालयातील मेट्रन ऑफिसने दि.३१/०७/२०१९ अखेर सर्व मागणी एकत्रीत करुन देण्यात आलेली होती, व श्री साईनाथ रुग्णालयाची मागणी दि.२८/०८/२०१९ रोजी प्राप्त झालेली आहे.

दि. १/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालय पुर्णपणे मोफत झालेले आहे त्यामुळे रुग्णांच्या संख्येत देखील वाढ झालेली आहे.त्यामुळे छपाई व स्टेशनरीच्या संख्येत फार मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच दि. ०१/०७/२०१७ पासून GSTलागू झाल्याने देखील दरात वाढ झालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागांकडून वार्षिक छपाई व कार्यालयीन स्टेशनरीची मागणी प्राप्त झालेली असुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील अंतर्रुग्ण व बाहयरुग्ण व शस्त्रक्रीया यांचे तुलनेत मागील वर्षापेक्षा १५ ते २० टक्के रुग्णांत वाढ झालेली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मोफत उपचार केले जात असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना नव्याने चालू झाल्याने त्या विभागाची वाढलेली मागणी देखील विचारात घेतलेली आहे. तसेच गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या दरात वाढत्या महागाईमुळे पेट्रोल ,डिझेल व कच्च्या मटेरीयलच्या किंमती वाढलेल्या आहे. त्यामुळे सुध्दा दरात वाढ झालेली आहे.

सदरची मागणी अंदाजे १ वर्षाकरीता असुन त्यात कमी किंवा जास्त खप होऊ शकतो. दोन्ही रुग्णालयात दैनंदिन लागणारी छपाई व स्टेशनरी नसल्यास कामाची गैरसोय होऊ शकते.

सदर प्राप्त मागणीच्या अनुशंगाने अंदाजे खर्चाकरीता दरपत्रके घेऊन अथवा मागिल दरात योग्य ती वाढ करुन त्यानुसार येणा-या पुर्णांकित रक्कमेस मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन त्यानुसार ई निविदा /कोटेशन प्रक्रिया राबविले जाते व प्राप्त निम्नतम दरधारकास त्या मटेरीयलकामी पुरवठा आदेश देणेत येतो.

परंतु प्रत्यक्षात वर्षभर ज्यावेळेस सदर मटेरीयलची मागणी करण्याची वेळ येते त्यावेळेस असे निदर्शनास येते कि वॉर्ड विभागामार्फत करणेत आलेली मागणी ही फारच अवास्तव स्वरुपाची असून, प्रत्यक्षात कधी कधी वॉर्ड , विभागामार्फत करणेत आलेल्या मागणीनुसार देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाच्या ५० % किंमतीचे मटेरीयल देखील मागविण्यात येत नाही, परंतु काही मटेरीयलची मागणी ही ३-४ महिन्यातच संपते अशावेळेस जास्त नगसंख्या वाढवुन खरेदीस मान्यता मिळेपर्यंत असे मटेरीयल उपलब्ध नसल्यामुळे संबंधित विभागाची प्रचंड मोठया प्रमाणात अडचण निर्माण होते.तसेच ज्यावेळेस आपण पुरवठा आदेश देतो त्यावेळेस त्या रकमेच्या ५%सुरक्षा रक्कम ही आपणाकडे त्या निविदा कालावधीसाठी ठेवली जाते व कालावधी संपल्यानंतर सदर रक्कम संबंधित पुरवठाधारकाला परत करण्यात येते,परंतु सदर सुरक्षा रक्कम ही त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील रकमेच्या ५% घेण्यात येते व प्रत्यक्षात पुरवठा आदेशातील रकमेचे मटेरीयल खरेदी करणेत येत नाही, अशा वेळेस पुरवठाधारकांचा प्रचंड रोष सहन करावा लागतो व पुढच्या टेंडरच्या वेळेस असे पुरवठाधारक टेंडर भरत नाही.

तसेच सदर प्रकारामुळे वैधानिक लेखापरीक्षणामध्ये सुध्दा खरेदीकामी घेणेत आलेली मागणी व खर्च आणि प्रत्यक्षात वापरण्यात आलेले मटेरीयल व करणेत आलेला खर्च यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात तफावत आढळुन येत आहे अशी त्रुटी उपस्थित करणेत आलेली आहे.

तेव्हा वरील सर्व परिस्थिती पाहता दिलेली मागणी ही एकतर फारच जास्ती अथवा फारच कमी दिल्याची दिसते. त्यामुळे यावर्षी खरेदी विभागामार्फत वॉर्ड विभागाकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुशंगाने मागिल एक ते दिड वर्षाचा प्रत्यक्ष खपाचा विचार करुन प्रत्येक मटेरीयलची मागणी कमी किंवा जास्त नोंदविणेत आलेली आहे, म्हणजेच वॉर्ड व विभागाकडुन प्राप्त झालेल्या मागणीनुसार श्री साईबाबा रुग्णालयातील प्रिंटीग मटेरीयलचा अंदाजे खर्च काढल्यास तो ८४,८२,५७०.३८/-इतका येत आहे व याच मागणीचा मागिल खप व शिल्लक साठयानुसार खर्च काढल्यास तो ३४,०२,९९१.९८/- इतका असून या कामी झालेल्या किंमतीमूळे पुरवठाधारकाकडून घेण्यात येणारी सुरक्षा रक्कम ही देखील कमी होणार असून त्यामुळे जास्तीत जास्त पुरवठाधारक निविदा प्रक्रियेत भाग घेतील ,परंतु या सर्व गष्टीमध्ये एकच अडचण निर्माण होऊ शकते, की जर भविष्यात एखादया मटेरीयलचा खप अचानक वाढल्यास त्या मटेरीयलची मंजुर नगसंख्या संपुष्टात येऊन त्या वॉर्ड व विभागाची अडचण निर्माण होऊ शकते, त्यामुळे अशा वेळेस सदर मंजुर दराने नगसंख्या वाढवुन खरेदीचे अधिकार मा.वैद्यकीय संचालक सा.यांना दयावे लागणार आहेत.

सदरची प्राप्त मागणी एकत्रित करुन त्याची होणारी एकुण मागणी व सध्या स्टोअरमध्ये असलेली शिल्लक व वापर / खप इ. बघुन निव्वळ मागणी तयार करण्यात आली असून त्याचा तक्ता सोबत परिशिष्ट अ व ब म्हणून सादर केला आहे.

सदर वार्षिक सन २०२०-२१ या वर्षाकरीता लागणा-या छपाई व स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त मागणीनुसार अंदाजे खर्चासाठी ब-याच पुरवठाधारकांना विनंती करणेत आलेली होती परंतु सदर मटेरीयल हे जास्त प्रमाणात असुन व त्या प्रत्येक मटेरीयलचा नमुना तपासून , त्यानुसार त्या संबंधित मटेरीयलसाठी लागणा-

या गोष्टींची सध्याच्या बाजारातील किंमत पाहून मग सध्याच्या बाजारातील किंमत पाहून मग अंदाजे किंमत दयावी लागणार होती म्हणून कोणत्याही पुरवठाधारकाने अंदाजे खर्चासाठी कोटेशन दिलेले नाही. तसेच सदर कोटेशनची अजून वाट बघितल्यास नविन खरेदीसाठी खूप वेळ लागणार होता म्हणून जे मटेरीयल मागिल खरेदीमध्ये उपलब्ध होते अशा मटेरीयलच्या दरामध्ये १५% वाढ धरुन अंदाजे खर्चाकरीता घेणेत आलेले आहे व ज्या मटेरीयलची नव्याने मागणी करणेत आलेली आहे अशा मटेरीयलच्या अंदाजे खर्चाकरीता मे. श्री गणेश एंटरप्रायजेस, नासिक, .कृष्णा प्रिंटर्स , कोपरगांव आणि श्री गजानन ऑफसेट, कोपरगांव यांचेकडे अंदाजे खर्चासाठी मेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, वार्षिक छपाई मागणीचे नविन आयटम जास्त असल्याकारणाने देखिल त्यांना दरपत्रक देण्यास विलंब झाला असुन त्यांनी दि.२२/१०/२०१९ रोजी त्यांचे दरपत्रक दिलेले आहे. मागिल दरातील वाढ व प्राप्त तिन दरपत्रकातील सरासरीनुसार सदर खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ७६,९८,८७०//-(अक्षरी पुर्णांकित एकूण रक्कम शहात्तर लाख अठठयान्नव हजार आठशे सत्तर रुपये) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| विभागाचे नाव | एकूण रक्कम रु. |
|---|---|
| छपाई –अ | |
| श्री साईबाबा हॉस्पिटल | ३४०२९९१.९८ |
| श्री साईनाथ रुग्णालय | २८०७४७०.४६ |
| अ एकुण रक्कम सर्व करांसहित रु.- | ६२१०४६२.४४ |
| कार्यालयीन स्टेशनरी – ब | |
| श्री साईबाबा हॉस्पिटल | ११०६०६७.०५ |
| श्री साईनाथ रुग्णालय | ३,८२,३४०.९४ |
| ब एकुण रक्कम सर्व करांसहित रु.- | १४८८४०७.९९ |
| एकुण रक्कम रु.- (अ +ब) | ७६,९८,८७०.४३ रु. |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्रथमत: विहीत पध्दतीने ई–निविदा मागवुन करता येईल त्यानंतर ई निविदा प्रक्रिया राबवुन जे छपाई व कार्यालयीन स्टेशनरी साठी फेर निविदा मागवाव्या लागणार आहे त्याकामी मागील अनुभव पाहता २-३ वेळेस ई निविदा प्रक्रिया राबवुन सुध्दा सदर मटेरीयलचे पुरवठा आदेश जात नसल्याने तसेच ते मटेरीयलची प्रत्यक्षात प्रती नग रु.३०००००/- चे आत असल्यामुळे शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावलीनुसार शासन निर्णय क्र.३.२.३-दरपत्रकाच्या आधारे खरेदी –जेव्हा खरेदीची किंमत रु.पाच हजार पेक्षा जास्त व रुपये ३लाख पर्यंत असेल तेव्हा खरेदी दरपत्रक मागवून खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता करता येईल एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे.

सदर स्टेशनरी व छपाई मटेरीयल नसल्यामुळे पेशंटची फारच गैरसोय होऊन डॉक्टर /कर्मचा-यांना हयाकामी वृत्तपत्रांचा रोष सहन करावा लागतो.तसेच सदर स्टेशनरी / छपाई मटेरीयलची वार्षिक खरेदी किंमत पाहता निविदाधारकांस सुध्दा निविदा फी व अनामत रक्कम भरणे तथा ई निविदा मागविते वेळेस मागविण्यात येणारे Turnover Certificareदेणे शक्य नसल्याने ई निविदा प्रक्रियेस आवश्यक प्रतिसाद मिळत नसल्याने सदरहू साहित्य खरेदीकामी वारंवार ई निविदा प्रक्रिया राबवावी लागते,तेव्हा वरील सर्व बाबींचा विचार करता आणि हॉस्पिटलची दैनंदिन गरज पाहता उर्वरीत रु.३०००००/-लाखापर्यंतचे छपाई व स्टेशनरी साहित्याकामी नविन खरेदी नियमावलीनुसार कोटेशन मागणी करुन खरेदी करता येईल.त्यासाठी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर टाकण्यात येईलतसेच जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहिरात देता येईल आणि जास्तीत जास्त पुरवठाधारकांना ई मेल तथा पत्राद्वारे कोटेशन मागणी करता येऊन ३लाखांचेआतील मटेरीयलकामी एकत्रित कोटशन मागविण्यास व पुरवठा आदेश देते वेळेस एकत्रित पुरवठा आदेश देण्यास प्रस्तावित केले आहे.

तरी वरीलप्रमाणे छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्रथमत विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीकरता येईल त्यानंतर ई निविदा प्रक्रिया राबवून ज्या ३ लाखांचे आतील मटेरीयल कामी पुरवठा जाणार नाही त्या मटेरीयलचे दरपत्रक मागवूनखरेदी करता येईल व याकामी येणा-या रु. अंदाजे रु. ७६,९८,८७० /-(अक्षरी

पुर्णांकित एकूण रक्कम - शहात्तर लाख अठठयान्नव  हजार आठशे सत्तर  रुपये ) मात्रचे खर्चास व इतर बाबीस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यस्थापन सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये  सन २०२०-२१ या वर्षाकरीता आवश्यक असणारी छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच तीन लाखाचे आतील छपाई व स्टेशनरी करीता दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७६,९८,८७०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.  तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा/रक्तपेढी विभागातील मशिनरीकरीता लागणारे Monopoly Lab. Chemicals /Kits खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अ) दि.२४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४९९ अन्वये झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.२५/०८/२०११ रोजीचे स्थानिक विश्वस्तांचे उपसमिती सभेत झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.१९/११/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७६२ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागाकरीता Fully Automatic Elisa System ही मुळ निविदाधारक M/s.Siddhi Medical Distibutors, Aurangabad यांचेऐवजी सदर सिस्टमची थेट उत्पादक कंपनी M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून रु.२२,७८,५००/- रुपयात शिर्डी पोहोच (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणारे केमीकल्स तक्त्यात नमुद केलेल्या दराप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता खरेदी करण्यात यावे, असे ठरलेले होते, त्यानुसार ठरावास अनुसरुन M/s.Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/वशी/एसएसबीएच/ स्टोअर (पी/एस) / ३५६६/२०११ दि.११/१०/२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मागील पाच वर्षापासुन मशिन व्यवस्थित कार्यान्वित असून ठरावातील मंजुर दरानुसार त्यांनी आवश्यकतेनुसार केमीकल्सचा पुरवठा केलेला होता. तथापि ठरावानुसार त्यांचेकडून केमीकल्स खरेदी करावयाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रयोगशाळा विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्र.१३७(१५) अन्वये त्यांना आवश्यक असणारे लॅब केमीकल्स M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचे Authorised Distributor M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचेकडून इकडील जा.क्र.एसएसएस/वशी/ एसएसबीएच/स्टोअर(पी/एस)/०२/२०१७ दि.०१/०४/२०१७ अन्वये मागील मंजुर दराने पुर्णांकित रक्कम रु.१४,०४,३२८/- इतक्या रक्कमेचे खरेदी करुन देण्यात आलेले असून त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Pack Size | Req. Qty. | Rate per n Rs. | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ARCHITECT RVS | 2000T | 5 | 2250.00 | 11250.00 |
| 2 | CONS WASH BUFFER | 10LTR | 1 | 18000.00 | 18000.00 |
| 3 | ARC HCV CALIBRATOR | SET | 1 | 4500.00 | 4500.00 |
| 4 | ARC HCV CONTROL | SET | 1 | 2700.00 | 2700.00 |
| 5 | ARC HCV KIT | 400T | 9 | 60508.80 | 544572.00 |
| 6 | ARC HIV AG/AB COMBO CALIBRATOR | SET | 2 | 4500.00 | 9000.00 |
| 7 | ARC HIV AG/AB COMBO CONTROL | SET | 1 | 2700.00 | 2700.00 |
| 8 | ARC HIV AG/AB COMBO KIT | 400T | 12 | 43678.80 | 524145.60 |
| 9 | ARC HBSAG CALIBRATOR | SET | 1 | 4500.00 | 4500.00 |
| 10 | ARC HBSAG CONTROL | SET | 1 | 2700.00 | 2700.00 |
| 11 | ARC HBSAG KIT | 400T | 9 | 20800.80 | 187200.00 |

| Sr. No. | Description | Pack Size | Req. Qty. | Rate per n Rs. | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 12 | PRE TRIGGER SOLUTION | 4*1LT | 2 | 22500.00 | 45000.00 |
| 13 | PROBE CONDITIONING SOLUTION | | 1 | 2700.00 | 2700.00 |
| 14 | SAMPLE CUPS | | 4 | 6840.00 | 27360.00 |
| 15 | ARCHITECT SEPTUM CAPS | | 5 | 900.00 | 4500.00 |
| 16 | TRIGGER SOLUTION | 4*1LT | 1 | 13500.00 | 13500.00 |
| | | | | **Total Amt.in Rs.** | **1404327.60** |

सध्या सदर केमीकल्सचा साठा संपुष्ठात आल्यामुळे रक्तपेढी विभागाने दि.०२/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर केमीकल्सची ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीच्या केमीकल्सची मागणी केल्याने ते केमीकल्स नव्याने खरेदी करावे लागणार असल्यामुळे Fully Automatic Elisa System ची मॅन्युफॅक्चरीग कंपनी M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना उपरोक्त केमीकल्सचे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे Authorised Distributors M/s. Anand Chemiceutics, Pune यांचेमार्फत दि.२०/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे-

| Sr. No. | Name of Item | Pack Size | Qty. | Rate (Rs.) | GST % | Rate Incl. GST% | Old Sanction Rate | Rate Differernce |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ARCHITECT RVS | 8x500T | 1 | 2150.00 | 18% | 2537.00 | 2250.00 | + 287.00 |
| 2 | CONS WASH BUFFER | 10LTR | 1 | 18000.00 | 12% | 20160.00 | 18000.00 | + 2160.00 |
| 3 | ARC HCV CALIBRATOR | SET | 1 | 4687.50 | 12% | 5250.00 | 4500.00 | + 750.00 |
| 4 | ARC HCV CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2700.00 | + 17.70 |
| 5 | ARC HCV KIT | 100T | 1 | 15127.20 | 5% | 15883.56 | 60508.80 | + 756.36 |
| 6 | ARC HIV AG/AB COMBO CALIBRATOR | SET | 1 | 4687.20 | 12% | 5249.66 | 4500.00 | + 749.66 |
| 7 | ARC HIV AG/AB COMBO CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2700.00 | + 17.70 |
| 8 | ARC HIV AG/AB COMBO KIT | 100T | 1 | 10919.70 | 5% | 11465.69 | 43678.80 | + 545.99 |
| 9 | ARC HBSAG CALIBRATOR | SET | 1 | 4500.00 | 12% | 5040.00 | 4500.00 | + 540.00 |
| 10 | ARC HBSAG CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2700.00 | + 17.70 |
| 11 | ARC HBSAG KIT | 100T | 1 | 5200.20 | 5% | 5460.21 | 20800.80 | + 260.01 |
| 12 | PRE TRIGGER SOLUTION | 4*975ml | 1 | 19502.69 | 12% | 21843.01 | 22500.00 | -656.99 |
| 13 | PROBE CONDITIONING SOLUTION | | 1 | | | | 2700.00 | |
| 14 | SAMPLE CUPS | | 1 | | | | 6840.00 | |
| 15 | ARCHITECT SEPTUM CAPS | | 1 | | | | 900.00 | |
| 16 | TRIGGER SOLUTION | 4*975ml | 1 | 13500.00 | 12% | 15120.00 | 13500.00 | + 1620.00 |

M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbaiयांनी पुढील पाच वर्षाकरीता त्यांचे Authorised Distributors M/s. Anand Chemiceutics, Pune यांचेमार्फत कळविलेल्या नविन दरानुसार उपरोक्त केमीकल्स खरेदी करावे लागणार असून ते त्यांचे Distributor मार्फत केमीकल्सचा पुरवठा करणार आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या दरापेक्षा इतरत्र कोठेही कमी दराने पुरवठा करणार नसलेबाबत कळविले आहे.

ब) दि.२४/०७/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४९९ अन्वये झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.२५/०८/२०११ रोजीचे स्थानिक विश्वस्तांचे उपसमिती सभेत झालेल्या चर्चा/ वाटाघाटीनुसार व दि.१९/११/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७६२ अन्वये श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Blood Cell Separator– Apheresis Machine हे M/s.Sterling Healthcare, Mumbai यांचेकडून Fenwal कंपनीचे Amicus Cell या मॉडेलचे रु.२४,४१,०३६/- इतक्या रक्कमेत शिर्डी पोहोच (सर्व करांसह) खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणा-या ApheresisKit ठरावात नमुद केलेल्या दराप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता खरेदी करण्यात यावे, असे ठरलेले होते, त्यानुसार ठरावास अनुसरुन M/s.Sterling Healthcare, Mumbai यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/वशी /एसएसबीएच /स्टोअर(पी/एस)/३३१५/२०११ दि.०१/१०/२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यांनी मशिन व्यवस्थित कार्यान्वित करुन दिलेले होते व ठरावातील मंजुर दरानुसार त्यांनी आवश्यकतेनुसार किट्सचा पुरवठा केलेला आहे.

तथापि ठरावानुसार त्यांचेकडून ApheresisKit खरेदी करावयाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे रक्तपेढी विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्र.१३७(१६) अन्वये त्यांना आवश्यक असणारे Kit M/s.Sterling Healthcare, Mumbai यांचेकडून इकडील जा.क्र.एसएसएस/वशी/एसएसबीएच/स्टोअर(पी/एस)/२९२७/२०१७ दि.१७/०३/२०१७ अन्वये मागील मंजुर दराने पुर्णांकित रक्कम रु.५५,०००/- इतक्या रक्कमेचे खरेदी करुन देण्यात आलेले असून त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| **Sr. No.** | **Description** | **Req. Qty.** | **Sanctioned Rate per in Rs.** | **Total in Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1 | Single Needle Closed System Amicus Kits For Fenwal Apheresis Machine | 10 | 5500.00 | 55,000.00 |
| | | **Total Amt.in Rs.** | | 55,000.00 |

सध्या सदर किटचा साठा संपुष्ठात आल्यामुळे रक्तपेढी विभागाने दि.०२/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदरहू किट्सची ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीच्या किट्सची मागणी केल्याने त्या किट्स नव्याने खरेदी करावे लागणार असल्यामुळे Blood Cell Separator– Apheresis Machine ची मॅन्युफॅक्चरीग कंपनी Fenwal यांना उपरोक्त किट्सचे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.२१/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविले असून ते त्यांचे Authorised Distributors M/s.Anand Health Care Services, Pune यांचेमार्फत किट्सचा पुरवठा करणेबाबत कळविलेले आहे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate (Rs.) | GST % | Rate Incl. GST% | Old Sanction Rate | Rate Differernce |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Single Needle Closed System Amicus Kits For Fenwal Apheresis Machine | 1 | 6500.00 | 18% | 7670.00 | 5500.00 | + 2170.00 |

M/s. Fenwal यांनी पुढील पाच वर्षाकरीता त्यांचे Authorised Distributors M/s.Anand Health Care Services, Pune यांचेमार्फत कळविलेले नविन दर रु.७६७०/- इतके असून ते त्यांचे Distributor मार्फत किट्सचा पुरवठा करणार आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या दरापेक्षा इतरत्र कोठेही कमी दराने पुरवठा करणार नसलेबाबत कळविले आहे.

क) दि.०५/११/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६९८(इ) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता एकुण ०२ नग Cell Counter Machine हे M/s. A.G.Diagnostics, Secunderabad यांचेकडून AGD कंपनीचे मॉडेल ERMA PCE-210 हे मशिन

रु.९,५०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन सदर मशिनसाठी लागणारे ५००० टेस्टकरीता लागणारे केमीकल्स मोफत स्विकारणेत यावे असे ठरलेले होते.

वरीलप्रमाणे ठरावास अनुसरुन M/s. A.G.Diagnostics, Secunderabad यांना इकडील पत्र जा.क्र.एसएसएस/वशी/एसएसबीएच/स्टोअर(पी/एस)/१२९०९/२०१२ दि.०८/११/२००५ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार M/s. A.G.Diagnostics, Secunderabad यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे मशिनचा पुरवठा केलेला असून मशिन व्यवस्थित कार्यान्वित असून त्यांनी आवश्यकतेनुसार केमीकल्सचा पुरवठा केलेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/०२/२०१२ निर्णय क्र.१९१ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता आणखी ०२ नग Cell Counter Machine हे M/s.AGD Biomedicals (P) Ltd., Mumbai यांचेकडून Erma, Japan कंपनीचे मॉडेल PCE 210 हे रु.६,६०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात येऊन त्याकामी लागणारे केमीकल्स हे वार्षिक खरेदीमध्ये असलेले दर व मशिनबरोबर दिलेले दर पाहता वार्षिक खरेदीतील दर कमी असल्याने मशिनबरोबर प्राप्त दर स्विकारण्यात आलेले नव्हते.

तथापि ठरावानुसार त्यांचेकडून घ्यावयाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे दि.०४/०३/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१२४ अन्वये Cell Counter Machine करीता आवश्यक असणारे लॅब केमीकल्स M/s. A.G.Diagnostics, Secunderabad यांचे Authorised Distributors M/s. Universal Chemicals, Nashik यांचेकडून दरपत्रक मागवून खालीलप्रमाणे दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.४,४०,०७४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Sanctioned Rate per in Rs. | Total in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Autodil 20 Ltr. | 12 | 1688.00 | 20256.00 |
| 02 | Autoclean 2 Ltr. | 6 | 579.00 | 3474.00 |
| 03 | Autolyse 500ml | 8 | 2543.00 | 20344.00 |
| | | **Total Amt.in Rs.** | | **44074.00** |

वरीलप्रमाणे आवश्यकतेनुसार लॅब केमीकल्स खरेदी करण्यात येऊन ते वापरण्यात आल्यानंतर सन २००६-०७ या वर्षीच्या वार्षिक औषधे खरेदीमध्ये उपरोक्त केमीकल्स खरेदी करण्यात आलेले होते.

परंतु सदरची नग संख्या संपलेमुळे श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.०१/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदरहू केमीकल्सची ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीचे केमीकल्सची मागणी केल्याने तसेच सदरकामी वारंवार निविदा प्रक्रिया राबवूनसुध्दा निविदा प्राप्त होत नसल्यामुळे Cell Counter Machine ची मॅन्युफॅक्चरीग कंपनी M/s. A.G.D. Biomedicals यांना उपरोक्त केमीकल्सचे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.२६/०८/२०१९ रोजीचे ई-मेलअन्वये खालीलप्रमाणे दर कळविले आहे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | GST % | Rate Incl. GST% | Old Sanction Rate | Rate Differernce |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Autodil 20 Ltr. | 1 | 12% | 2640.00 | 1688.00 | + 952 |
| 02 | Autoclean 2 Ltr. | 1 | 12% | 1445.00 | 579.00 | + 866 |
| 03 | Autolyse 500ml | 1 | 12% | 3833.00 | 2543.00 | + 1290 |

तसेच M/s. A.G.D. Biomedicals यांनी पुढील पाच वर्षाकरीता याच दराने केमीकल्स पुरवठा करणार असलेबाबत कळविलेले असून ते त्यांचे Authorised Distributor मार्फत केमीकल्सचा पुरवठा करणार आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या दरापेक्षा इतरत्र कोठेही कमी दराने पुरवठा करणार नसलेबाबत कळविले आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४/प्र.क्र.८२/भाग – ३/उद्योग – ४, दि. ०१/१२/२०१६अन्वये परिच्छेद ३.२.६ – एकल स्त्रोत खरेदी - एकल स्त्रोत पुरवठादाराच्या निवडीमध्ये गुणवत्ता आणि खर्चाच्या संबंधात स्पर्धेमुळे जे फायदे मिळतात ते फायदे मिळत नाहीत. तसेच अशा निवडीत पारदर्शकतेची उणीव असते आणि त्यामुळे अस्वीकारर्ह प्रथांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे एकल स्त्रोत निवड पध्दत फक्त खाली नमूद केलेल्या अपवादात्मक परिस्थितीत वापरण्यात येते :-

अ) खरेदीची वस्तू फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार (जेंव्हा वस्तू एकच विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा एका विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात.) असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते.

आ) वस्तू, साधने, तंत्रज्ञान किंवा सेवा एका विक्रेत्याकडून खरेदी केल्यानंतर अतिरिक्त वस्तुंचा पुरवठा देखील त्याच विक्रेत्याकडून, प्रामाणिकरणामुळे किंवा अनुरुपतेच्या कारणामुळे, खरेदी कार्यालयाच्या गरजा मूळ खरेदीच्या परिणामकारकतेमुळे भागविल्या गेल्याने तसेच, मूळ खरेदीच्या तुलनेत प्रस्तावित खरेदीचा मर्यादीत लहान आकार – तुलनेने कमी प्रमाणात खरेदी, किंमतींचा वाजवीपणा आणि पर्यायी वस्तू किंवा सेवा अनुरुप नसणे इ. बाबी विचारात घेऊन, खरेदी कार्यालयाने खरेदी करण्याचा निर्णय घेणे.

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त तीनही मशिनकरीता ज्या कंपनीचे मशिन आहे त्याच कंपनीचे केमीकल्स अथवा किट्स खरेदी करावे लागणार आहे. तसेच सध्या सदरहू मशिसनकरीता लागणारा केमीकल्स / किट्सचा साठा संपुष्ठात येत असल्यामुळे नव्याने केमीकल्स/ किट्स खरेदी करावे लागणार असून दि.०६/०९/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५२ अन्वये बेरचसे लॅब मटेरीयल तथा ओटी.मधील सर्जिकल साहित्य हे आपण पुर्वी खरेदी केलेल्या कंपन्याच्या मशिनसाठी आवश्यक असतात व ते त्याच कंपनीकडून खरेदी करावे लागते म्हणजेच सदरहू आयटम हे Monopoly आयटम या प्रकारात मोडतात, त्यासाठी फक्त एकच निविदा प्राप्त होते त्यामुळे त्या प्राप्त एकाच निविदेचा विचार होऊन त्याची बाजारभावाशी तुलना करुन ते मटेरीयल खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार शासन खरेदी नियमावलीतील परिच्छेद ३.२.६- एकल स्त्रोत खरेदीप्रमाणे खरेदीची कार्यवाही करता येईल.

त्यास अनुसरुन -

अ) श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागातील Fully Automatic Elisa System करीता पुढील पाच वर्षाकरीता आवश्यकतेनुसार लागणारे लॅब केमीकल्स M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचे Authorised Distributors M/s. Anand Chemiceutics, Pune यांचेमार्फत कळविलेल्या नविन दरानुसार खरेदी करावे लागणार आहे.

ब) श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता Blood Cell Separator– Apheresis Machine करीता पुढील पाच वर्षाकरीता आवश्यकतेनुसार लागणारे Apheresis KitsM/s. Fenwal यांनी त्यांचे Authorised Distributors M/s.Anand Health Care Services, Pune यांचेमार्फत कळविलेल्या नविन दरानुसार खरेदी करावे लागणार आहे.

क) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता एकुण ०४ नग Cell Counter Machine करीता पुढील पाच वर्षाकरीता आवश्यकतेनुसार लागणारे लॅब केमीकल्स M/s. A.G.D. Biomedicalsयांनी त्यांचे Authorised Distributors M/s.Universal Chemicals, Nashik यांचेमार्फत कळविलेल्या नविन दरानुसार खरेदी करावे लागणार आहे..

तरी वरीलप्रमाणे “अ”, “ब” व“क” या प्रस्ताव खरेदीकामीचे पुरवठाधारकांना खरेदी समितीचे सभेपुढे बोलवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदीस मान्यतेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.३६ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा/रक्तपेढी विभागातील मशिनरीकरीता लागणारे Monopoly Lab. Chemicals/Kits खरेदी करणेकामी पुरवठाधारक M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai, M/s.Anand Health Care Services, Pune व M/s.Universal Chemicals, Nashik यांचे प्रतिनिधी समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरांबाबत चर्चा केली असता, चर्चेअंती त्यांनी खालील प्रमाणे सवलत देऊ केली.

**Purchase of Monopoly Laboratory Kits for Fully Automatic Elisa System**
**M/s.Abbott Healthcare Pvt.Ltd., Mumbai**
**(Authorised Distributors:M/s.Anand Chemiceutics, Pune)**

| Sr. No. | Name of Item | Pack Size | Qty. | Basic Rate (Rs.) | GST % | Rate Incl. GST % | New Rate Incl. GST% | Rate after Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ARCHITECT RVS | 8x500T | 1 | 2150.00 | 18% | 2537.00 | 2537.00 | 5% less |
| 2 | CONS WASH BUFFER | 10LTR | 1 | 18000.00 | 12% | 20160.00 | 20160.00 | 5% less |
| 3 | ARC HCV CALIBRATOR | SET | 1 | 4687.50 | 12% | 5250.00 | 5250.00 | 5% less |
| 4 | ARC HCV CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2717.70 | 5% less |
| 5 | ARC HCV KIT | 100T | 1 | 15127.20 | 5% | 15883.56 (As per Packing Rs.63532/-) | 15883.56 (As per Packing Rs.63532/-) | 5% less |
| 6 | ARC HIV AG/AB COMBO CALIBRATOR | SET | 1 | 4687.20 | 12% | 5249.66 | 5249.66 | 5% less |
| 7 | ARC HIV AG/AB COMBO CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2717.70 | 5% less |
| 8 | ARC HIV AG/AB COMBO KIT | 100T | 1 | 10919.70 | 5% | 11465.69 (As per Packing 45862/-) | 11465.69 (As per Packing 45862/-) | 5% less |
| 9 | ARC HBSAG CALIBRATOR | SET | 1 | 4500.00 | 12% | 5040.00 | 5040.00 | 5% less |
| 10 | ARC HBSAG CONTROL | SET | 1 | 2426.52 | 12% | 2717.70 | 2717.70 | 5% less |
| 11 | ARC HBSAG KIT | 100T | 1 | 5200.20 | 5% | 5460.21 (As per Packing 21840/-) | 5460.21 (As per Packing 21840/-) | 5% less |
| 12 | PRE TRIGGER SOLUTION | 4*975ml | 1 | 19502.69 | 12% | 21843.01 | 21843.01 | 5% less |
| 13 | PROBE CONDITIONING SOLUTION | | 1 | | | | | 5% less |
| 14 | SAMPLE CUPS | | 1 | | | | | 5% less |
| 15 | ARCHITECT SEPTUM CAPS | | 1 | | | | | 5% less |
| 16 | TRIGGER SOLUTION | 4*975ml | 1 | 13500.00 | 12% | 15120.00 | 15120.00 | 5% less |

तसेच दरवर्षी ३५०० पेक्षा जास्त Test झाल्यास त्यानंतरच्या Test साठी ७% सुट देण्याचे मान्य केलेले आहे.

**Purchase of Monopoly Laboratory Kits for Blood Cell Separator– Apheresis Machine**
**M/s. Fenwal (Authorised Distributors M/s.Anand Health Care Services, Pune)**

| Sr. No. | Name of Item | Qty. | Basic Rate (Rs.) | GST % | Rate Incl. GST% | New Rate Incl. GST% | Rate after Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Single Needle Closed System Amicus Kits For Fenwal Apheresis Machine | 1 | 6500.00 | 18% | 7670.00 | 7670.00 | 7170.00 |

**सरसकट रु.५००/-मात्र सुट देण्याचे मान्य केलेले आहे.**

**Purchase of Monopoly Laboratory Chemicals for Cell Counter Machine**
**M/s. A.G.D. Biomedicals (Authorised Distributors M/s.Universal Chemicals, Nashik)**

| Sr. No. | Name of Item | Qty. | Basic Rate in Rs. | GST % | Rate Incl. GST% | New Rate (Incl. GST%) | Rate after Negotiation (agreed as per old rate) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Autodil 20 Ltr. | 1 | 2358.00 | 12% | 2640.00 | 2640.00 | 2480/- |
| 2 | Autoclean 2 Ltr. | 1 | 1290.00 | 12% | 1445.00 | 1445.00 | 1445/- |
| 3 | Autolyse 500ml | 1 | 3423.00 | 12% | 3833.00 | 3833.00 | 3820/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा/रक्तपेढी विभागातील मशिनरीकरीता लागणारे Monopoly Lab. Chemicals/Kits खरेदी करणेकामी पुरवठाधारक यांनी चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर २०१९ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८५,९३,९७०/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे नोव्हेंबर२०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १८,१८९ व १,१५८ आयपीडी रुग्णांपैकी ३,७१७ ओपीडी व ५४६ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.८१,३२,१७०/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल

आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३१०रुग्णाना रक्कम रु.४,६१,८००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३५ | १०,६८,६५७/- | - | १०,६८,६५७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३८५ | २५,९६,८६४/- | ११,१६,१७५/- | १४,८०,६८९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७ | ८०,८९९/- | ६२,०००/- | १८,९९९/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ८५८ | ४८,८४,५२९/- | ३०,३९,८५९/- | १८,४४,६७०/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २५३ | १,०२,२७,४६५/- | ८३,६९,९९५/- | १८,५७,४७०/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,६२५ | १८,६१,७८५/- | - | १८,६१,७८५/- |
| | एकुण | ४,२६३ | २,०७,२०,१९९/- | १,२५,८८,०२९/- | ८१,३२,१७०/- |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४३ | ५१,०००/- | - | ५१,०००/- |
| २ | हिमोफिलीया | २ | ३,२००/- | - | ३,२००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | - | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १५ | १८,०००/- | - | १८,०००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ४१ | ५,३००/- | - | ५,३००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १०५ | २,४६,३००/- | - | २,४६,३००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | १० | १३,८००/- | - | १३,८००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | - | - | - | - |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ९४ | १,२४,२००/- | - | १,२४,२००/- |
| | एकुण | ३१० | ४,६१,८००/- | - | ४,६१,८००/- |
| | एकुण अ+ब | ४,५७३ | २,११,८१,९९९/- | १,२५,८८,०२९/- | ८५,९३,९७०/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर २०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८५,९३,९७०/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे नोव्हेंबर-२०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८५,९३,९७०/-मात्रचे रकमेस मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस अधिन राहुन तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **हिस्टोपॅथोलॉजीस्ट पदाला फिक्स इन्सेटीव्ह मिळण्याबाबतचे डॉ.कविता सरवार यांचे दि.१०.१०.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र– मा व्यवस्थापन समिती दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८६८.

श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णांना विनामुल्य रूग्णसेवा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे या रूग्णालयामध्ये रूग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रूग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांच्या रूग्णांच्या बिलाच्या रकमेतून इन्सेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रूग्णालयाशी तुलना करून श्री साईनाथ रूग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेंटीव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेंटीव्ह लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रू. १२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मंजुरी घेण्यात येऊन, त्यानंतर सदरहू इन्सेंटीव्ह संबंधीतांना आदा करणेत यावा. तसेच नव्याने भरती होणा-या स्थायी मानधनावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इन्सेंटीव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

शासन निर्णय- शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि. २७/०६/२०१८-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टर्सना मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता (Incentives) मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रूग्णालयांतील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) दोन्ही रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबतची नियमावली / अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्त्याचे दर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात यावेत.

मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय- १) मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांचे रिक्त पदे भरणेकामी दैनिक वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, तसेच उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनीधी, वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांची समिती गठीत करण्यात येऊन, या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देण्यात यावे, असे ठरले. तसेच फिजिशियन या पदासाठी जाहिराती व्यतिरीक्त इतर वेळेस उमेदवाराने अर्ज केल्यास पात्र उमेदवारास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्सहन भत्ता देऊन थेट नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४०१.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना प्रभारी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचा प्रोत्साहन भत्ता दि. ०१/०६/२०१८ पासून पुढील आदेश होईपर्यंत देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा पॅथॉलॉजीस्ट पदाला इन्सेन्टीव्ह मिळण्याबाबतचा दि. १०/१०/२०१९ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"मी दि. ०१/०९/२०१५ पासुन साईबाबा हॉस्पिटल श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे कायम कर्मचारी तज्ञ डॉक्टर म्हणून कार्यरत आहे. मी दि. ०१/०९/२०१५ ते दि. ०९/१०/२०१६ पर्यंत

ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट या पदावर काम केले आहे तर दि. ०३/१०/२०१६ पासून मी हिस्टोपॅथोलॉजीस्ट (सिनीअर पद) या पदावर काम करत आहे. नमूद करू इच्छिते की साईबाबा हॉस्पिटलमधील २ पदे वगळता, ज्युनिअर पॅथोलॉजिस्ट व हिस्टोपॅथोलॉजीस्ट इतर सर्व तज्ञ (speciality) डॉक्टरांना (कायम+कंत्राटी) सन २००६ पासून इन्सेंन्टीव्ह मंजुर झालेला आहे. तसेच साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व तज्ञ डॉक्टरांना ते संस्थान सेवेत रूजू झाल्याच्या दिनांकापासूनच इन्सेन्टीव्ह मिळतो आहे. वरीलपैकी ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट पदालासुध्दा जुलै २०१८ पासुन फिक्स (fixed) इन्सेन्टीव्ह मंजुर होऊन मिळतो आहे. फक्त माझ्या सदयपदाला म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजिस्ट या पदालाच इन्सेंटीव्ह अजुनही मंजुर झालेला नाही. मी या संदर्भात वेळोवेळी विनंती अर्ज सादर केले परंतु माझ्या अर्जाची साधी दखलही घेण्यात आलेली नसून या प्रकरणात मला पूर्णपणे डावलले गेले आहे. मी गेल्या ४ वर्षांपासुन प्रमाणिकपणे संस्थानसेवेत काम करत आहे. दरवेळी वरिष्ठांच्या आदेशांचे मी काटेकोरपणे पालन केले आहे. गरज पडेल तेव्हा रूग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून इतर डॉक्टरांच्या रजा कालावधीत एकाचवेळी दोन्ही हॉस्पिटलच्या (साईनाथ+साईबाबा) पॅथोलॉजी लॅब सांभाळण्याचे आदेश मला मिळाले. मी जीव ओतुन काम केले. माझ्या कार्यकाळात दोन्ही हॉस्पिटलमधील लॅबमध्ये कुठलीही अडचण येऊ दिली नाही. त्याचबरोबर साईबाबा हॉस्पिटलमधील सिनीअर पॅथोलॉजीस्ट यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या पदाचा अतिरीक्त कार्यभारही समर्थपणे सांभाळला. उपरोक्त संदर्भानुसार माझी कळकळीची मागणी आहे की माझ्या हिस्टोपॅथोलॉजिस्ट या पदाला फिक्स (fixed) इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात यावा व दि. ०३/१०/२०१६ पासुनचा या पदाचा फरक मला मिळावा. तसेच ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट या पदाचा कार्याकाळातील दि.०१/०९/२०१५ ते दि. ०२/१०/२०१६ पर्यंतचा या पदाचा फीक्स इन्सेंटीव्हप्रमाणे फरक मिळावा. माझी श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान यांप्रति पूर्ण निष्ठा असून मला खात्री आहे माझ्या या अर्जाची नक्कीच दखल घेतल्या जाईल व मला योग्य तो न्याय मिळेल."

डॉ. अशोक अनंत न्यायाधिश, पॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे वयास ६० वर्षे पुर्ण होत असल्याने प्रचलित सेवानियमानुसार त्यांना दि. ३१/०५/२०१८ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त करण्यात आले. संस्थान व्यवस्थापनाचे कामाचे सोईचे दृष्टीने व प्रशासकीय कारणास्तव डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे मुळ पदाचे काम कायम ठेवुन सिनीअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.३१/०५/२०१८ चे मध्यान्नोत्तर पासुन पुढील आदेश होईपावेतो डॉ.सरवार यांचेकडे देणेत आला.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४०१ नुसार, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना प्रभारी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचा प्रोत्साहन भत्ता दि. ०१/०६/२०१८ पासून पुढील आदेश होईपर्यंत देण्यास मान्यता देण्यात आल्याने त्यानुसार दि.२१/०८/२०१९ रोजी आदेश पारीत करणेत आला आहे.

मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९ नुसार, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांचे रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी दि. २३/०७/२०१९ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करून दि.०२/०८/२०१९ रोजी निवड समितीसमोर वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आले. सदर वॉक इन इंटरव्युव्हमध्ये डॉ शिल्पा दशरथ सोनावणे यांची वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ या पदासाठी निवड झाल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ या पदावर नेमणूक आदेश देणेत आलेला असुन त्यानुसार त्या दि. २४/०८/२०१९ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत.

तदनंतर, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) या पदाचा दिलेला अतिरिक्त कार्यभार दि. २४/०८/२०१९ पासून संपुष्टात आणणेत येत असुन डॉ सरवार यांनी त्यांचे मुळ पदाचे म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदाचे कामकाज पहावे. डॉ सरवार यांना प्रभारी वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) पदाचा देणेत येत असलेला प्रोत्साहन भत्ता दि. २४/०८/२०१९ पासून बंद करण्यात यावा. संबंधीतांनी सदर पदाचा चार्ज देवाण-घेवाण करून चार्ज यादीची एक प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी. सदर आदेशामुळे संबंधीतांची पदावनती / पदोन्नती झाली आहे असे समजणेत येऊ नये असा आदेश दि. १९/०९/२०१९ रोजी पारीत करणेत आला आहे.

डॉ.कविता शंतनु सरवार, यांनी दि.२३.०९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये मी, डॉ.कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथॉलॉजिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल, प्रयोगशाळा विभाग सदर पत्राव्दारे माझ्याकडील सिनिअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा पदभार आज दि.२३.०९.२०१९ पासून डॉ.शिल्पा सोनवणे, सिनिअर पॅथॉलॉजिस्ट यांचेकडे सुपुर्त करत आहे, असे कळविलेले आहे.

तसेच डॉ शिल्पा सोनवणे, सिनीअर पॅथोलॉजीस्ट (कंत्राटी) यांनी दि. ०५/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"मी डॉ शिल्पा दशरथ सोनवणे, सिनिअर पॅथॉलॉजीस्ट आदेश नं ९७६ दि. १६/०८/२०१९ रोजी मिळाला असून त्या आदेशानुसार दि. २४/०८/२०१९ रोजी मी कामावर हजर झाले व माझे काम चालू केले. आदेश नं २३६ रोजी १९ सप्टेंबर २०१९ मिळाला असुन, त्या आदेशानुसार डॉ सरवार मॅडम यांनी दि. २३/०९/२०१९ रोजी चार्ज दिला असून चार्ज यादी प्राप्त नाही. तरी मी चार्ज स्विकारला असून माझे काम सुरू केले आहे."

डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट यांना सप्टेंबर २०१८ ते ऑगष्ट २०१९ या कालावधीत पॅथोलॉजीस्ट या पदाचा खालीलप्रमाणे प्रोत्साहनभत्ता आदा करणेत आलेला आहे.

| कालावधी | प्रोत्साहन भत्ता | कालावधी | प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|
| सप्टेंबर २०१८ | ११३०२९ | मार्च २०१९ | १२०५५७ |
| ऑक्टोबर २०१८ | ११५५६० | एप्रिल २०१९ | १२०८९० |
| नोव्हेंबर २०१८ | १०९५८१ | मे २०१९ | १२५७३२ |
| डिसेंबर २०१८ | ९९७२८ | जून २०१९ | ११०५४८ |
| जानेवारी २०१९ | १२२०५८ | जूलै २०१९ | १२८७०८ |
| फेब्रुवारी २०१९ | १०१२६६ | ऑगष्ट २०१९ | १०१७८१ |
| | | | **एकूण** **१३६९४३८** |

उपरोक्त प्रोत्साहन भत्याव्यतिरीक्त डॉ सरवार यांना हिस्टोपॅथोलॉजीस्ट विभागात होणा-या तपासण्यांचे खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करणेत आलेला आहे.

| कालावधी | प्रोत्साहन भत्ता | कालावधी | प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|
| सप्टेंबर २०१८ | १६१५ | मार्च २०१९ | १७२३ |
| ऑक्टोबर २०१८ | १४७७ | एप्रिल २०१९ | २१३३ |
| नोव्हेंबर २०१८ | १५३० | मे २०१९ | २२३७ |
| डिसेंबर २०१८ | २०६१ | जून २०१९ | १९०३ |
| जानेवारी २०१९ | १८४२ | जूलै २०१९ | २४४७ |
| फेब्रुवारी २०१९ | २०५७ | ऑगष्ट २०१९ | १५४९ |
| | | | **एकूण** **२२५७४** |

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत वेगवेगळे निकष व धोरण आहेत.

डॉ सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट यांचेकडे सिनीअर पॅथोलॉजीस्ट या पदाचा अतिरीक्त कार्यभार देणेत आल्याने त्यांना पॅथॉलॉजीस्ट व हिस्टोपॅथोलॉजीस्ट या दोनही पदांचा प्रोत्साहन भत्ता देणेत येत होता. मात्र आता डॉ सरवार ह्या फक्त त्यांचे मुळ पदाचे म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदाचे काम करत असुन श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता लागु असलेले प्रोत्साहन भत्याच्या निकषानुसार, हिस्टोपॅथॉलॉजी विभागात करण्यात येणा-या तपासण्यांवर डॉ सरवार यांना प्रोत्साहन भत्ता द्यावयाचे ठरल्यास प्रतिमहा सरासरी रू. १८८१/- इतका अत्यल्प प्रोत्साहन भत्ता देय होतो.

डॉ सरवार यांची शैक्षणिक पात्रता पदवीधारक एम. डी. पॅथोलॉजी आहे. डॉ. सरवार यांना दि.०१/०६/२०१८ ते दि.२३/०८/२०१९ या कालावधीतील प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

तरी, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि. १०/१०/२०१९ रोजीचे अर्जावर होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३८** **सदर विषयावर आजचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०४, निर्णय क्र.४५ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३९** **श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, स्टाफ नर्स, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.९०४७/२०१९ मधील आदेशाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती पंडीत वेरोनिका काशिनाथ या दि. ०२/०५/२००६ पासून परिचारीका या पदावर संस्थान सेवेत होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५१ नुसार दि. ०९/०६/२०११ रोजीच्या आदेशान्वये कु. पंडीत यांचे नांव दि. १३/०६/२०११ पासून संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुद्ध श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, बडतर्फ परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध मा. कामगार न्यायालय अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ दि. ०८/०४/२०१५ रोजी दाखल केलेली होती. त्यात दि. २६/०६/२०१८ रोजी न्यायनिवाडा केला आहे.

अॅड. अशोक पाटील, अ.नगर यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार, मा. कामगार न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दाखल करण्यात आली होती. त्यात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यानी दि. १६/१०/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

12. When the Labour Court delivered the impugned judgment, the respondent was said to have undertaken fresh employment with another organization. No litigant is expected to starve during the period of unemployment. If an alternate employment is taken up, the law is settled that backwages can be deprived. If the respondent does not desire to join duties pursuant to the judgment and award of the Labour Court, it would be a different situation which can be dealt with by the petitioner / Management on its own merits. Refusing continuity of service merely because a terminated employee undertakes an alternate employment for keeping his or her mind, body and soul together, would not disentitle her from continuity in service.

13. In view of the above, I do not find that the impugned judgment and award could be termed as being perverse or erroneous. This petition, being devoid of merit is, therefore, dismissed.

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. १५/०६/२०१८ रोजी १. आरोग्य शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २. एम.यु.एच.एस., नाशिक, ३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई, ४. शिवा ट्रस्ट, औरंगाबाद, ५. सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर, ६. साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपुर यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ६३३२/२०१८ दाखल केली असुन रीट मेमोतील परिच्छेद क्र. ०९ मध्ये एका ठिकाणी Petitioner has completed her B.S.C. Nursing in the year 2007 and joined as a Tutor / Clinical Instructor from academic year 2007 with respondent No. 5. She was there till the year 2010 and thereafter petitioner joined the post Graduate course in the yar education year 2010 for M.S.C. Nursing. For ready reference hereto annexed and marked as ANNEXURE – B is the copy of experience certificate dated 30.07.2010 issued by respondent No. 5. असे नमुद केले आहे. श्रीमती पंडीत यांनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध दाखल केलेल्या रीट पिटीशन मध्ये त्या सन २००७ पासुन सन २०१० पर्यंत ट्युटर / क्लिनीकल इंस्ट्रक्टर या पदावर सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर येथे कार्यरत होत्या, हे त्यांनी मान्य केलेले आहे. याचा अर्थ त्यांनी संस्थान रुग्णालयात नोकरीत असताना संस्थानची फसवणुक करुन दुस-या संस्थेत नोकरी केलेली आहे.

श्रीमती पंडीत यांना दि. १३/०६/२०११ रोजी वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/-, ग्रेड पे रु. ४,२०० नुसार वेतन देण्यात येत होते. मा. कामगार न्यायालय अहमदनगर रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ मधील दि. २६/०६/२०१८ रोजीचा न्यायनिवाडा व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत

यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासून पुढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत तसेच सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना, दुस-या संस्थेत नोकरी केल्याबाबत विचारात घेऊन निर्णय घेणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर विषय नं. ४०, निर्णय क्र. ७६७ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रिट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासुन पेढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेले शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पुर्ववत कामावर हजर करुन घेण्यात यावे, असे ठरले.

तसेच श्रीमती पंडीत यानी सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना दुस-या संस्थेत नोकरी केलेबद्दल त्यांचेविरुद्ध करावयाच्या कायदेशीर कारवाईबाबत संस्थानचे वकीलांचा सल्ला घेऊन सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन सभेसमोर सादर करावा." असा निर्णय पारीत करण्यात आला आहे.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे दि. ०७/०१/२०१९ रोजीचे आदेशान्वये श्रीमती वेरोनिका पंडीत यांना दि. १०/०१/२०१९ पासुन कामावर हजर करुन घेणेत आलेले आहे.

त्यानंतर श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी संस्थान विरुध्द रिट पिटीशन क्र. ९०४७/२०१९ दाखल केले त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

**A]** By issuing appropriate writ, order, direction or any other appropriate order in nature of writ, Hon'ble High Court may be pleased to quash and set aside Award dated 26.6.2018 passed by Learned IInd Labour Court Ahmednagar in Reference (IDA) No. 61/2014 only to the extent of refusal of back wages and consequential benefits.

**B]** By issuing appropriate writ, order, direction or any other appropriate order in nature of writ, Hon'ble High Court may be pleased to grant back wages and consequential benefits to petitioner.

**C]** Pending hearing and final disposal of present writ petition, the Hon'ble High Court may be pleased to direct respondent to pay petitioner at par with other similarly situated employee.

**D]** Ad-interim relief in terms of prayer clause "C" above may kindly be granted in favour of petitioner.

**E]** Any other just and equitable relief to which the petitioner may be found entitled, may kindly be granted.

उपरोक्त केसमध्ये संस्थानचे वतीने ॲड. नितीन भवर, ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी कामकाज केले आहे. सदर रिट पिटीशन दि. २६/०७/२०१९ रोजी डिस्पोस्ड केले असुन खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**12.** In my view, unless there are specific reasons for denying consequential benefits the court should assess all factors before coming to assess all factors before coming to a conclusion either of granting or refusing to grant consequential benefits. There are instances of such orders which have come before this Court. Wherein, invariably the Labour Court / Industrial Courts have filed to use the words consequential benefits or benefits incidential thereto and consequential thereto I do not find any specific reason assingedby the labour court in the impugned award, while refusing consequential benefits.

**13.** Learned Advocate for the petitioner submits, on instructions that, the petitioner is satisfied if her basic wages ar placed with Mrs. Bramhane, since her grande pay is

maintained with Mrs. Bramhane and in fact her dearness allowance is slightly lesser than the dearness allowance being paid to Mrs. Bhamhane. She does not desire any other quantum of difference of wages.

**14.** Considering all the above factors. I deem it appropriate to conclude that, this petition derserves to be partly allowed so as to grant consequential benefits to the petitioner along with reinstatement and continuity of service.

**15.** It is clarified that, such consequential benefits would be payable by way of difference in the basic pay from 10.01.2019 by equating the petitioner with Mrs. Brahmane.

**16.** Since the issue of grant of consequential benefits has been raised in the petition and as I have conclude that every labour / industrial court needs to consider this aspect for grant of consequential benefits, depending upon attending circumstances, the learned Registrar (judicial) of this Court shall circulate this order to all the learned judges / presiding officers in the Labour Courts / Industrial Courts and Tribunals in the State of Maharashtra.

**17.** This petition is therefore, partly allowed. Clause (3) of the order impugned order shall stand modified and shall read as under :-

"The First party is directed to reinstate the Second Party in service with continuity of service w.e.f. 13.06.2011 and with consequential benefits from 10.01.2019, without back wages for the period 13.6.2011 till 16.10.2018, after which the back wages have been paid to the petitioner."

**18.** Rule is made partly absolute in these terms.

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दि. १३/०८/२०१९ रोजीचा याचिका क्रमांक ९०४७/२०१९ मा. औरंगाबाद खंडपीठ आदेश दि. २६.०७.२०१९ बाबत खालीलप्रमाणे अर्ज सादर केलेला आहे –

मी आपल्याकडे दिनांक २२.०४.२००६ पासुन परीचारीका या म्हणून सेवेत लागले. दिनांक १३.०६.२०११ पासुन कमी केल्याने रेफरन्स (आयडीए) क्र. ६१/२०१४ नुसार मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांच्याकडे मी विवाद उपस्थित केला. दिनांक २६.६.२०१८ च्या निवाड्याने मा. कामगार न्यायालयाने मला कमी करण्याविषयक बेकायदेशीर, अयोग्य ठरवुन रद्द करण्याचे आदेश केले. त्याबाबत आपण केलेली याचिका क्रमांक ११४६३/२०१८ मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६.१०.२०१८ च्या आदेशाने फेटाळली मा. कामगार न्यायालयाचा निवाडा कायम केला. मला आपण निवाड्यानुसार, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवेत हजर करुन घेतले परंतु मधील काळातील वेतनवाढी व फायदे न दिल्याने मी याचिका क्र. ९०४७/२०१९ मा. उच्च न्यायालयाकडे दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने याचिकेच्या कामी दि. २६.०७.२०१९ चे सोबतचे आदेश केलेले आहेत.

सोबतचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश पाहता,मला दिनांक १३/०६/२०११ ते दि. १६/१०/२०१८ या काळातील वार्षिक वेतनवाढी आणि वेतननिश्चिती देणे आवश्यक आहे. त्यानुसार मला दिनांक १०/०१/२०१९ पासुन वेतननिश्चिती व फरक मिळावा. तसेच पुढील वेतन सोबतच्या आदेशानुसार मिळावे, आदेश अंमलबजावणी व्हावी ही विनंती. असा अर्ज श्रीमती पंडीत, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी यांनी केलेला आहे.

ॲड. नितीन भवर, औरंगाबाद यांनी या रीट पिटीशनमध्ये संस्थानचे वतीने कामकाज केलेले असल्याने दि. २४/०९/२०१९ चे पत्रान्वये ॲड. नितीन भवर यांचेकडून श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची या संदर्भात काल्पनिक वेतनवाढ गृहीत धरुन वेतननिश्चिती करावी किंवा कसे?" तसेच या बाबत निकालानुसार अभिप्राय मागविण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन ॲड. नितीन भवर यांनी दि. ०५/१०/२०१९ खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे –

With reference to the subject cited above, I have to state that, I have gone through the Writ Petition No.11463/2018 filed by Shri Saibaba Sansthan Trust, Writ Petition No.9047/2019

& Reference (IDA) No.61/2014 filed by Smt. Veronika Pandit and the judgment & order dated 26.02.2018 passed by the Labour Court at Ahmednagar etc. and the order dated 26.07.2019 passed by the Hon'ble High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad in Writ Petition NO.9047/2019 carefully and on understanding the same, I giving my legal opinion as follows-

1. As you know that, Smt. Veronika Kashinath Pandit was working as Staff Nurse in the Hospital run by Shri Saibaba Sansthan Trust for the period from 13.06.2011. On 09.06.2011 the Managing Committee of Shri Saibaba Sansthan Trust adopted a Resolution No.09.06.2011 for terminating the services of Smt. Veronika Kashinath Pandit and in pursuance of the said Resolution Smt. Veronika Kashinath Pandit was terminated w.e.f. 13.06.2011. The said termination order was challenged by Smt. Veronika Kashinath Pandit by filing Reference (IDA) No.61/2014 before the Labour Court at Ahmednagar. However, the Learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar passed his judgment & award on 26.06.2018 partly answering the Reference (I.D.A.) No.61/2014 in affirmative holding the termination of Smt. Veronika Kashinath Pandit is illegal, improper. The Learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar also directed Shri Saibaba Sansthan Trust to reinstate Smt. Veronika Kashinath Pandit in services with continuity of services w.e.f. 13.06.2011, but without back wages. Thereafter, Shri Saibaba Sansthan Trust filed Writ Petition No.11463/2018 in the Hon'ble High Court, challenging the judgment & order dated 26.06.2018. During course of hearing on Writ Petition No.11463/2018, it was came to the knowledge that, Smt. Veronika Kashinath Pandit filed Writ Petition No.9047/2019 before the Division Bench of the Hon'ble High Court challenging the Clause No.3 of the judgment & award dated 26.06.2018, by which the 2nd Labour Court at Ahmednagar has declined back wages to her. The Hon'ble High Court vide order dated 26.07.2019 disposed of the Writ Petition No.9047/2019 modifying the Clause (3) of the judgment & award dated 26.06.2018 and making Rule partly absolute.

2. Therefore, Smt. Veronika Kashinath Pandit has been granted relief of continuity in service w.e.f. 13.06.2011, but without back wages for the period from 13.06.2011 to 16.10.2018. Hence, as per my view and legal opinion, basic pay scale in respect of Smt. Veronika Kashinath Pandit shall be fixed equating her with Mrs. Bhamhane w.e.f. 10.01.2019 and Smt. Veronika Kashinath Pandit be paid consequently benefits by way of difference in the basic pay only from 10.01.2019.

श्रीमती मिना राजेंद्र ब्राम्हणे, स्टाफनर्स, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे सन २०११ पासुनचे वेतन खालीलप्रमाणे आहे –

| अ.नं | मुळ वेतन | ग्रेड पे | वार्षिक पगारवाढ | सुधारीत मुळवेतन | लागु दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९,३०० | ४२०० | ४१० | ९,७१० | ०१/०७/२०१० |
| २. | ९,७१० | ४२०० | ४२० | १०,१३० | ०१/०७/२०११ |
| ३. | १०,१३० | ४२०० | ४३० | १०,५६० | ०१/०७/२०१२ |
| ४. | १०,५६० | ४२०० | ४५० | ११,०१० | ०१/०७/२०१३ |
| ५. | ११,०१० | ४२०० | ४६० | ११,४७० | ०१/०७/२०१४ |
| ६. | ११,४७० | ४२०० | ४७० | ११,९४० | ०१/०७/२०१५ |

दि. ०१/०१/२०१६ रोजीचे सहाव्या वेतन आयोगातील मुळ वेतन रु. ११,९४० + ग्रेड पे- ४२०० x २.५७ = ४१,४८० नुसार सातव्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्स एस -१३ (रु. ३५४००-११२४००) मधील वेतन स्तर एल ७ नुसार मुळ वेतन रु. ४२,३०० वेतन निश्चित करुन पुढील सुधारीत मुळ वेतन खालीलप्रमाणे देणेत येत आहे.

| अ.नं | मुळ वेतन | सुधारीत मुळवेतन | लागु दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ४२,३०० | ४३,६०० | ०१/०७/२०१६ |
| २. | ४३,६०० | ४४,९०० | ०१/०७/२०१७ |
| ३. | ४४,९०० | ४६,२०० | ०१/०७/२०१८ |
| ४. | ४६,२०० | ४६,२०० | १०/०१/२०१९ |
| ५. | ४६,२०० | ४७,६०० | ०१/०७/२०१९ |

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद रीट पिटीशन नं. ९०४७/२०१९ मधील दि. २६/०७/२०१९ रोजीचे आदेशानुसार दि.१३/०६/२०११ ते दि. १६/१०/२०१८ पर्यंत सलग सेवा धरणेत येईल. परंतु या कालावधीतील वेतन अनुज्ञेय असणार नाही. तसेच या आदेशात नमुद केलेप्रमाणे श्रीमती मिना राजेंद्र ब्राम्हणे, स्टाफनर्स, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना सध्या देण्यात येत असलेले वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे श्रीमती वेरोनिका पंडीत यांना दि.१०/०१/२०१९ रोजी पासुन वेतन निश्चित करुन फरकासहीत अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करुन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- १) मा. व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३५७.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांचा प्र वैद्यकिय संचालक यांनी आढावा घेऊन, आवश्यक पदे जाहिरातीद्वारे ११ महिने कालावधीसाठी अथवा स्थायी स्वरूपात नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या (मुळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + एनपीए) जवळपासचे मानधनावर कंत्राटी पध्दतीने घेणेस व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मा. डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांनी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागणविणेत येऊन, पात्र अर्जदारांच्या Walk-in-Interview घेण्यात याव्यात. यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करणेत आली. १) मा कार्यकारी अधिकारी २) उपकार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका. या निवड समितीने Walk-in-Interview मध्ये पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी जाहीर करावी. त्यानंतर या निवड यादीवर हरकती मागविणेत याव्यात व हरकती विचारात घेऊन नेमणूक आदेश देण्यात यावे. याचबरोबर श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील वैद्यकिय प्रशासनातील पदे (वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक इ.) स्थायी स्वरूपात स्वतंत्र जाहिरातीद्वारे भरणेत यावीत, असे ठरले.

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेकामी दि. २०/०६/२०१७ रोजी घेणेत आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली. तसेच ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झालेले नाही अथवा ज्या पदावर नेमणूक आदेश देऊनही उमेदवार हजर झालेले नाहीत अथवा आकृतीबंधास अनुसरून, वैद्यकीय अधिका-यांच्या इतरही रिक्त जागा भरणेची आवश्यकता आहे, अशा पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील पदे प्राधान्याने भरावीत, असे ठरले.

३) मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांचे रिक्त पदे भरणेकामी दैनिक वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, तसेच उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनीधी, वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांची समिती गठीत करण्यात येऊन, या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देण्यात यावे, असे ठरले. तसेच फिजिशियन या पदासाठी जाहिराती व्यतिरिक्त इतर वेळेस उमेदवाराने अर्ज केल्यास पात्र उमेदवारास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन थेट नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

४) मा व्यवस्थान समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३६८.

श्री साईनाथ रूग्णालयातील फिजिशियन या महत्वाच्या पदावर अकरा महिने अथवा व्हिजीटींग पध्दतीने इच्छुक उमेदवार आल्यास सेवाप्रवेश नियम, मानधन व प्रोत्साहन भत्ता बाबतचा नियम शिथील करून फक्त फिजिशियन या पदाकरीताच डॉक्टर मिळत नसलेमुळे विशेष बाब म्हणून एकुण रक्कम रू.२,०१,०००/- अक्षरी रू. दोन लाख एक हजार रूपये मात्र इतके मानधन देऊन नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ह्दयरोग, मेंदूरोग, आर्थोपेडीक सर्जरी, जनरल सर्जरी, मेडीसीन, सोनोग्राफी, रेडीओलॉजी इ. विभाग सुरू आहेत. तसेच शासनाची महात्मा ज्योतीबा फुले ही स्कीमही सुरू असुन सदर स्कीमद्वारे ऑपरेशन करणेकरीता रूग्ण दुरहुन येत असतात. तसेच श्री साईनाथ रूग्णालयात मेडीसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडीक सर्जरी, स्कीन, सोनोग्राफी, ईएनटी, बालरोग विभाग इ. विभाग सुरू आहेत. श्री साईनाथ रूग्णालयात आलेल्या सर्व रूग्णांचे रूग्णालयात सुविधा उपलब्ध असलेल्या सर्व रोगांवर मोफत उपचार केले जातात. नगर-मनमाड रोडवर संस्थान रूग्णालयासारखे मोठे अद्यावत दुसरे रूग्णालय नसल्याने तसेच साईबाबांचे विश्वासाने रूग्ण उपचारासाठी संस्थानचे दोन्ही रूग्णालयात दुरहुन येत असतात. दोन्ही रूग्णालयास २०० खाटांची मंजुरी होती. आता दोन्ही रूग्णालयास ३०० खाटांची परवानगी मिळालेली असुन त्यानुसार खाटा वाढविलेल्या आहेत.

यापुर्वी मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९ नुसार, दि. २३/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून दि. ०२/०८/२०१९ रोजी घेतलेल्या मुलाखतीतुन १४ उमेदवारांची निवड करणेत आली होती (सोबत निवड यादी जोडलेली आहे). त्यानुसार त्यांना नेमणूक आदेश देणेत आले आहेत. १४ पैकी १० उमेदवार कामावर हजर झाले असुन त्यातील एक उमेदवाराचा राजीनामा मंजुर झाल्याने सध्या ९ उमेदवार कामावर आहेत.

दि. ०२/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीस अनुसरून महाराष्ट्र शासन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र, अहमदनगर यांचे दि. २३/०७/२०१९ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

सेवायोजन कार्यालये रिक्त पदे अधिसूचित करण्यास सक्ती करणारा कायदा १९५९ आणि सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र संकिर्ण १००३/प्रक्र-९६/२००३/१३-अ दि. १९/११/२००३ चे परिपत्रकातील मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयान्वये पदे भरताना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडून यादी घ्यावी तसेच सर्व प्रसार माध्यमातून प्रसिध्दी देवून विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी असे नमूद केलेले आहे. या विभागाच्या देण्यात येणा-या सर्व सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध असल्याने रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांची यादी ऑनलाईन वेबद्वारे घेण्याची सुविधा एप्लॉयरला (नियोक्ते उद्योजक) यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आपल्या आस्थापनेला दिलेला गोपनिय पासवर्ड या कार्यालयास वापरता येत नाही म्हणून या कार्यालयाच्या स्तरावर उमेदवारांच्या याद्या जनरेट करता येत नाहीत. तसेच ऑनलाईन वेबद्वारे उमेदवाराची यादी डाऊनलोड करून घेण्याची पध्दती सोबत देण्यात येत आहे. यासाठी स्वता एम्प्लॉयरने

पोर्टलवर रजिस्टर होणे आवश्यक आहे. तथापि ज्या एम्प्लॉयरने आपला युजर आयडी व पासवर्ड तयार केला असेल, किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्राकडून नवीन युजरआयडी व पासवर्ड मिळाला असेल, त्यांनी पुन्हा रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता नाही. तरी www.mahaswayam.gov.in या वेबसाईटवरून पदभरतीच्या पात्र उमेदवारांच्या याद्या डाऊनलोड करून घेण्यात याव्यात व यादीतील उमेदवारांना मुलाखतीची संधी देण्यात यावी व भरती प्रक्रियेत समावेश करून घेण्यात यावे. व हजर झालेल्या उमेदवाराची यादी या कार्यालयास तात्काळ पाठवावी या कार्यालयामार्फत शासनास जिल्ह्यामध्ये रोजगार प्राप्त झाल्याची माहिती देण्यात येत असते. याबाबत काही अडचणी आल्यास या कार्यालयाशी प्रत्यक्ष भेट देवून संपर्क साधावा. सदर पत्रासोबत www.mahaswayam.gov.in या वेबसाईटवरून शासकीय व खाजगी आस्थापनांना त्यांच्या आस्थापनेमध्ये भरती करण्यासाठी उमेदवारांच्या याद्या जनरेट करण्याची पध्दत दिलेली आहे.

आता, प्र वैद्यकीय संचालक व प्र वैद्यकीय अधिक्षीका यांचे सुचनेनुसार परिशिष्ट क्र १ मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल ३२ व श्री साईनाथ रूग्णालय १३ अशी एकुण ४५ रिक्त पदे भरणेची आवश्यकता आहे.

१. परिशिष्ट क्र १ मधील अ.नं ०१ (बालरोग तज्ञ) हे पद श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात मंजुर आहेत. मात्र संबंधीत विभाग फक्त श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत असल्याने सदर पदांवरील नेमणूक श्री साईनाथ रूग्णालयात करता येईल.

**२.** परिशिष्ट क्र १ मधील अ.नं ०६ (अतिदक्षता तज्ञ) हे पद श्री साईनाथ रूग्णालयाचे आकृतीबंधात मंजुर नसल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधातील मंजुरीनुसार १ कनिष्ठ अतिदक्षता तज्ञाची श्री साईनाथ रूग्णालयात नेमणूक करता येईल.

निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक देऊन आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे सहाव्या वेतन आयोगानुसार (मुळ वेतन+महागाई भत्ता+एनपीए) मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता ज्या रूग्णालयात नेमणूक दिली जाईल त्याप्रमाणे देता येईल.

श्री साईनाथ रूग्णालयामध्ये फिजिशियन या पदावर हजर होणा-या उमेदवारास मा व्यवस्थान समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३६८ नुसार, रक्कम रू.२,०१,०००/- अक्षरी रू. दोन लाख एक हजार रूपये मात्र इतके मासिक मानधन देता येईल. तसेच, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील फिजिशियन या पदावर हजर होणा-या उमेदवारास मा व्यवस्थान समिती दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४२६ नुसार, प्रतिमहा रू.२,०१,०००/- एकत्रित मानधन तसेच मा व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

मुलाखतीकरीता खालील निकषानुसार उमेदवारांचे गुणांकन करता येईल.

| Sr no | Details | MBBS Qualification | Diploma / Degree qualification | Superspeciality qualification |
|---|---|---|---|---|
| 01 | All years of MBBS exam aggregate average marks | 60% (Maximum 60 marks) | NA | NA |
| 02 | Diploma / Degree exam average marks | NA | 60% (Maximum 60 marks) | NA |
| 03 | Superspeciality exam average marks | NA | NA | 60% (Maximum 60 marks) |
| 04 | Contractual Medical Officer or bonded Service in government | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks |
| 05 | If not in government service then after passing MBBS / | Per year 2 marks, maximum 20 marks. | Per year 2 marks, maximum 20 marks. | Per year 2 marks, maximum 20 marks. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Dip/Degree total no of years | | | |
| | **Total Marks** | **100** | **100** | **100** |

डीएनबी सुपरस्पेशालिटी व जनरल स्पेशालिटी या कोर्सेसचे गुणपत्रक देण्यात येत नसुन फक्त पासिंग सर्टिफिकेट देण्यात येते. त्यामुळे डीएनबी या शैक्षणिक पात्रतेकरीता ६० पैकी ३६ गुण ग्राह्य धरण्यात धरता येईल. श्री साईबाबा रूग्णालय व श्री साईनाथ रूग्णालयाचा अनुभव हा शासनाकडील वैद्यकीय अधिकारी यांच्या अनुभवाच्या बरोबर ग्राह्य धरता येईल.

विभागाचा अभिप्राय-

१) संस्थानचे रूग्णालयात आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी परिशिष्ट १ मधील स्तंभ क्र ०८ मध्ये दर्शविलेनुसार भरावयाचे पदांची विस्तृत जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल व संक्षिप्त स्वरूपात जाहिरात (इंग्रजी व मराठी भाषेत) दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करता येईल.

२) महाराष्ट्र शासन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र, अहमदनगरचे www.mahaswayam.gov.in या वेबसाईटवरून पदभरतीच्या पात्र उमेदवारांच्या याद्या डाऊनलोड करणेस व यादीतील उमेदवारांना मुलाखतीची संधी देणेस व भरती प्रक्रियेत समावेश करणेस तसेच हजर झालेल्या उमेदवाराची यादी रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र, अहमदनगर यांचे कार्यालयास कळविता येईल.

३) उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मुलाखतीकरीता निकषानुसार उमेदवारांचे गुणांकन करता येईल.

४) जाहीरातीस अनुसरून आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी १) मुख्य कार्यकारी अधिकारी २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका यांची समिती गठीत करता येईल. गठीत केलेल्या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देता येईल.

तरी, उपरोक्त १ ते ४ प्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.४०** **यावर सविस्तर चर्चा झाली तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की सदरची पदे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक आहेत. त्याकरीता वैद्यकीय अधिकाऱ्यांची खालील प्रमाणे रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करुन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेस मान्यता देण्यात आली.**

| **श्री साईबाबा हॉस्पिटल** | | |
|---|---|---|
| **अ.नं.** | **पदाचे नाव** | **भरावयाची पदे** |
| **०१** | **Paediatrician,**<br>**बालरोग तज्ञ** | **०३** |
| **०२** | **Senior Anesthesiologist**<br>**वरीष्ठ भुलतज्ञ** | **०२** |
| **०३** | **Junior Radiologist**<br>**कनिष्ठ क्ष-किरण शास्तज्ञ** | **०१** |
| **०४** | **Casualty Medical Officer**<br>**अपघात कक्ष** | **०४** |
| **०५** | **R.M.O.**<br>**निवासी वैद्यकीय अधिकारी** | **१४** |
| **श्री साईनाथ रुग्णालय** | | |
| **०१** | **Medical Officer (Physician)**<br>**मेडिकल ऑफिसर (फिजिशियन)** | **०१** |
| **०२** | **Medical Officer (Anesthesia)**<br>**मेडिकल ऑफीसर (भुलतज्ञ)** | **०१** |

| | | |
|---|---|---|
| ०३ | **Medical Officer (Sonologist)**<br>**मेडिकल ऑफीसर (सोनोलॉजिस्ट)** | ०१ |
| ०४ | **Casualty Medical Officer (CMO)**<br>**कॅज्युअल्टी मेडिकल ऑफीसर** | ०२ |
| ०५ | **Resident Medical Officer (RMO)**<br>**रेसिडेंट मेडिकल ऑफीसर** | ०५ |

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४१** **सन २०२०-२१ करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षिक किराणा माल व अनुषंगीक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी भांडार विभागाकडून संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२०-२१ करीता आवश्यक किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी जा.नं. एसएसएस/भांडार/१६७६/२०१९, दि.१८.१२.२०१९ रोजीचे परिपत्रकान्वये संबंधीत विभागांकडून वार्षीक मागणीपत्रे मागविण्यात आली होती. यामध्ये प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मीती व मंदिर विभागाकडून प्राप्त झालेली मागणीपत्रके एकत्रित करणेत आली आहे. तसेच इंस्टिमेटेड कॉस्ट काढणेकामी ३-४ पुरवठाधारकांकडून ई-मेलद्वारे दर घेण्यात येवून सदर दरांची सरासरी काढण्यात आलेली आहे. सदर सरासरी दरानुसार Item wise अंदाजे दर निश्चित केले आहेत. सदर अंदाजे दर व निश्चित केलेली मागणी परिमाण विचारात घेवून यासाठी येणारा अंदाजे खर्च निश्चित केला आहे. त्याबाबतचे सविस्तर परिशिष्ट सोबत सादर केलेले आहे.

श्री साई प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर या विभागांनी कळविलेल्या मागणीपत्रकानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता किराणा माल व अनुषंगिक साहित्यचे खरेदीकामी एकूण अंदाजे रक्कम रूपये ४२,१८,८२,४१६.८५ (अक्षरी रुपये बेचाळीस कोटी अठरा लाख ब्याऐंशी हजार चारशे सोळा रुपये आणि पंच्याऐंशी पैसे मात्र) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्रायः- सन २०१९-२० वर्षाकरीता किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी दिलेले पुरवठा आदेशांची मुदत दि.३१.०३.२०२० अखेर संपत आहे, त्यामुळे सन २०२०-२१ चे खरेदीकामी वरील खर्चास मान्यता मिळणे गरजेचे आहे.

तरी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती, कॅन्टीन व मंदिर या विभागांसाठी आवश्यक किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४२,१८,८२,४१७/- (अक्षरी रुपये बेचाळीस कोटी अठरा लाख ब्याऐंशी हजार चारशे सतरा मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन तदर्थ समितीचे सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**निर्णय क्र.४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षिक किराणा माल व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४२,१८,८२,४१७/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-भांडार विभाग/विधी विभाग)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१**

**निर्णय क्र.४२** **दि.०४.१२.२०१९ रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेत विषय नं.५४- बुंदी प्रसादाची प्रत (क्वालीटी) सुधारणेसाठी करावयाच्या उपाय योजनेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.५३३- यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन रांगेमध्ये मोफत वाटप होणारा चांगल्या दर्जाचा बुंदी प्रसादाचा लाभ भाविकांना मिळावा याकरीता A Unit of the Original Bikaner**

**Sweets & Namkeen चे मालक श्री.मगाराम व्हि.चौधरी यांना त्यांनी तयार केलेल्या बुंदीच्या नमुन्यासह तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे,असा झालेला आहे.**

**त्यानुसार A Unit of the Original Bikaner Sweets & Namkeen चे मालक श्री.मगाराम व्हि.चौधरी हे त्यांनी तयार केलेल्या बुंदीच्या नमुन्यासह मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेशी बुंदी तयार करण्याच्या कार्यपध्दतीवर सविस्तर चर्चा केली. तसेच संस्थानकडे केलेल्या अर्जाबाबत विचारणा केली असता त्यांनी स्वत:हुन अर्ज केल्याचे सांगीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अशा प्रकारे साईभक्त विनामुल्य सेवा देण्यास तयार असल्यास नोटीसबोर्ड वर प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२**
**निर्णय क्र.४३** **दि.०४.१२.२०१९ रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेत विषय नं.८८- श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser या मशिनकरीता लागणारे लॅब केमीकल्स खरेदीबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.५६७- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser या मशिनकरीता लागणारे लॅब केमीकल्स ही शासन खरेदी नियमावलीतील परिच्छेद ३.२.६- एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करावयाचे असल्याने सदर लॅब केमीकल्सचे पुरवठा धारक M/s. Roche Diagnostics India Pvt.Ltd.,Mumbai यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.**

**त्यानुसार सदर लॅब केमीकल्सचे पुरवठाधारक M/s. Roche Diagnostics India Pvt.Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधी आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरांबाबत चर्चा असता त्यांनी दरांमध्ये खालील प्रमाणे सवलत देऊ केली.**

**Purchase of Monopoly Laboratory Chemicals for Fully Automatic Blood Gas Analyser**
**M/s. Roche Diagnostics India Pvt.Ltd., Mumbai**

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate (Rs.) | GST % | Rate Incl. GST% | New Rate Incl. GST% | Rate after Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | S1 Rinse Solution | 1 | 10000.00 | 18% | 11800.00 | 11800.00 | 11800/- |
| 2 | S2 Fluid Pack | 1 | 24700.00 | 12% | 27664.00 | 27664.00 | 27664/- |
| 3 | S3 Fluid Pack | 1 | 18200.00 | 12% | 20384.00 | 20384.00 | 5% less |
| 4 | MSS Cassette (Glu/Lac /Urea) | 1 | 5000.00 | 18% | 5900.00 | 5900.00 | 2. 5% less |
| 5 | Printer Paper OMNI/ OMNI S (Pack of 6 PC) | 1 | 1800.00 | 12% | 2016.00 | 2016.00 | 2.5% less |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Blood Gas Analyser या मशिनकरीता लागणारे लॅब केमीकल्स खरेदी करणेकामी M/s. Roche Diagnostics India Pvt.Ltd., Mumbai यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल करीता प्रत्येकी एक याप्रमाणे दोन नग कंपनीने देऊ केलेले मॉडेल Cobas 221 Fully Automatic Blood Gas Analyser Machine Standby ठेवणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे करनिर्धारण आदेशापोटी कमिशनर अपील व अनुषंगीक न्यायालयीन कामकाजास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपायुक्त, आयकर विभाग मुंबई यांनी करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे करनिर्धारण करुन दि.३०.१२.२०१९ रोजी करनिर्धारण आदेश No.ITBA/AST/S/143(3)/2019-20/1023477511(1) अन्वये रु.५८,४५,८१,७००/-देय कर ३० दिवसांचे आत शासन खाती भरणेबाबत कळविले आहे. यामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी धर्मादाय ट्रस्ट गृहीत धरुन मंदिर परिसरातील दक्षिणापेटीमध्ये प्राप्त झालेल्या देणगीवर आयकर आकारणी केली आहे.

संस्थानचे आयकर व न्यायालयीन संबंधीत कामकाज करणारे संस्थान नियुक्त कर सल्लागार मे.आर.आर. मुनी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट, मुंबई,ज्येष्ठ सीए दिपक टिकेकर, मे.व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई, व सेवा निवृत्त प्रिन्सीपल कमीशनर, आयकर विभागश्री.एस.डी. श्रीवास्तव, दिल्ली, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली व मे.जुन्नारकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचे सर्वानुमते करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे आयकर निर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे अपील दाखल करणे व अपील करिता देय होणारी २०% रक्कम भरण्यास सुट मिळण्याकरीता मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे अपीलसुनावणी होईपर्यंत स्थगिती असलेबाबत संदर्भ देऊन आयकर विभागाकडे Stay Petition अर्ज दाखल करावा लागेल. तसेच आवश्यकतेनुसार मा.न्यायालयांकडे रिट अर्ज दाखल करावे लागतील.

तरी करनिर्धारण वर्ष २०१७-१८ चे दि.३०.१२.२०१९ रोजीचे करनिर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे संस्थान नियुक्त लेखापरिक्षक, कर सल्लागार यांचेमार्फत अपील कार्यवाही करण्यास व त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे न्यायालयीन कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आयकर व न्यायालयीन संबंधीत कामकाज करणारे संस्थान नियुक्त कर सल्लागार मे.आर.आर. मुनी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट, मुंबई व मे.व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांचेमार्फत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे आयकर विभागाकडे अपिल दाखल करण्यास व त्यासाठी येणाऱ्या अनुशंगीक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करणेसाठी विधिज्ञांचे पॅनल तयार करणेसाठी दरपत्रके मागविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **हिस्टोपॅथोलॉजीस्ट पदाला फिक्स इन्सेन्टीव्ह मिळण्याबाबतचे डॉ कविता सरवार यांचे दि. १०/१०/२०१९ रोजीचे अर्जाबाबत व अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांचे कक्षातील दि. १६/१२/२०१९ रोजी झालेल्या सुनावणी इतिवृत्तानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र –**

मा व्यवस्थापन समिती दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८६८.

श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णांना विनामुल्य रूग्णसेवा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे या रूग्णालयामध्ये रूग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रूग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांच्या रूग्णांच्या बिलाच्या रकमेतून इन्सेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रूग्णालयाशी तुलना करून श्री साईनाथ रूग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेंटीव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेंटीव्ह लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रू. १२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मंजुरी घेण्यात येऊन, त्यानंतर सदरहू इन्सेंटीव्ह संबंधीतांना आदा करणेत यावा. तसेच नव्याने भरती होणा-या स्थायी मानधनावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात

नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इन्सेंटीव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

शासन निर्णय- शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि. २७/०६/२०१८-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टर्सना मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता (Incentives) मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रूग्णालयांतील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) दोन्ही रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबतची नियमावली / अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्याचे दर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात यावेत.

मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-

१) मा व्यवस्थापन समिती दि. २३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८६८.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णांना विनामुल्य रूग्णसेवा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे या रूग्णालयामध्ये रूग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रूग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना रूग्णांच्या बिलात रकमेतून इन्सेंन्टीव देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रूग्णालयाशी तुलना करून श्री साईनाथ रूग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेंन्टीव लागु करणेत यावा. हा इन्सेंन्टीव लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रू. १२ लाख मात्र आर्थीक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच नव्याने भरती होणा-या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इन्सेंन्टीव लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंन्टीवमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांचे रिक्त पदे भरणेकामी दैनिक वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, तसेच उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनीधी, वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांची समिती गठीत करण्यात येऊन, या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देण्यात यावे, असे ठरले. तसेच फिजिशियन या पदासाठी जाहिराती व्यतिरीक्त इतर वेळेस उमेदवाराने अर्ज केल्यास पात्र उमेदवारास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन थेट नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४०१.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना प्रभारी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचा प्रोत्साहन भत्ता दि. ०१/०६/२०१८ पासून पुढील आदेश होईपर्यंत देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा पॅथॉलॉजीस्ट पदाला इन्सेन्टीव्ह मिळण्याबाबतचा दि. १०/१०/२०१९ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"मी दि. ०१/०९/२०१५ पासुन साईबाबा हॉस्पिटल श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे कायम कर्मचारी तज्ञ डॉक्टर म्हणून कार्यरत आहे. मी दि. ०१/०९/२०१५ ते दि. ०२/१०/२०१६ पर्यंत ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट या पदावर काम केले आहे तर दि. ०३/१०/२०१६ पासून मी हिस्टोपॅथोलॉजीस्ट (सिनीअर पद) या पदावर काम करत आहे. नमूद करू इच्छिते की साईबाबा हॉस्पिटलमधील २ पदे वगळता, ज्युनिअर

पॅथोलॉजिस्ट व हिस्टोपॅथोलॉजीस्ट इतर सर्व तज्ञ (speciality) डॉक्टरांना (कायम+कंत्राटी) सन २००६ पासून इन्सेंन्टीव्ह मंजुर झालेला आहे. तसेच साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व तज्ञ डॉक्टरांना ते संस्थानसेवेत रूजू झाल्याच्या दिनांकापासूनच इन्सेन्टीव्ह मिळतो आहे. वरीलपैकी ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट पदालासुध्दा जुलै २०१८ पासुन फिक्स (fixed) इन्सेन्टीव्ह मंजुर होऊन मिळतो आहे. फक्त माझ्या सदयपदाला म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजिस्ट या पदालाच इन्सेंटीव्ह अजुनही मंजुर झालेला नाही. मी या संदर्भात वेळोवेळी विनंती अर्ज सादर केले परंतु माझ्या अर्जाची साधी दखलही घेण्यात आलेली नसून या प्रकरणात मला पूर्णपणे डावलले गेले आहे. मी गेल्या ४ वर्षांपासुन प्रमाणिकपणे संस्थानसेवेत काम करत आहे. दरवेळी वरिष्ठांच्या आदेशांचे मी काटेकोरपणे पालन केले आहे. गरज पडेल तेव्हा रूग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून इतर डॉक्टरांच्या रजा कालावधीत एकाचवेळी दोन्ही हॉस्पिटलच्या (साईनाथ + साईबाबा) पॅथोलॉजी लॅब सांभाळण्याचे आदेश मला मिळाले. मी जीव ओतुन काम केले. माझ्या कार्यकाळात दोन्ही हॉस्पिटलमधील लॅबमध्ये कुठलीही अडचण येऊ दिली नाही. त्याचबरोबर साईबाबा हॉस्पिटलमधील सिनीअर पॅथोलॉजीस्ट यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या पदाचा अतिरीक्त कार्यभारही समर्थपणे सांभाळला. उपरोक्त संदर्भानुसार माझी कळकळीची मागणी आहे की माझ्या हिस्टोपॅथोलॉजिस्ट या पदाला फिक्स (fixed) इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात यावा व दि. ०३/१०/२०१६ पासुनचा या पदाचा फरक मला मिळावा. तसेच ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट या पदाचा कार्याकाळातील दि.०१/०९/२०१५ ते दि. ०२/१०/२०१६ पर्यंतचा या पदाचा फीक्स इन्सेंटीव्हप्रमाणे फरक मिळावा. माझी श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान यांप्रति पूर्ण निष्ठा असून मला खात्री आहे माझ्या या अर्जाची नक्कीच दखल घेतल्या जाईल व मला योग्य तो न्याय मिळेल."

डॉ अशोक अनंत न्यायाधिश, पॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे वयास ६० वर्षे पुर्ण होत असल्याने प्रचलित सेवानियमानुसार त्यांना दि. ३१/०५/२०१८ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त करण्यात आले. संस्थान व्यवस्थापनाचे कामाचे सोईचे दृष्टीने व प्रशासकीय कारणास्तव डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे मुळ पदाचे काम कायम ठेवुन सिनीअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. ३१/०५/२०१८ चे मध्यान्नोत्तर पासुन पुढील आदेश होईपावेतो डॉ सरवार यांचेकडे देणेत आला.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. २६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४०१ नुसार, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना प्रभारी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचा प्रोत्साहन भत्ता दि. ०१/०६/२०१८ पासून पुढील आदेश होईपर्यंत देण्यास मान्यता देण्यात आल्याने त्यानुसार दि. २१/०८/२०१९ रोजी आदेश पारीत करणेत आला आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र २९९ नुसार, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिका-यांचे रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी दि. २३/०७/२०१९ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करून दि. ०२/०८/२०१९ रोजी निवड समितीसमोर वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आले. सदर वॉक इन इंटरव्युव्हमध्ये डॉ शिल्पा दशरथ सोनावणे यांची सिनीअर पॅथोलॉजीस्ट या पदासाठी निवड झाल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ या पदावर नेमणूक आदेश देणेत आलेला असुन त्यानुसार त्या दि. २४/०८/२०१९ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत.

तदनंतर, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) या पदाचा दिलेला अतिरिक्त कार्यभार दि. २४/०८/२०१९ पासून संपुष्टात आणणेत येत असुन डॉ सरवार यांनी त्यांचे मुळ पदाचे म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदाचे कामकाज पहावे. डॉ सरवार यांना प्रभारी वरिष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) पदाचा देणेत येत असलेला प्रोत्साहन भत्ता दि. २४/०८/२०१९ पासून बंद करण्यात यावा. संबंधीतांनी सदर पदाचा चार्ज देवाण-घेवाण करून चार्जयादीची एक प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी. सदर आदेशामुळे संबंधीतांची पदावनती / पदोन्नती झाली आहे असे समजणेत येऊ नये असा आदेश दि. १९/०९/२०१९ रोजी पारीत करणेत आला आहे.

डॉ.कविता शंतनु सरवार, यांनी दि.२३.०९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये मी, डॉ.कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथॉलॉजिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल, प्रयोगशाळा विभाग सदर पत्राव्दारे माझ्याकडील सिनिअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा पदभार आज दि.२३.०९.२०१९ पासून डॉ.शिल्पा सोनवणे, सिनिअर पॅथॉलॉजिस्ट यांचेकडे सुपुर्त करत आहे, असे कळविलेले आहे.

तसेच डॉ शिल्पा सोनवणे, सिनीअर पॅथोलॉजीस्ट (कंत्राटी) यांनी दि. ०५/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

" मी डॉ शिल्पा दशरथ सोनवणे, सिनिअर पॅथॉलॉजीस्ट आदेश नं ९७६ दि. १६/०८/२०१९ रोजी मिळाला असून त्या आदेशानुसार दि. २४/०८/२०१९ रोजी मी कामावर हजर झाले व माझे काम चालू केले. आदेश नं २३६ रोजी १९ सप्टेंबर २०१९ मिळाला असुन, त्या आदेशानुसार डॉ सरवार मॅडम यांनी दि. २३/०९/२०१९ रोजी चार्ज दिला असून चार्ज यादी प्राप्त नाही. तरी मी चार्ज स्विकारला असून माझे काम सुरू केले आहे."

डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट यांना सप्टेंबर २०१८ ते ऑगष्ट २०१९ या कालावधीत पॅथोलॉजीस्ट या पदाचा खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता आदा करणेत आलेला आहे.

तक्ता क्र १

| अ.नं. | कालावधी | प्रोत्साहन भत्ता | अ.नं. | कालावधी | प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सप्टेंबर २०१८ | १४३०२९ | ०७ | मार्च २०१९ | १२०५५७ |
| ०२ | ऑक्टोबर २०१८ | ११५५६० | ०८ | एप्रिल २०१९ | १२०८९० |
| ०३ | नोव्हेंबर २०१८ | १०९५८१ | ०९ | मे २०१९ | १२५७३२ |
| ०४ | डिसेंबर २०१८ | ९९७२८ | १० | जून २०१९ | ११०५४८ |
| ०५ | जानेवारी २०१९ | १२२०५८ | ११ | जूलै २०१९ | १२८७०८ |
| ०६ | फेब्रुवारी २०१९ | १०१२६६ | १२ | ऑगष्ट २०१९ | १०१७८१ |
| | | **एकूण** | | | **१३९९४३८** |

उपरोक्त प्रोत्साहन भत्याव्यतिरीक्त डॉ सरवार यांना हिस्टोपॅथोलॉजीस्ट विभागात होणा-या तपासण्यांचे खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करणेत आलेला आहे.

तक्ता क्र २

| अ.नं. | कालावधी | प्रोत्साहन भत्ता | अ.नं. | कालावधी | प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सप्टेंबर २०१८ | १६१५ | ०७ | मार्च २०१९ | १७२३ |
| ०२ | ऑक्टोबर २०१८ | १४७७ | ०८ | एप्रिल २०१९ | २१३३ |
| ०३ | नोव्हेंबर २०१८ | १५३० | ०९ | मे २०१९ | २२३७ |
| ०४ | डिसेंबर २०१८ | २०६१ | १० | जून २०१९ | १९०३ |
| ०५ | जानेवारी २०१९ | १८४२ | ११ | जूलै २०१९ | २४४७ |
| ०६ | फेब्रुवारी २०१९ | २०५७ | १२ | ऑगष्ट २०१९ | १५४९ |
| | | **एकूण** | | | **२२५७४** |

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत वेगवेगळे निकष व धोरण आहेत. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या कामानुसार (ऑपरेशन, तपासण्या, इ.) तसेच रूग्णांनी अदा केलेल्या बिलातील रकमेच्या काही प्रमाणात प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. श्री साईनाथ रूग्णालयाकडील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांना त्यांच्या माहे जुन २०१९ चे सहाव्या वेतन आयोगातील त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेंन्टीव देण्यात येतो. श्री साईनाथ रूग्णालयात सर्व तपासण्या, शस्त्रक्रीया व इलाज विनामुल्य करणेत येतात.

डॉ सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट यांचेकडे सिनीअर पॅथोलॉजीस्ट या पदाचा अतिरीक्त कार्यभार देणेत आल्याने त्यांना पॅथॉलॉजीस्ट व हिस्टोपॅथोलॉजीस्ट या दोनही पदांचा प्रोत्साहन भत्ता देणेत येत होता. मात्र आता डॉ सरवार ह्या फक्त त्यांचे मुळ पदाचे म्हणजेच हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदाचे काम करत असुन श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता लागु असलेले प्रोत्साहन भत्याच्या निकषानुसार, हिस्टोपॅथॉलॉजी विभागात करण्यात येणा-या तपासण्यांवर डॉ सरवार यांना प्रोत्साहन भत्ता द्यावयाचे ठरल्यास प्रतिमहा सरासरी रू. १८८१/- इतका अत्यल्प प्रोत्साहन भत्ता देय होतो. डॉ सरवार यांना सहाव्या वेतन आयोगाचे पे-बॅन्ड १५६००-३९१०० नुसार माहे जुन २०१९ मध्ये वेतन खालीलप्रमाणे होते.

| मुळ वेतन | ग्रेड पे | डीए | एचआरए | टीए | एनपीए | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०३०० | ६६०० | ३८१९८ | २६९० | १२०० | ९४१५ | ७८४०३ |

डॉ सरवार यांना सातव्या वेतन आयोगाचे S-23 (६७७००-२०८७००) L-4 नुसार माहे जुलै २०१९ पासून खालीलप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे.

| मुळ वेतन | ग्रेड पे | डीए | एचआरए | टीए | एनपीए | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ७४००० | ० | ८८८० | ५९२० | १२०० | ९४१५ | ९९४१५ |

दि. ११/१२/२०१९ रोजीचे पत्रानुसार, डॉ कविता शंतनू सरवार (Histopathologist) यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १६/१०/२०१९ रोजी दुपारी २.१५ वा. मा डॉ. रामशंकर कथेरिया, अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांच्या दालनात सुनावणी घेणेत आली.

मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने मा श्री रविंद्र ठाकरे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ विजय नरोडे प्र वैद्यकीय संचालक, डॉ कविता शंतनु सरवार हिस्टोपॅथोलॉजीस्ट, हे उपस्थित होते.

श्री साईबाबा संस्थानचे वतीने खालीलप्रमाणे म्हणणे सादर केले.

With reference to your above letter and the case of Dr. Kavita S. Sarwar, Histopathologist, regarding service harassment, following is the latest status report.

1. The applicant joined Shri Saibaba Hospital on the post of Jr. Pathologist on 01/09/2015 agreeing to the terms and conditions of the appointment order that there was no incentive applicable to the post. Incentives was applicable only to the Sr. Pathologist post.
2. Later on applicant applied to the post of Histopathologist advertised on 11/02/2016. She was appointed as Histopathologist through the interview conducted on 24/05/2016 by the selection committee. Agreeing to the terms and conditions of the appointment order, she joined as Histopathologist on 03/10/2016 and till today she is discharging duties of the post of Histopathologist.
3. Applicant while working as Histopathologist in 2016 Dr. Ashok Nyayadhish was holding the post of Sr. Pathologist w.e.f. 2006 and incentive for this post of Sr. Pathologist was duly paid to him from time to time.
4. After retirement of Dr. Nyayadhish from the post of Sr. Pathologist, on 01/06/2018 additional charge of the said post was given to the applicant in spite of another application from Dr. Madhura Joshi working as Medical Officer (Pathology) in Shri Sainath Hospital who was senior to the applicant.
5. Applicant accepted the additional charge of Sr. Pathologist by order dated 31/05/2018 which clearly mentions that no incentive will be applicable for this additional charge of Sr. Pathologist. She was holding this charge of Sr. Pathologist from 01/06/2018.
6. In due course of time Sansthan kept on advertising for the various vacant post of the drs. including post of Sr. Pathologist. In response to advertisements dated 08/08/2018 for the post of Sr. Pathologist 05 candidates appeared for the interview dated 14/08/2018 including applicant. Applicant was selected for the post of Sr. Pathologist and she was given appointment order 10/09/2018 mentioning applicability of incentive but she did not join on the said post of Sr. Pathologist though this post was with incentive.
7. Applicant applied for getting incentive for holding additional charge of the post Sr. Pathologist on 19/07/2018 but she was informed that she cannot get incentive.

Further she applied on Dt.31/03/2019 and Dt.01/05/2019 for the same reason. On the noting of Dt.01/05/2019, it was clearly mentioned that no incentive was payable to her, but, present administration took a sympathetic view on applicants application and proposal was kept in the Hon. Board of Management Committee by Administration. As per Sansthan Rules and regulation, Incentive was payable only to the Doctors holding additional charge of Administrative post (Sansthan Board Resolution Dt.23/10/2017, Subject No.22, Decision No.868). But still the sympathetic view on applicants application was taken and proposal was kept in the meeting of board of management committee

8. Hon. Board of Trustees for the management of SSST, took decision in the meeting on 26/07/2019 to the grant the incentives to the applicant and passed the resolution No.401 stating to give incentive for the additional charge of Sr. Pathologist to the applicant with back dated effect from 01/06/2018 till further order.

9. According to this resolution applicant was given total incentive Rs.14,87,820/- for the period 01/06/2018 to 31/07/2019. Similarly, incentive of month of August 2019 of Rs.1,03,330/- was paid for the period of 01/08/2019 to 23/08/2019.

10. As per Sansthan rules and regulation, again vacant post of doctors for both the hospitals were advertised on 23/07/2019 including the post of Sr. Pathologist. Dr. Shilpa Sonawane was selected for the post of Sr. Pathologist by the selection committee amongst two candidates interviewed. Selection was done by the Committee headed by Hon. Chief Executive Officer (I.A.S.) of SSST, Dy. Executive Officer SSST, representative of Civil Surgeon Ahmednagar District, Medical Superintendent Shri Sainath Hospital and Medical Director Shri Saibaba Hospital. Selection was clearly on merit basis and qualifications & recruitment rules. The post Sr. Pathologist as per advertisement required following qualification and recruitment rules.

11. Age not more than 45 yrs. Age relaxation of 5 yrs. to candidate from reserve category. upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification and experience.

12. MBBS.

13. MD/DNB Pathology with minimum experience of 2 yrs. in pathology OR FCPS pathology with minimum experience of 3 yrs. in pathology OR University diploma /CPS diploma in Pathology with minimum experience of 5 yrs. in pathology.

14. MS-CIT

15. MMC/MCI Registration with renewal is mandatory.

The said qualification was determined as per letter no.291 dt.05/05/2017 from The Dean, B.J. Government Medical College, Pune.

16. Dr. Shilpa Sonawane joined on 24/08/2019 as Sr. Pathologist. The additional charge of this post was handed by applicant to Dr. Shilpa Sonawane on 23/09/2019 and hence incentive for this post is now applicable to Dr. Shilpa Sonawane from 23/09/2019 and not to the applicant.

17. Lastly after hand over of additional charge of Sr. Pathologist by applicant to Dr. Sonawane, applicant again applied to grant fixed incentive to her basic post of Histopathologist as per policy of incentives applicable to Drs. working in Shri Sainath Hospital. In response to this application dated 10/10/2019 we have prepared proposal regarding her demand to put forth before the Hon. Management

Committee of Trustees, as per SSST rules and regulation and administrative procedure. Decision regarding this will be taken by Hon. Management Committee of Trustees in the next meeting, whenever will be scheduled.

18. The application of applicant is baseless devoid of any merit and infact the present administration has taken sympathetic view on her application Dt.01/05/2019 due to which she was granted incentive with back effect. Though previous administration had refused her application for grant of incentive for additional charge of Sr. Pathologist, still applicant did not make any complaint of any bias or discrimination on the grounds of cast on previous administration and when present administration has given her incentive.

Hence the application deserves to be dismissed.

So is the latest status report submitted for your kind perusal.

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांचेकडील दि. ०२/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये अहवाल दि. ११/०१/२०२० रोजी प्राप्त झाला असुन त्यात खालीलप्रमाणे नमुद आहे.

National Commisstion for Scheduled Castes, New Delhi

File No.K-21/Maharashtra-29/2019-SSW.l

Minutes of Hearing dated 16.12.2019

During the hearing the following were present:

(i) Dr.Vijay Narode, Medical Director, Shri Saibaba Sansthan Hospital.

(ii) Shri Ravindra Thakare, Dy.Chief Executive Officer, (CEO), Sai Baba Sansthan.

(iii) Shri Bhimrao Khandate, Addl.Commissioner, Social Welfare.

(iv) Dr. Kavita A. Sarwar, Petitioner.

1. The Complaint of the petitioner is as follows :

i) She is the only SC doctor in the Shri Saibaba Sansthan Hospital and has been appointed as Histopathologist there.

ii) She has been discriminated against by the management of the hospital.

iii) She Stated that she was given an additional charge of Sr.Pathologist on 31.05.2018 on the retirement of the incumbent. However, she was not given the incentive paid to the Sr.Pathologist while she held the charge.

iv) She further stated that post of Histopathologist is the only post where no incentive / extra remuneration is given while every other doctor in the hospital is paid some incentive or extra allowance except her.

2. She also stated during the hearing that Dr.Shilpa Sonwane has now been given the contractual appointment in the post of Sr.Pathologist w.e.f. August, 2019 and she will also be receiving the incentive. She further stated that Dr.Shilpa is not an MD in Pathology but a Diploma in Pathology and also runs 2 private pathology labs of her own whereas the rules of the hospital state clearly that private practice is not allowed. She further stated that selection and posting of Dr.Shilpa is motivated and not transparent and above board. She further stated that she should also receive incentive for the period 23.03.2017 to 19.08.2019 for her work as Sr.Pathologist as the official order appointing Dr.Shilpa is dated 19.08.2019.

3. The Medical Director, Shri Saibaba Sansthan Hospital, stated that in the appointment letter giving the additional charge of Sr.Pathologist to Dr.Kavita dated 31.05.2018 it was clearly stated that no incentive will be paid to her and Dr.Kavita had agreed to the same. However, later she requested for payment of incentive which was finally put up to the board and on 21.10.2019 she has been

paid the final incentive amount of Rs.14,87,820/- for the period 01.06.2018 to 31.07.2019. Further, an incentive of Rs.01,03,330/- has also been paid for the period 01.08.2019 to 23.08.2019.

4. As regards her original post of Histopathologist having no incentive, the Medical Director and Dy.CEO, Sai Baba Sansthan, stated that a proposal is being put up to the Board so that the post of Histopathologist also becomes eligible for incentive. Regarding the post of Sr.Pathologist being filled by Dr.Shilpa, the Medical Director stated that it is a post on contractual appointment and Dr.Kavita was also offered the same earlier on 10.05.2018 but did not join. This post was advertised along with 54 other posts and there is no singling out for the post of Sr.Pathologist. As regards Dr.Shilpa running a private lab, the Medical Director stated that a notice has already been issued to her for the same and action will be taken as per rules.

5. It was clear that the incentive payment to the petitioner was delayed by roughly 16 months despite several requess by Dr. Kavita. It shows the laxity on the part of the CEO and the management of the hospital to address the grievance of the SC petitioner. The fact that the Histopathologist post (her original post) is the only post of Doctor without incentive has also not been adequately and quickly addressed by the management & CEO, despite her requests over a period of time and even on date the response is that a note will be put up to the Board.

6. The Commission has taken serious note of this laxity in addressing the legitimate grievances of the only SC doctor in the hospital. The management approach appears to tbe unsympathetic towards SC employees and their problem. Hence, it is desired that the CEO taked immediate steps to put up the note with all facts to the board within 10 days. The observation of NCSC that one post should not be singled out for non-incentive and that there should be no discrimination should also be communicated to the board in the said note so that the SC candidate also gets her due along with other doctors working in the hospital.

7. A copy of the note being sent to the board should be sent to the Commission within 15 days. The action taken regarding the allegation of DR Shilpa running two pathology labs should also be communicated to the Commission within on month. The Medical Directo and CEO, Sai Baba Sansthan, should ensure that there is no discrimination against Dr. Kavita who is the only SC doctor in the hospital.

8. Action Taken Report to be provided within on month. Section to put up once the report is received to decide on further course of action.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- डॉ सरवार यांना रूग्णालयाकडे देणेत आलेल्या पदांवरील नेमणूका, कालावधी व त्यांना देण्यात आलेला प्रोत्सहन भत्त्याबाबत माहिती खालीलप्रमाणे.

| अ नं | नेमणूक | कालावधी | देणेत आलेला प्रोत्साहन भत्ता | मागणी |
|---|---|---|---|---|
| १ | ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट | ०१/०९/२०१५ ते ०२/१०/२०१६ | निरंक | एकत्रित प्रोत्साहन भत्ता मिळावा |
| २ | हिस्टोपॅथोलॉजीस्ट (मुळ पद) | ०३/१०/२०१६ ते ३१/०५/२०१८ | निरंक | एकत्रित प्रोत्साहन भत्ता मिळावा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सिनीअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा अतिरीक्त कार्यभार | ०१/०६/२०१८ ते २२/०९/२०१९ | १६९९७४० | निरंक |
| ४ | हिस्टोपॅथोलॉजीस्ट | २३/०९/२०१९ ते आजपावेतो | निरंक | एकत्रित प्रोत्साहन भत्ता मिळावा |

१) डॉ सरवार यांनी त्यांचे उपरोक्त दि. १०/१०/२०१९ रोजीचे अर्जान्वये याआधी नेमणूक असलेल्या ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट पदाचे फिक्स इन्सेंन्टीव देणेबाबत मागणी केलेली आहे. डॉ सरवार यांचेपुर्वी ज्युनिअर पॅथॉलॉजीस्ट या पदावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना इन्सेन्टीव देणेत आलेला नाही. त्या कालावधीत (दि.०१/०९/२०१५ ते दि.०२/१०/२०१६ पर्यंत) पॅथॉलॉजी विभागात करणेत आलेल्या तपासण्यांवर प्रोत्साहन भत्ता त्यावेळी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदावर कार्यरत असलेले डॉ अशोक अनंत न्यायाधिश यांना वेळोवेळी देणेत आलेला आहे. श्री साईनाथ रूग्णालयात ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट पदासाठी फिक्स इंन्सेंन्टीव जुलै २०१८ पासुन लागू करणेत आलेला आहे.

२) तसेच दि. ०३/१०/२०१६ रोजी पासून डॉ.कविता सरवार ह्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदावर कार्यरत आहेत. दि. ०३/१०/२०१६ ते दि. ३१/०५/२०१८ या कालावधीतील हिस्टोपॅथोलॉजीच्या तपासण्यांवरील प्रोत्साहन भत्ता रू. ३१,२५८/- त्यावेळी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदावर कार्यरत असलेले डॉ अशोक अनंत न्यायाधिश यांना वेळोवेळी देणेत आलेला आहे. दि. ०१/०६/२०१८ ते दि. २२/०९/२०१९ अखेर सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचे अतिरीक्त कार्यभाराचा व हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदाचे कामाचा डॉ सरवार यांना रू. १६,९९,७४०/- प्रोत्साहन भत्ता देणेत आलेला आहे.

३) श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता लागु असलेले प्रोत्साहन भत्त्याच्या निकषानुसार सिनीअर पॅथोलॉजीस्ट या पदाकरीता साधारण सरासरी प्रतीमहा रू. १,१६,०००/- प्रोत्साहन भत्ता देय होतो. परंतु हिस्टोपॅथॉलॉजी या पदाकरीता हिस्टोपॅथॉलॉजी विभागात करण्यात येणा-या तपासण्यांवर प्रतिमहा सरासरी रू. १८८१/- इतका अत्यल्प प्रोत्साहन भत्ता देय होतो.

४) डॉ सरवार यांचेइतकीच शैक्षणिक पात्रता असणा-या श्री साईनाथ रूग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांना सहाव्या वेतन आयोगातील त्यांचे मुळ वेतन + ग्रेड पे यावर २००% नुसार (साधारण रू. ५३,८००/-) फिक्स इन्सेंन्टीव देणेत येत आहे.

५) डॉ सरवार यांची शैक्षणिक पात्रता एम. डी. पॅथोलॉजी आहे. हिस्टोपॅथोलॉजीस्ट हया सिनिअर पदाचे कामकाज ज्ञान, अनुभव व जबाबदारीचे असुन हे डॉ सरवार व्यवस्थितरित्या सांभाळत आहेत. त्यामानाने हिस्टोपॅथोलॉजी पदाला तपासण्यांवर मिळणारा इन्सेंन्टीव हा अत्यंत अल्प असल्याने त्यांना एक विशेष बाब म्हणून फिक्स इन्सेंन्टीव देता येईल, असे नम्र मत आहे. सदर बाब धोरणात्मक असल्याने डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि. १०/१०/२०१९ रोजीचा अर्ज व अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली यांचे कक्षातील दि. १६/१२/२०१९ रोजी झालेल्या सुनावणी इतिवृत्तानुसार कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन तसेच डॉ.सरवार यांचे अर्जाचा सखोल अभ्यास केला असता समितीच्या असे निदर्शनास आले की, डॉ.सरवार यांनी हिस्टोपॅथोलॉजीस्ट या एकल पदाला फिक्स इन्सेन्टीव्ह मिळणेबाबत मागणी केली आहे. समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील हिस्टोपॅथोलॉजीस्ट पद वगळता इतर सर्व तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना त्यांनी केलेल्या कामानुसार (ऑपरेशन,तपासण्या इ.) तसेच रुग्णांनी आदा केलेल्या बिलाच्या रकमेच्या काही प्रमाणात इन्सेन्टीव्ह दिला जातो. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांचे माहे जुन २०१९ पासून ६व्या वेतन आयोगानुसार मुळ वेतन+ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इन्सेटीव्ह लागु आहे व दिला जातो.**

**डॉ.सरवार २०१६ पासुन संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हिस्टोपॅथोलॉजीस्ट पदावर पुर्णवेळ सेवेत आहेत. शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि.२७.०६.२०१८ वरुन असे दिसुन येते की, इन्सेन्टीव्ह मंजुर करण्याचा अधिकार संस्थानचे व्यवस्थापन समितीला आहे. तसेच तो इन्सेन्टीव्ह किती द्यावा ही बाब सुध्दा व्यवस्थापन समितीने ठरवावी, असे दिसुन येते.**

**सखोल अभ्यासानंतर समितीचे असे निदर्शनास आले की, ६व्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतन+ग्रेड पे च्या २०० पट इन्सेन्टीव्ह देता येतो. याबाबतचे सर्व अभिलेख तपासले असता असे निदर्शनास आले की, डॉ.सरवार यांचे अर्ज यापुर्वी नामंजुर करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत सदरहु अर्जाचा विचार पुर्वलक्षी प्रभावाने करणे न्यायोचित होणार नाही, असे समितीचे मत आहे.**

**वरील सर्व बाबींचा सांगोपांग विचार करता हिस्टोपॅथोलॉजीस्ट हे एकल पद असल्याने समिती सर्वानुमते असा निर्णय घेते की, डॉ. सरवार यांना ६व्या वेतन आयोगातील मुळ वेतन+ग्रेड पे यावर २००% इन्सेन्टीव्ह दि.०१ जानेवारी,२०२० पासून श्री साईनाथ रुग्णालयातील प्रोत्साहन भत्त्याच्या इतर अटी व शर्तीनुसार देण्यात यावा. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

वरील निर्णय क्र.०१ ते ४५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं. ०६.४५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर.

स्वाक्षरीत/-
(दिलीप स्वामी)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त,
नाशिक

स्वाक्षरीत/-
(दीपक मुगळीकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
अहमदनगर